Orien
Mar

# THE CHILD'S BOOK ON THE SOUL.

## PART I.

---

# आत्म्याविषयीं लेंकरांची पहिली पोथी.

मुंबईमध्यें

अमेरिकान् मिशन् छापखान्यांत छापिलें.

ख्रिस्ती शक १८४४.

# आत्म्याविषयीं लेंकरांची पहिली पोथी.

---

## बोधक पत्र.

लाहान मुलगे व मुलग्या यानी चांगलीं व्हावयास व बरें करावयास समजावें असें जो इच्छितो त्याचें हें पत्र आहे, कां कीं चांगलें होणें आणि बरें करणें हें सुखी होण्याचा मार्ग आहे.

हे माझ्या प्रिय मुलानो;

मला साहा मुलें आहेत. तीं सर्व लाहान आहेत, त्यांमध्यें जो वडील तो नऊ वर्षांच्या आंत आहे. तीं मला वारंवार ह्मणतात कीं, आह्मास चांगल्या गोष्टी सांग. जेव्हां तीं आईबापांच्या आज्ञांप्रमाणें वर्त्तून चांगलीं असतात तेव्हां त्यांस असल्या गोष्टी सांगावयास मला संतोष आहे. त्यांसाठीं म्या हें लाहान पुस्तक लिहिलें, त्यांतील तीन मोठ्या मुलांस हें पुस्तक वाचून समजाविलें आहे; दुसरीं तीन हें समजावयास अझून फार लाहान अज्ञानी आहेत, पण कांहीं मोठीं झाल्यानंतर तीं समजतील असें वाटतें.

जीं दुसरीं लाहान मुलें हें पुस्तक वाचतील किंवा ऐकतील त्यांचेंहि बरें होईल असी माझी आशा आहे, ह्मणून छापिलें आहे. हे माझ्या प्रिय मुलानो, म्या ज्या गोष्टी लिहिल्या त्या तुह्मी वाचून आणि समजून तुमचें फार हित होईल असी माझी इच्छा आहे. जर तुह्मास बरोबर वाचतां येत नाहीं तर कोणी चांगला वाचणारा जो हें वाचून दाखवील आणि यांतील कठीण शब्द समजावील असा कोणीएक पाहावा.

एक लाहान मुलगा व त्याची आई ज्यानी परस्परें बहुत गोष्टी सांगितल्या त्यांची गोष्ट सांगतों.

जर तुह्मी आपलीं आईबापें अथवा भाऊ बहीण यांजवळ बसून त्यांसीं कांहीं वेळ बोलून त्यांस गोष्टी सांगाल आणि तेंहि तुह्मास सांगतील, तर अशा बोलण्याला संभाषण ह्मटलें आहे. ह्या पुस्तकांत कित्येक संभाषणें आहेत. तीं केवळ मनोरंजनासाठीं लिहिलीं असें नाहीं, तर कांहीं विशेष बोध व्हावा ह्मणून लिहिलीं आहेत. जर तुह्मास चांगलीं व्हावयाची इच्छा आहे, तर ज्या गोष्टींची समजूत व आठवण केली पाहिजे, त्या गोष्टी मी तुह्मास आधीं शिकवितों.

आईला गंगाबाई आणि तिच्या लाहान मुलास गोविंद असें ह्मणा. ज्या गोष्टी मी तुह्मास सांगणार आहें त्या तुह्मास स्पष्ट समजाव्या ह्मणून हीं नामें मातापुत्रांस ठेविलीं आहेत. हीं दोघें जें संभाषण करितात तें सर्व चांगलें आहे आणि तें समजलें असतां तुह्मास फार उपयोग पडेल, ह्मणून तें अवश्य समजून आठवण ठेविली पाहिजे.

हें वाचून संपवायास घाई करूं नये. मन लावून प्रत्येक गोष्ट वाचा. गंगाबाई व गोविंद यांच्या सभाषणांतून कांहींएक शब्द समजले नाहींत तर कोणापासून समजून घ्या. याप्रमाणेंच जीं कांहीं पुस्तकें वाचाल त्यांतील एखादें न समजलें तर कोणास विचारा. अर्थ समजल्यावांचून पुस्तक वाचणें व्यर्थ आहे. तुमचा बाप किंवा आई किंवा कोणीएक तुह्मासीं बोलतात, आणि त्यांच्या बोलण्याचा अर्थ तुह्मी न समजलां तर त्यांस पुसून घ्या. जेव्हां तीं तुह्मास कांहीं गोष्ट समजावयास प्रयत्न करितात किंवा कांहीं कठीण शब्दांचा अर्थ सांगतात आणि तो तुह्मास समजत नाहीं, तर मी समजलों नाहीं असें सांगण्यास लाजूं नका. समजला नसतां तर मी समजलों, असें बोलणें फार वाईट आहे, तुह्मी वाचतां शिकतां किंवा दुसऱ्यापासून ऐकतां तें सर्व समजण्यासाठीं प्रयत्न करा, ह्मणजे तुह्मास लवकर ज्ञान होईल आणि तुह्मी शाहाणे होऊन सुखी व्हाल.

आतां गंगाबाई व तिचा पुत्र गोविंद यांची कथा ऐकण्याची इच्छा असेल, ती हितकारी व आनंदकारी तुह्मास होईल असी माझी आशा आहे.

मी तुमचा मित्र आहें,

थामस ह. गाल्देत.

## संभाषण १.

गोविंद ह्मणून एक पांच वर्षांचा मुलगा होता, त्याचा बाप लाहानपणींच मेला, त्याच्या आईला रमी ह्मणून एक तीन वर्षांची मुलगी होती. तीं तिघें एका रमणीय गांवीं देऊळ व साळ यांच्याजवळ लाहानसें पांढरें घर होतें त्यांत राहत होतीं.

तीं मुलें साळेंत जात नसत, त्यांची आई त्यांस ह्मणे कीं, तुह्मी कांहीं मोठीं झालां ह्मणजे साळेंत जावें. ती त्यांस घरीं शिकवीत असे, तिची त्यांजवर फार माया असे, आणि मुलेंहि आईवर प्रीति फार करीत असत.

गंगाबाईच्या घराला एक सुंदर बाग होता. त्यांत एका दिवसीं ती गोविंदासुद्धां फिरत असतां गोविंदानें आपली धाकटी वहीण जी घरांत होती, तिला द्यावयाकरितां कांहीं फुलें खुडिलीं आणि खिशांतील दोरी काढून बांधून घेतलीं. कांहीं वेळ फिरल्यानंतर तीं एका मोठ्या झाडाच्या छायेस बैठक होती तेथें सूर्य मावळल्यापूर्वीं निर्मळ व शीतळ हवा खात बसलीं. त्यांच्यासभोंवतीं सुवासिक फुलें होतीं त्यांचा सुवास आला. त्यांच्या मस्तकावरती झाडांच्या खांद्यांवर जे पक्षी होते त्यांचें गाणें ऐकूं येत असे. असें तेथें मोठी शांति व सुख वाटलें.

गोविंद चांगला मुलगा होता ह्मणून तो सुखी होता, आणि त्याची आईहि सुखी होती. गोविंद चांगला मुलगा आहे असें पाहून तिला फार सुख वाटे. तिनें त्याचा हात धरून मुका घेतला. तिनें असें मनांत आणिलें कीं, गोविंदासीं संभाषण करून यास कांहीं चांगलें शिकवीन, आणि त्याप्रमाणें ती करूं लागली.

**गंगाबाई** ह्मणाली, गोविंदा, पाहारे! तो सुंदर पांढरा गारगोटा पाहा, तो मला आणून दे.

**गोविंद** ह्मणाला, आणिला, बाई. तो साखरेसारिखा दिसतो. तो खाण्याजोगा असा दिसतो.

**गंगा.**—नाहीं मुला, तो फार कठीण. जर खाऊं लागलास तर दांत पडतील.

**गोविंद.**—याला काय ह्मणतात, बया?

**गंगा.**—याला खडा ह्मणतात, याविषयीं तुला कांहीं सांगावयाचें आहे. जर तूं त्याला कांहीं बोलसील तर तो उत्तर देईल बरें?

**गोविंद.**—नाहीं, बाई; दगडाला बोलतां येत नाहीं.

**गंगा.**—जर तूं त्याला शिकवूं लागलास तर तो कांहीं शिकेल?

**गोविंद.**—नाहीं नाहीं, बया; असें होणार नाहीं, हें तुला ठाऊक आहे.

**गंगा.**—तूं रमीसाठीं गोंडा केला आहेस, त्यांत एक सुंदर गुलाबाचें फूल आहे, तें पाहा. तें खड्याहून फार भिन्न आहे; त्याला देंठ व हिरवीं पानें आणि मऊ लाल पांढऱ्या पांकळ्या आहेत, त्या सर्वां मिळून एक फार सुंदर फूल आहे. तें झाडावर असतां सजीव व टवटवीत होतें. अझून जर तें पाण्यांत घातलें, तर एक दोन दिवसपर्यंत कोमणार नाहीं. खड्यापेक्षां गुलाबाचें फूल फार सुंदर व चमत्कारि आहे. तें सजीव आहे पण खडा निर्जीव आहे. गुलाबाच्या फुलाला कांहीं तरी बोल बरें, तें उत्तर देईल कीं काय? पाहा.

**गोविं.**—फुलासीं बोलून उपयोग काय? फुलास बोलतां ऐकतां येत नाहीं.

**गंगा.**—फुलास कांहीं शिकतां येईल काय?

**गोविंद.**—नाहीं, बया. खड्यापेक्षां अधिक नाहीं.

**गंगा.**—हें घड्याळ मला कोणी दिल्हें, तें तुला ठाऊक आहे काय?

**गोविं.**—तें माझ्या बापाने दिल्हें असें त्वां मला सांगितलें होतें. तें किती सुंदर आहे! तें उघडून त्यांत काय आहे, तें मला पाहूं दे, बया.

[गंगाबाई घड्याळ उघडती.]

**गंगा.**—गोविंदा, यांत किती सूक्ष्म चाकें नेहमी फिरत आहेत हीं पाहा.

**गोविं.**—तीं मला दिसतात, बया. एक चांगलें चालणारें घड्याळ मला असलें तर बरें. एका दिवसीं जेव्हां आपलें घड्याळ उघडून रमीला दाखविलें, तेव्हां तें जिवंत आहे असें तिला वाटलें कीं नाहीं?

**गंगा.**—होय मुला; ती फार लाहान होती, ह्मणून तिला असें वाटलें, परंतु घड्याळ जिवंत नाहीं हें तुला माहीत आहे.

**गोविं.**—खरें, बया. पण तें स्वतः चालतें यावरून तें जिवंत आहे असें भासतें.

**गंगा.**—असें नाहीं, मुला. फूल खडा यांसारिखें तेंहि स्वतः चालूं शकत नाहीं; पण किल्ली दिल्ही ह्मणजे सर्व चाकें फिरविणारी एक कमाण आहे तिच्या योगानें तें चालतें.

**गोविं.**—खडा फूल यांपेक्षां घड्याळ फार चमत्कारिक आहे, असें मला वाटतें.

**गंगा.**—बरें, घड्याळ तुला कांहीं गोष्ट करील, किंवा तुझ्यानें त्याला कांहीं शिकवेल कीं काय? पाहा बरें.

**गोविं.**—त्याला बोलतां येत नाहीं, बया; आणि खडा फूल यांपेक्षां त्याला कांहीं समजणार नाहीं.

**गंगा.**—त्याला बोलतां व शिकतां कां येत नाहीं बरें?

**गोविं.**—आहाहा! बया; घड्याळ फूल खडा यांस बोलतां कां येत नाहीं, हें माझ्या मनांत आतां आलें.

**गंगा.**—याचें कारण काय?

**गोविं.**—त्याला कान तोंड नाहींत.

**गंगा.**—दुसरें कारण नाहीं काय?

**गोविं.**—दुसरें कारण मला ठाऊक नाहीं, जर दुसरें असेल तर मला सांग, बया.

**गंगा.**—अरे मुला, आतां अंधार पडूं लागला. चला, आपण घरीं जाऊं, आणि चाहा प्याल्यावर याविषयीं अणखी कांहीं बोलूं.

मग घरीं आलीं, आणि गोविंदानें आपल्या बहिणीकरितां जीं सुंदर फुलें आणिलीं होतीं, तीं तिला दिल्हीं. रमोनें त्याचा फार उपकार मानून मुका घेतला, आणि पेला पाण्यानें भरून त्यांत तीं फुलें ठेविलीं.

## मागील संभाषणाविषयीं प्रश्न.

१. धोंड्याला कांहीं बोलतां शिकतां येईल कीं काय? मातीच्या गोळ्यास येईल काय? लोखंडाच्या तुकड्यास येईल काय?
२. अणखी कांहीं दुसऱ्या वस्तू ज्यांस धोंडा व लोखंड यांसारिखें कांहीं बोलतां व शिकतां येत नाहीं, त्या सांग.
३. फूल व खडा यांचा भेद काय आहे?
४. गुलाबाच्या फुलाशिवाय अणखी कोणते पदार्थ जिवंत असून वाढतात?
५. फुलांसारिख्या अणखी कोणत्या दुसऱ्या वस्तू ज्यांस बोलतां व शिकतां येत नाहीं, त्या सांग?
६. घड्याळांत काय आहे? घड्याळ जिवंत आहे काय? तें रडतां फिरतें कीं काय?
७. घड्याळांत चक्रें फिरविणारें काय आहे?
८. घड्याळ चालू होण्यासाठीं काय करावें लागतें?
९. घड्याळ किंवा गुलाबाचें फूल यांमध्यें कोणतें चमत्कारिक?
१०. घड्याळाला कांहीं बोलतां किंवा शिकतां येईल काय?
११. घड्याळासारिख्या अणखी कोणत्या वस्तू चमत्कारिक आहेत, त्या सांग.
१२. त्यांस कांहीं बोलतां किंवा शिकतां येईल काय?
१३. अणखी चमत्कारिक वस्तू ज्यांस कांहीं बोलतां किंवा शिकतां येत नाहीं, त्या सांग.
१४. खडा गुलाबाचें फूल व घड्याळ यांस कशामुळें बोलतां येत नाहीं?

---

## संभाषण २.

चाहा प्याल्यावर गंगाबाईने रमीस सांगितलें कीं, तूं आपले लांकडी खेळ घेऊन कांहीं वेळपर्यंत खेळ, आणि भुईवर लाहानसीं घरें बांधून ठेव. मग ती आपलें शिवण्याचें काम घेऊन मेजाजवळ बसली, तिने अणखी

कांहीं सांगावें असी इच्छा धरून गोविंद तिच्याजवळ आपल्या लाहान खुरशीवर बसला.

त्यानें आपल्या खिशांत खडा ठेविला होता, तो काढून मेजावर ठेविला. मुलांची निजण्याची वेळ समजावी ह्मणून गंगाबाईनेंहि आपलें घड्याळ मेजावर ठेविलें. नंतर गोविंद तिजसीं बोलूं लागला.

**गोविं.**—अगे बाई, आपण बागामध्यें फिरत असतां तूं बोललीस कीं, खडा व घड्याळ यांविषयीं चाहा प्याल्यावर तुजसीं अणखी कांहीं बोलेन. तर त्यांला कशामुळें बोलतां व ऐकतां येत नाहीं, तें आतां मला सांग बरें, कां कीं त्यांला मुख व कान नाहींत ह्मणून त्यांला बोलतां व ऐकतां येत नाहीं, असें त्याचें कारण मला वाटलें.

**गंगा.**—मुला, तें एक कारण खरें; परंतु अणखीहि आहे. पाहा कुत्र्याला तुझ्यासारिखें मुख ओंठ दांत जीभ इत्यादिक आहेत, परंतु त्याला बोलतां येत नाहीं.

**गोविं.**—खरें, परंतु आपला टिपू कुत्रा याला स्वर काढितां येतो. तो कधींमधीं फार मोठ्यानें भुंकतो.

**गंगा.**—टिपूला कांहीं शब्द बोलतां येतो कीं काय?

**गोविं.**—नाहीं, बाई; एक देखील नाहीं. त्याला माझ्यासारिखें तोंड असून कां बोलतां येत नाहीं, हें समजत नाहीं.

**गंगा.**—अरे टिपूला वाचणें शिकविण्याचा प्रयत्न कधीं केला होतास काय?

**गोविं.**—नाहींगे बया; कुत्र्यांस वाचणें शिकतां येत नाहीं. टिपूला घरासमोरच्या अंगणांतून बदकें हाकावयास शिकविलें आहे, आणि रस्त्यांत चेंडू टाकला असतां त्याच्या पाठीमागें धांवून तोंडांत धरून आणावयास शिकविलें आहे. तर त्याला वाचणें शिकतां कां येत नाहीं, हें आश्चर्य वाटतें. पाहा तो नाना प्रकारच्या गोष्टी जाणतो असें दिसतें.

**गंगा.**—गोविंदा, तो कित्येक गोष्टी जाणतो खरें; परंतु तूं व रमी त्या बिचाऱ्या टिपूपेक्षां किती अधिक जाणतां, आणि पुढेंहि मरणपर्यंत अभ्यास

करितां करितां आणि अनेक ग्रंथ वाचतां वाचतां फार ज्ञानी व्हाल; परंतु टिपू असा होणार नाहीं. जितकें तो आतां समजतो यापेक्षां तो फार समजणार नाहीं.

**गोविं.**—बाई, जेव्हां टिपूनें तळघरांतून मास चोरून नेलें, त्याकरितां त्वां त्याला मारिलें तेव्हां त्यांत पाप आहे असें त्याला समजलें कीं काय?

**गंगा.**—नाहीं, हें पाप आहे असें तो समजला नाहीं. पुण्य व पाप यांविषयीं तो कांहींच समजत नाहीं.

**गोविं.**—बरें वाईट यांविषयीं कुत्रीं मांजरें घोडे बैल गायी मेंढरें हीं कांहीं समजतात, बाई?

**गंगा.**—नाहीं, माझ्या मुला; बऱ्या वाईटाचा समज स्त्रिया पुरूष मुलगे मुलग्या यांस मात्र आहे; पण पशू पक्षी इत्यादिकांस नाहीं.

**गोविं.**—तर बया हें माशांस समजतें कीं काय?

**गंगा.**—नाहीं, दुसऱ्या प्रकारचे जीवजंतु बेडूक इत्यादिकांस समजत नाहीं, तर हे सर्व पशू जीवजंतु इत्यादिक व घड्याळ खडा गुलाबाचें फूल ह्यांचा आणि तुझा फार भेद आहे, हें त्वां समजावें, गोविंदा. जेव्हां मी तुला बोलतें तेव्हां तें तूं तत्काळ समजतोस. तुझ्या बोलण्याचा अर्थ मला स्पष्ट समजावा असें तुला बोलतां येतें. वाचणें लिहिणें व नाना प्रकारचीं कार्यें करणें तुला शिकतां येतें. बरें वाईट काय आहे हें तूं जाणतोस. आपल्यापासून चांगलें झालें ह्मणजे तुला सुख वाटतें, आणि वाईट घडतें तेव्हां दुःख वाटतें, हें सगळें समजतोस कीं काय?

**गोविं.**—होय, बाई; असें वाटतें.

**गंगा.**—तर, खडा गुलाबाचें फूल घड्याळ आणि तुझा कुत्रा टिपू यांचा आणि तुझा किती भेद आहे याची आठवण कर. त्यांचा आणि तुझा इतका भेद कशानें पडतो, हें आह्मी पुढें विचार करून पाहूं.

**गोविं.**—बाई, आतां सांगसील तर बरें.

**गंगा.**—नाहीं, मुला; हें समजल्यापूर्वींच तुला कांहीं गोष्टी समजावयाच्या

अहेत. कदाचित् थोड्या दिवसानीच तें तुला सांगेन.

गोविं.—बरें बाई, मला कसें शिकवावें हें तुला चांगलें कळतें, असें मला कळूं आलें; याजकरितां तूं तें मला शिकवावयास सिद्ध होसील तोंपर्यंत मी वाट पाहतों परंतु लवकरच खडा फूल घड्याळ आणि टिपू यांविषयीं अणखी कांहीं सांगसील तर बरें, कां कीं त्या गोष्टी ऐकण्याची मला फार आवड आहे.

गंगा.—आतां तुझी व रमीची निजण्याची वेळ झाली, जर तूं चांगला चालसील तर त्यांविषयीं उद्यां तुजसीं अणखी संभाषण करीन.

---

## दुसऱ्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. ज्यांस तोंड कान नाहींत त्यांस कांहीं बोलतां किंवा शिकतां येईल कीं काय?

२. कुत्र्याला बोलतां येतें काय? घोड्याला? गाईला? मेंढराला येतें काय?

३. अणखी कोणत्या पशूंला तोंड ओंठ दांत जीभ असून बोलतां येत नाहीं?

४. कुत्र्याला कांहीं स्वर काढितां येतो काय? अणखी कोणत्या पशूंला स्वर काढितां येतो पण बोलतां येत नाहीं, तें सांग.

५. कुत्र्याला वाचणें शिकतां येईल काय? घोड्याला येईल? गाईला येईल? मेंढराला येईल काय?

६. अणखी कोणत्या पशूंस वाचणें शिकतां येत नाहीं, तें सांग?

७. तुझ्यानें कुत्र्याला काय शिकववतें?

८. जें तुला समजतें आणि कुत्र्यास समजत नाहीं तें काय?

९. जें तुला शिकतां येईल आणि कुत्र्याला शिकतां येत नाहीं तें काय?

१०. कोणत्या गोष्टी तुला नेहमी शिकतां शिकतां येतात?

११. कुत्रा नेहमी शिकेल तर त्याला येईल कीं काय?

१२. चोरी करणें हें पाप आहे असें कुत्रीं समजतात काय?

१३. पुण्यपापाविषयीं कुत्रीं कांहीं समजतात काय? अणखी कोणते पशु पुण्यपापाविषयीं कांहीं समजत नाहींत?

१४. तुझा आणि पशु पक्षी इत्यादिकांचा काय भेद आहे ?
१५. जेव्हां तूं वाईट करितोस तेव्हां तुला कसें वाटतें ?
१६. जेव्हां तूं बरें करितोस तेव्हां तुला कसें वाटतें ?
१७. खडा गुलाबाचें फूल घड्याळ व कुत्रा यांहून तूं फार भिन्न आहेस काय ?
१८. अणखी कोणत्या वस्तू व जीवजंतु यांहून तूं फार भिन्न आहेस ?
१९. ह्या सर्वांहून तूं असा भिन्न आहेस याचें कारण काय, हें जाणण्याची इच्छा तुला आहे काय ?
२०. कोणत्या रीतीने त्यांस शिकवावें हें लाहान मुलांस चांगलें ठाऊक आहे कीं काय ? तर कोणास चांगलें ठाऊक आहे ?

---

## संभाषण ३.

दुसऱ्या दिवसीं न्याहारी झाल्यानंतर गंगाबाई आपल्या दोन्ही मुलांस घेऊन बागांत फिरावयास गेली. त्या सकाळीं हवा फार चांगली होती, आभाळ निवळ होतें, सूर्याचीं किरणें चकचकीत पडलीं होतीं, लाहान टिपू त्यांबरोबर धांवत फिरत होता. रमीने आईला ह्मटलें, अगे बाई, मला जाऊन कांहीं ताजीं फुलें आणूं दे, मग गोविंदानें जीं दिल्हीं त्यांबरोबर पेल्यांत ठेवीन. आई बोलली, जा मुली. मग रमी पळत पळत फुलें आणावयास गेली, आणि तिच्यामागें टिपूहि धांवत गेला. गंगाबाई व गोविंद आपली फेरी झाल्यावर खालीं बसून संभाषण करूं लागलीं.

**गोविं.**—आई, तूं मला सांगितलेंस कीं, अवकाश होईल तेव्हां खडा गुलाबाचें फूल घड्याळ आणि माझा लाहान कुत्रा टिपू यांविषयीं अणखी कांहीं सांगेन, याची तुला आठवण असेल. पाहा आतां टिपू रमीच्यामागें कसा धांवत गेला.

**गंगा.**—होय, जर तूं चांगला चालसील तर सांगेन, असें मी बोललें याची आठवण आहे; आणि तूं बरें वर्त्तलास ह्मणून आपण घरीं जाऊं तोंपर्यंत कांहीं संभाषण करूं.

**गोविं.**—आई, काल सांजे जी गोष्ट सांगितलीस तिचा आज सकाळीं विचार करितां, मनांत आलें कीं, रमी व खडा यांचें फार अंतर आहे; ती त्यासारिखी अगदी नाहीं.

**गंगा.**—पण गोविंदा, रमी कांहीं प्रकारें खड्यासारिखी नाहीं काय?

**गोविं.**—कसें आई, तुझी गोष्ट मी समजलों नाहीं.

**गंगा.**—तुला खडा उचलतां येईल बरें ?

**गोविं.**—होय बाई, तो फार हलका आहे.

**गंगा.**—बरें, तुला रमी उचलतां येती?

**गोविं.**—होय, एका दिवसीं तिला उचलिलें, पण ती फार पुष्ट व भारी आहे, यामुळें श्रमानें उचलिलें. बाई, ती मजपेक्षां जड आहे, शनवारीं दुपारीं राघोबाशेटानें आह्मा दोघांस आपल्या मोठ्या तागडींत घालून जोखिलें.

**गंगा.**—तर तिचें तुजपेक्षां अधिक वजन आहे. जर रमी व खडा यांस राघोबाशेट तोलील, तर कोणता अधिक भरेल ?

**गोविं.**—रमीच्या वजनास पुष्कळ खडे लागतील.

**गंगा.**—तर एका खड्याच्या वजनापेक्षां तिचें वजन फार अधिक आहे?

**गोविं.**—होय, बाई.

**गंगा.**—तर रमीला जें आहे, तें खड्यालाहि आहे ह्मणजे दोघांसहि जडत्व आहे.

**गोविं.**—हें खरें बाई, रमी व खडा यांचा सारिखेपणा कांहीं प्रकारें आहे ; असें आतां समजलों.

**गंगा.**—खडा व रमीचा हात चांचपला असतां कोणता कठीण आहे.

**गोविं.**—खडा बाई ; तथापि पुष्टपणामुळें रमीचा हात कठीणसा आहे.

**गंगा.**—तर रमी व खडा यांस कठीणपणा आहे काय?

**गोविं.**—होय बाई, पुनः पाहतां तीं कांहीं प्रकारें सारिखीं आहेत.

**गंगा.**—पाहा गोविंदा, रमी कुपणाजवळ उभी राहत आहे, तिची सावली कुपणावर पडली आहे ; ती तुला दिसती काय?

**गोविं.**—होय, बाई ; ती व तिची सावली सारिखीच आहे. जर माझ्याजवळ कागद व लेखणी असती तर त्या सावलीवरून तिची आकृति काढायास येती, असें मला वाटतें.

**गंगा.**—एथें शिस्याची लेखणी व कागद आहे, ती घे, आणि ती आकृति काढतां येती कीं काय पाहा.

**गोविं.**—पाहतों. [ती लेखणी व कागद घेऊन गोविंदानें सावली आंकली].

**गंगा.**—त्वां चांगली काढली ; ती रमीच्या आकाराबरोबर आहे, आतां खड्याची आकृति काढ.

[गोविंद खड्याचा आकार काढतो.]

**गोविं.**—आई, खड्याची आकृति गोळाकार आहे, परंतु रमीची कसी आहे, हें मला सांगतां येत नाहीं. ती गोळाकार नाहीं आणि चौकोनी नाहीं, तिची आकृति तिच्यासारिखीच आहे.

**गंगा.**—तर, रमी आणि खडा या दोघांस आकार आहे.

**गोविं.**—खरें बया, हीं दोघें या तीन गुणानी कांहीं सारिखीं आहेत.

**गंगा.**—खड्याचा रंग कसा आहे ?

**गोविं.**—सफेत आहे. अगे आई, जें तूं मला सांगणार तें मी समजलों, असें कीं, रमी व खडा यांस रंग आहे· पण खड्यापेक्षां रमीचा रंग फार सुंदर आहे. रमी नाना प्रकारच्या रंगांची आहे. तिचे केंस व डोळे काळे, मान आणि हात गौरवर्ण आणि दांत सफेत. तिचे गाल कसे आरक्त आहेत. बाई, ही मुलगी फार सुंदर दिसती नाहीं बरें ?

**गंगा.**—तुझी बहीण चांगली मुलगी होईल असी माझी आशा आहे, कां कीं वाईट असतां सुरूप असणें यापेक्षां चांगलें असतां कुरूप असणें हें बरें आहे. अरे गोविंदा, रमी व खडा यांचा किती गुणानी सारिखेपणा आहे, हें आतां मला सांग.

**गोविं.**—तीं जडपण, कठीणपण, आकृति, रंग, या चार गुणानी कांहीं सारखीं आहेत.

**गंगा.**—अरे गोविंदा,जर एक सिंह आपल्या मोठ्या तोंडानें रमीला धरील, तर तिचा देह विदारून त्याचे अनेक तुकडे करितां येईल कीं नाहीं ?

**गोविं.**—बाई, या गांवाजवळ सिंह आहेत काय ?

**गंगा.**—नाहीं नाहीं, मुला ; त्यांचें तूं भय धरूं नको. ते तुला किंवा रमीला उपद्रव करणार नाहींत, कां कीं ते फार दूर राहतात.

गोविं.—तर मला सुख वाटतें, आई.

गंगा.—जर तूं हातोडा घेऊन खड्याला फोडसील, तर त्याचें काय होईल?

गोविं.—तुकडे होतील.

गंगा.—होय मुला, तुकडे ह्मणजे विभाग होतील.

गोविं.—मला वाटतें कीं, जर सिंह माझ्या बहिणीला धरील, तर तिच्या देहाचे हजारों विभाग होतील.

गंगा.—तर, रमी व खडा या दोघांस विभाग आहेत.

गोविं.—होय बया, पण खड्यापेक्षां रमीचे फार विभाग आहेत.

गंगा.—अगे रमा गोविंदा, यारे, घरीं जाऊन अभ्यास करण्याची वेळ झाली. मग तीं घरीं गेलीं, गंगाबाई त्यांस घेऊन बसण्याच्या खोलींत जाऊन बसली आणि त्यांस वाचणें शिकवूं लागली.

---

## तिसऱ्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तूं कांहीं खड्यासारिखा आहेस काय?

२. खड्यांत कांहीं जडत्व आहे काय? तूं किती जड आहेस?

३. तूं अधिक जड किंवा खडा अधिक आहे?

४. खड्यासारिखें जसें तुला तसें अणखी कोणत्या वस्तूला जडत्व आहे, हें सांग.

५. खड्याला कठीणपण आहे काय? अणखी कोणत्या वस्तूला कठीणपण आहे?

६. तुला कठीणपण आहे काय?

७. तुझ्या शरीराचा कोणता अवयव अधिक कठीण आहे?

८. तुझा कोणता अवयव खड्याएवढा कठीण आहे काय?

९. खड्यासारिखें जसें तुला तसें अणखी कोणत्या वस्तूला कठीणपण आहे?

१०. लाहान मुलाची सावली त्वां कधीं पाहिली आहेस काय?

११. लाहान मुलाच्या सावलीचा आकार तुला काढितां येतो काय? जर तूं त्याच्या सावलीचा आकार काढसील तर त्याच्या चित्राप्रमाणें येईल काय?

१२. लाहान मुलाचा आकार काय आहे, ह्मणून समजतोस ?

१३. घोड्याचा आकार तुला काढितां येतो काय ? तो तुझ्या आकारा-सारिखा येईल काय ?

१४. खड्याचा आकार तुला काढवतो काय ?

१५. खड्यासारिखा जसा तुला आकार आहे, तसा अणखी कोणाला आहे हें सांग.

१६. खड्यासारिखें तुला जडत्व व आकार आहेत, तसा तुला अणखी कोणता गुण आहे ?

१७. खड्यासारिखा रंग जसा तुला आहे, तसा अणखी कोणाला आहे ?

१८. जर तूं खडा फोडसील तर त्याचें काय होईल ?

१९. जर सिंह तुला धरून फाडील तर तुझें काय होईल ?

२०. खड्यासारिखे जसे तुला विभाग आहेत, तसे अणखी कोणाला आहेत हें सांग.

---

## संभाषण ४.

गंगाबाईनें रमीस व गोविंदास एक तासपर्यंत शिकविल्यावर सांगि-तलें कीं, आतां थोडासा वेळ खेळा. रमी आपली लाहान गाडी घेऊन तींत आपली बाहुली बसवून ओढीत घरासमोरच्या अंगणांत फिरावयास गेली. पण गोविंद खेळावयास गेला नाहीं. पुन्हा आईसीं संभाषण करावें असी त्याची इच्छा होती, तेव्हां तो बोलला, बया, जर तूं खड्या-विषयीं सांगसील तर बरें. तें तिनें मान्य केलें, आणि तो तिच्याजवळ उभा राहून ऐकूं लागला.

**गंगा.**—गोविंदा, तुझी बहीण व खडा यांचा किती गुणानी सारिखेपणा आहे, हें मला सांग.

**गोविं.**—याचें स्मरण मला आहे असें वाटतें बाई, ह्मणजे वजन, कठीण-पण, आकार, रंग, विभाग, अशानी तीं सारिखीं आहेत.

**गंगा.**—पाहा गोविंदा, त्वां रमीला गुलाबाचें फूल दिलें होतें तें अझून टवटवीत आहे, फारसें कोमलें नाहीं.

**गोविं.**—आई, तिने त्या पेल्यांत दोनतीनदां ताजें पाणी घातलें, ह्मणून तें कोमलें नाहीं, असें मला वाटतें.

**गंगा.**—बरें गोविंदा, गुलाबाचें फूल आणि तुझी लाहान बहीण हीं किती गुणानी सारिखीं आहेत, हें विचार करून मला सांग.

**गोविं.**—आई, गुलाबाचें फूल आणि रमी कित्येक गुणानी सारिखीं आहेत, हें मला सांगतां येतें; कां कीं तीं दोघें कांहीं गुणानी खड्या-सारिखीं आहेत.

**गंगा.**—बरें, तर मला सांग.

**गोविं.**—रमी व फूल आणि खडा यांस वजन आकार रंग आणि विभाग आहेत.

**गंगा.**—ठीक, मुला; पण गुलाबाचें फूल व खडा यांतून कोणतें विशेषें रमीसारिखें आहे?

**गोविं.**—गुलाबाचें फूल, आई.

**गंगा.**—कां बरें?

**गोविं.**—कारण कीं खड्यापेक्षां त्याचें रूप रमीसारिखें आहे, आणि तिच्यासारिखेंच त्याला नाना प्रकारचे सुंदर रंग व बहुत अवयव आहेत.

**गंगा.**—ठीक, पण ज्या गुणाने गुलाबाचें फूल रमीसारिखें आहे, पण खडा नाहीं, तो सांगतां येईल बरें?

**गोविं.**—या प्रश्नाचें उत्तर माझ्यासारिख्या लाहान मुलास करणें कठीण आहे.

**गंगा.**—खरें, पण प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी विचार कसा करावा हें शिकलें पाहिजे.

**गोविं.**—बरें बाई, मी विचार करीन, परंतु कांहीं अवकाश पाहिजे.

**गंगा.**—जितका अवकाश तुला पाहिजे तितका घे. [गोविंद कांहीं वेळ विचार करून ह्मणतो.]

**गोविं.**—बाई, हें फूल वाढतें, कारण कीं तें पूर्वी लाहान कळी होतें,

परंतु वाढतां वाढतां तें मोठें फूल झालें, ह्मणून वाढणें हा गुण असेल, नाहीं तर दुसरा मला ठाऊक नाहीं.

**गंगा.**—गोविंदा, तूं खरें ह्मणतोस. रमीहि फार लाहान बाळ होती आणि पुढें ती उफलेल्या फुलासारिखी वाढत वाढत मोठी प्रौढ बायको होईल. रमी व फूल या दोघांसहि जीव आहे.

**गोविं.**—बाई, तर रमीचा व फुलाचा जीव सारिखाच आहे बरें?

**गंगा.**—नाहीं नाहीं. फार वेगळा आहे, फुलास सुखदुःख लागत नाहीं. जरीं त्याची एक पांकळी तोडसील तरीं त्याला दुःख होत नाहीं, परंतु रमीला सुखदुःख लागतें, तिच्या डोक्यापासून एक केंस उपटसील तर तिला दुःख वाटेल. आणि फुलास इकडे तिकडे चालतां येत नाहीं, पण रमीला चालतां धांवतां येतें.

**गोविं.**—गुलाबाच्या फुलाचा व जुईच्या फुलाचा जीव सारिखाच नाहीं बरें?

**गंगा.**—होय, तो जीव सर्व फुलें, झाडें, धान्यें, फळें, गवत, इत्यादिकांत सारिखाच आहे.

**गोविं.**—आई एका दिवसीं त्वां असें सांगितलें कीं, या सर्व वस्तूंस वनस्पति ह्मटलें आहे, याची आठवण आहे.

**गंगा.**—होय, आणि या सर्वांच्या जिवास वनस्पतींचा जीव ह्मणजे अचेतन जीव ह्मणतात.

**गोविं.**—बाई, जेव्हां आपण टिपूला मारितों तेव्हां त्याला दुःख लागतें, आणि त्याला इकडे तिकडे फिरतां येतें तर त्याचा व रमीचा जीव सारिखाच नाहीं काय?

**गंगा.**—होय, मुला; आणि कुत्रीं, मांजरें, घोडीं, गायी, मेंढरें, इत्यादि सर्व पशु पक्षी यांचाहि जीव तसाच आहे आणि यांचा जीव मनुष्याच्या जीवासारिखा आहे, आणि याला सचेतन ह्मणतात.

**गोविं.**—तर माझा जीव अचेतन नव्हे, सचेतन आहे.

**गंगा.**—खरें, मुला. पण आतां याविषयीं बोलणें पुरें. कांहीं वेळ रमी-

बरोबर खेळावयास जा. मग तुझा दोघांस दुसरा धडा देण्याकरितां बोलावीन.

---

## चवथ्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. किती गुणानी तूं खड्यासारिखा आहेस?
२. किती गुणानी तूं गुलाबाच्या फुलासारिखा आहेस?
३. खडा व गुलाबाचें फूल यांमध्यें कोणतें विशेषें तुझ्यासारिखें आहे?
४. कोणत्या गुणाने तूं गुलाबाच्या फुलासारिखा आहेस पण खड्यासारिखा नाहीं.
५. फूल वाढतें काय? तें फार लाहान असतां त्याला काय ह्मणतात?
६. तूं फार लाहान होतास तेव्हां तुला काय ह्मणत?
७. तूं फार वाढलास कीं काय? आतां वाढत आहेस कीं काय?
८. फुलासारिखा जसा जीवंत असून वाढतोस तसें अणखी कोणत्या वस्तू वाढतात, हें सांग?
९. तुझा जीव गुलाबाच्या जीवासारिखा आहे कीं काय?
१०. फुलास सुखदुःख लागतें कीं काय? आणि तुला लागतें काय?
११. फुलास चालतां येतें काय? तुला येतें काय?
१२. अणखी कोणत्या वस्तूंस चालतां येत नाहीं आणि सुखदुःख लागत नाहीं, हें सांग.
१३. अणखी कोणत्या वस्तूंस सुखदुःख लागतें आणि चालतां येतें?
१४. फुलें, झाडें, गहूं, भात, गवत, इत्यादिकांस काय ह्मणतात?
१५. त्यांच्या जीवाला काय ह्मणतात?
१६. कुत्र्याला सुखदुःख लागतें कीं काय?
१७. त्याला जागोजागीं फिरतां येतें कीं काय?
१८. कुत्र्याचा जीव तुझ्या जीवासारिखाच आहे कीं काय?
१९. जे श्वासोश्वास टाकितात आणि ज्यांला फिरतां येतें त्यांस काय ह्मणतात?

२०. तुझ्या व सर्व वळवळणाऱ्यांच्या जिवास काय ह्मणतात?
२१. तुझा जीव वनस्पतींच्या जीवासारिखा आहे काय?

---

## संभाषण ५.

रमी खेळण्याने फार दमली आणि संध्याकाळीं चाहा पितां झोंपी गेली, तेव्हां तिला आईने माडीवर नेऊन निजविलें. रमी चांगली मुलगी होती, दिव्यावांचून ती अंधारांत निजत असे, ह्मणून तेथला दिवा घेऊन आई खालीं आली. मग गंगाबाई गोविंदास घेऊन पुस्तकांच्या खोलींत गेली आणि ह्मणाली, गोविंदा, तुला चित्रें पाहाण्याची इच्छा आहे कीं काय? तो ह्मणाला, आई, त्यापेक्षां तुसीं संभाषण करावें हें बरें वाटतें. मग तीं उभयतां रुजाम्यावर बसून, आई मुलासीं बोलूं लागली.

**गंगा.**—किती गुणानीं गुलाबाचें फूल रमीसारिखें आहे, याची तुला आठवण आहे काय? पाहा मुला.

**गोविं.**—पाहतों, बाई. वजन, कठीणपण, आकार, रंग, अवयव, आणि जीव या गुणानीं गुलाबाचें फूल रमीसारिखें आहे.

**गंगा.**—रमी व फूल यांच्या जिवांचा भेद काय?

**गोविं.**—रमीचा जीव सचेतन आहे आणि फुलाचा अचेतन इतकाच भेद आहे.

**गंगा.**—बरें गोविंदा, आतां रमी व घड्याळ हीं किती गुणानीं सारिखीं आहेत हें सांग बरें?

**गोविं.**—हें मला सांगतां येईल असें वाटतें बाई.

**गंगा.**—बरें, तर सांग.

**गोविं.**—वजन, कठीणपण, आकार, रंग, व अवयव, यांकडून तीं सारिखीं आहेत.

**गंगा.**—बरें, अणखी कांहीं गुणानीं घड्याळ रमीसारिखें नाहीं काय?

**गोविं.**—याविषयीं कांहीं वेळ विचार करावयाचा, बाई.

**गंगा.**—ठीक, मुला. जेव्हां कठीण प्रश्नाचें उत्तर तुला द्यावयाचें आहे तेव्हां थोडा वेळ विचार करावा.

[गोविंद दोन तीन पळें विचार करून बोलतो.]

**गोविं.**—बाई, रमीच्या शरीरांत मला पाहतां येतें तर बरें.

**गंगा.**—असें जर तुला होईल तर काय?

**गोविं.**—तर घड्याळांत जीं बारीक चक्रें आहेत त्यांसारिखीं तिच्या शरीरांत कांहीं चक्रें फिरतां फिरतां दिसतील, असें मला वाटतें.

**गंगा.**—तुला असें कशावरून वाटतें, गोविंदा?

**गोविं.**—काल घड्याळावर जे लाहान कांटे मला दाखविले कीं नाहीत, ते माला आतां पाहूं दे.

**गंगा.**—घे हें घड्याळ.

**गोविं.**—बाई, हे दोन लाहान कांटे फिरतां किती तास वाजले हें दाखवितात, त्यांला काय ह्मणतात?

**गंगा.**—त्यांला हात * ह्मणतात.

**गोविं.**—हें आश्चर्य आहे, बाई. असेंच मी त्यांला ह्मणणार होतों आणि तुला बोलणार होतों कीं, जसें रमीच्या शरीरांत हात चालविणारें कांहीं यंत्र आहे तसें या घड्याळांत हात फिरविणारीं चक्रें आहेत.

**गंगा.**—रमीच्या शरीरांत हात चालविणारें काय आहे, हें आपण विचार करून पाहूं.

**गोविं.**—हें आपणास कधीं समजणार नाहीं.

**गंगा.**—कां, माझ्या मुला?

**गोविं.**—आहा बाई, माझ्या लाहान बहिणीचा जीव घेतल्यावांचून शरीर फाडून आंत पाहणें घडणार नाहीं.

**गंगा.**—असें आह्मी कधीं करणार नाहीं. पण पुलापलीकडे एक लाहान घर आहे तेथें मागल्या हिंवाळ्यांत एक लाहान मुलगा मेला, त्याचें प्रेत पुरल्या अगोदर पाहावयाकरितां मी तुला घेऊन गेलें होतें, याची आठवण तुला आहे काय?

**गोविं.**—होय बाई, त्या मुलाचें प्रेत पाहून जें दुःख मला झालें तेवढें पूर्वी

---

* इंग्लिश भाषेंत घड्याळाचे कांटे हात असे ह्मटले आहेत.

कधीं झालें नव्हतें. म्या त्याच्या गालास हात लाविला तेव्हां तो थंडगार लागला, त्याचा लाहान हात धरिला तो ताठला होता. त्याचा श्वासोश्वास बंद झाला होता. त्याच्याने पाहावत ऐकवत हालवत नव्हतें. बाई, त्याला सुखदुःख लागत होतें काय ?

**गंगा.**—नाहीं, मुला; खड्यासारिखें त्याला अगदी नाहीं.

**गोविं.**—तो लाहान जगू फार चांगला होता, बाई. त्याबरोबर मी कधींमधीं खेळत असें. तो मेला याकरितां मी फार खेद पावलों, बाई. त्याला भुईमध्यें अंधाऱ्या गुहेंत कां ठेविलें बरें ?

**गंगा.**—याविषयीं मी तुला दुसऱ्या वेळेस सांगेन. तो कोणत्या दुखण्याने मेला हें समजावें ह्मणून गाडल्यापूर्वीं वैद्यानी त्याचें शरीर फाडून पाहिलें.

**गोविं.**—बाई, जेव्हां मी मरेन तेव्हां माझें शरीर फाडितील कायगे ?

**गंगा.**—हें मला ठाऊक नाहीं, पण कधींमधीं वैद्य मेलेल्या मनुष्याचें शरीर फाडितात ह्मणजे कोणत्या प्रकारच्या रोगाने तो मेला हें समजून तोच रोग दुसऱ्याला झाला तर त्या रोगाचा चांगला उपाय समजावा.

**गोविं.**—मला वाटतें कीं, जेव्हां ते प्रेत फाडितात तेव्हां आंतील सर्व बारीक चक्रें जीं जिवंतपणीं शरीराला चालवितात, तीं ते पाहत असतील.

**गंगा.**—होय, मुला. जेव्हां तूं मोठा होसील तेव्हां शरीरांत काय आहे हें शिकतां येईल. परंतु घड्याळांतील बारीक चक्रांप्रमाणें शरीरांत चक्रें नाहींत; तथापि बहुत अवयव आहेत ते एकमेकांस हालवून संपूर्ण शरीरास चालवितात. घड्याळांतील चक्रांस चालविणारें काय आहे, हें तूं जाणतोस बरें ?

**गोविं.**—ती कमाण आहे, किल्लीने चक्र फिरवून सांखळी गुंडाळिली असतां, त्या कमाणीच्या जोराने घड्याळ चालतें, असें तूं मला सांगितलेंस ना बाई ?

**गंगा.**—होय, मुला; घड्याळास स्वतां चलनशक्ति नाहीं; किल्ली लावून सांखळी गुंडाळिली नसतां तें बंद होऊन कांटे चालणार नाहींत.

**गोविं.**—बाई, स्वतां सर्वदां चालणारें असें यंत्र कोणाच्याने करवेल काय?

**गंगा.**—नाहीं, लाडक्या; असी कला कोणास आहे हें मी कधीं ऐकिलें नाहीं; परंतु रमीचे हात चालविणारें काय आहे?

**गोविं.**—बाई, जसें घड्याळांतील चक्रें एकमेकांस हालवून कांट्यांला चालवितात, तसें रमीच्या आंतील अवयव परस्परांस हालवून तिचे हात हालवितात; असें नाहीं काय?

**गंगा.**—गोविंदा, याविषयीं उद्यां मी तुला अणखी सांगेन, आतां तुझ्या निजण्याची वेळ आली.

---

## पांचव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. किती गुणानी तूं खड्यासारिखा आहेस?
२. गुलाबाच्या फुलासारिखा किती गुणानी तूं आहेस?
३. तुझा जीव व गुलाबाच्या फुलाचा जीव यांचा भेद काय आहे?
४. राताळ्याचा जीव व घोड्याचा जीव यांचा भेद काय आहे?
५. अणखी कोणास सचेतन जीव आहे, हें मला सांग.
६. कोणास अचेतन जीव आहे, हें सांग.
७. किती गुणानी तूं घड्याळासारिखा आहेस?
८. घड्याळांत जे दोन कांटे फिरत असतां किती वाजले हें दाखवितात, त्यांस काय ह्मणतात?
९. त्यांस फिरविणारें काय आहे?
१०. तुझे हात चालविणारें शरीरांत कांहीं आहे कीं काय?
११. तुझ्या शरीरांत कांहीं बारीक चक्रें आहेत, असें तुला वाटतें काय?
१२. घड्याळांत चक्रें चालविणारें काय आहे?
१३. घड्याळ चालण्याकरितां कमाणीस काय करावें लागतें?
१४. घड्याळ स्वतां चालेल काय?
१५. घड्याळ कशाने बंद होतें?
१६. स्वतां अखंड चालणारें असें कोणाच्याने कांहीं करवतें?

१७. आंत चक्रें असून घड्याळासारिखें चालणारें अणखी कांहीं आहे काय?

१८. तुझ्यासारिखें दुसरें कांहीं स्वतां चालेल काय?

---

## संभाषण ६.

दुसऱ्या दिवसीं मोठ्या पाहांटेस न्याहारीपूर्वी आपल्यासंगतीं फिरावयाला यावें ह्मणून गंगाबाईनें रमी व गोविंद यांस बोलाविलें. तीं घरांतून निघालीं तेव्हां सूर्य उगवत होता. दंव गवतावर चमकत होतें. पक्षी मधुर मधुर स्वर करीत होते. चहुंकडे सर्व रमणीय दिसत होतें. आणि रमी व गोविंद चांगलीं ह्मणून सुखी होतीं, असें पाहून गंगाबाईस आनंद झाला. सुमारें अर्ध कोस गेल्यावर रमी ह्मणती, बाई, मी दमलें. मग तीं तिथें विसांवा घेण्यासाठीं एका मोठ्या दगडावर बसलीं. तेव्हां आईनें आपल्या पिसवींतून एक चित्रांची वही काढून पाहावयाकरितां रमीच्या हातीं दिल्ही. मग आई व गोविंद संभाषण करूं लागलीं.

**गोविं.**—बाई, काल तूं मला सांगितलेंस कीं, मी उद्यां घड्याळ व रमी यांविषयीं तुला अणखी कांहीं सांगेन.

**गंगा.**—मुला, रमीचे हात हालविणारें तिच्या शरीरांत काय आहे, हें समजण्यासाठीं आपण विचार करीत होतों.

**गोविं.**—होय बाई, आणि मला वाटलें कीं, जसीं घड्याळांतील चक्रें एकमेकांस हालवून कांट्यांला चालवितात, तसें रमीच्या शरीरांत हात चालविणारें कांहीं असेल.

**गंगा.**—पण जर घड्याळांतील कमाण चक्रांस न चालविती तर तीं चालत नसतीं.

**गोविं.**—तसी रमीच्या शरीरांतहि कमाण आहे कीं काय, बाई?

**गंगा.**—हें समजण्यासाठीं कांहीं विचार केला पाहिजे, जरीं असली तरीं घड्याळांतील कमणीप्रमाणें नाहीं, कारण ती पोलादाची आहे, पोलादासारिखें रमीच्या शरीरांत कांहीं नाहीं.

**गोविं.**—खरें, बाई. आणि प्रतिदिवसीं घड्याळांतील कमाणीस किल्ली

दिल्ही पाहिजे, नाहीं तर ती चक्रांला चालविणार नाहीं. तसें रमोला कोणी किल्ली देत नाहीं, हें मला पक्कें ठाऊक आहे.

**गंगा.**—गोविंदा, आपला उजवा हात आपल्या उजव्या कानाला लाव.

**गोविं.**—लाविला, बाई.

**गंगा.**—बरें, आतां डाव्या कानास लाव.

**गोविं.**—लाविला. पण बाई, मला असें करावयास कां सांगितलेंस?

**गंगा.**—थोडासा दम धर, मी तुला सांगतें. आतां डावा हात डाव्या कानास लाव.

**गोविं.**—तो तेथें चालला, बाई.

**गंगा.**—बरें, आतां डावा हात उजव्या कानास लाव.

**गोविं.**—लाविला. तो किती लवकर चालतो, बाई.

**गंगा.**—याला चालविणारें काय आहे?

**गोविं.**—तो स्वतां चालतो, बाई.

**गंगा.**—लाहान जगू मेल्यानंतर त्याचा हात स्वतां त्याच्या कानास चालेल कीं काय?

**गोविं.**—नाहीं, बाई.

**गंगा.**—कां, गोविंदा?

**गोविं.**—बाई, तो मेला यास्तव हात ताठला आणि हालेना पण माझा हात जीवंत आणि लवका आहे यास्तव तो हालतो.

**गंगा.**—आतां तुझा हात कां हालत नाहीं?

**गोविं.**—माझी इच्छा नाहीं झणून तो हालत नाहीं.

**गंगा.**—जर तूं आपला उजवा हात आपल्या नाकास लावायास इच्छिसील तर लागेल कीं काय?

**गोविं.**—होय, बाई; तो माझ्या इच्छेप्रमाणें लवकर चालतो.

**गंगा.**—तर दोन्ही हात पुढें लांब व्हावे असी इच्छा कर.

**गोविं.**—ते गेले, बाई.

**गंगा.**—आतां मागे व्हावे असी इच्छा कर.

**गोविं.**—हां, ते तसेच गेले.

**गंगा.**—हात हालविण्याची इच्छा लाहान जगूला करवत होती काय?

**गोविं.**—जेव्हां तो जिवंत होता, तेव्हां त्याला करवत होती. तो माझ्या-बरोबर चेंडू खेळत असे, तेव्हां बहुतवेळा हात हालवीत असे; पण मेल्यावर कशाविषयींहि इच्छा करवत नाहीं; त्याला हात हाल-विण्याची इच्छा होतच नाहीं.

**गंगा.**—घड्याळाला कांटे हालविण्याची इच्छा करवती कीं काय?

**गोविं.**—घड्याळास कशाविषयींहि इच्छा होतच नाहीं. त्याला मुळींच वि-चार नाहीं. किल्ली दिल्ही नसतां तें बंद पडतें, तर तें मेलेल्या जगू-सारिखें आहे.

**गंगा.**—घड्याळ बंद झालें असतां पुन्हा किल्ली दिल्ही तर चालेल कीं काय?

**गोविं.**—होय बाई, चालेल.

**गंगा.**—घड्याळास आपली किल्ली फिरवितां येईल काय?

**गोविं.**—नाहीं, बाई; त्यास किल्ली दिल्ही पाहिजे, नाहीं तर कमाण चक्रांस फिरविणार नाहीं.

**गंगा.**—मी त्यास कशाने फिरदितें बरें?

**गोविं.**—हाताने.

**गंगा.**—माझ्या हाताकडून असें काय करवितें?

**गोविं.**—किल्ली द्यावी असी इच्छा तुझ्या मनांत होती तेव्हां हात तें करितो.

**गंगा.**—गोविंदा, इकडे पाहा, माझें घड्याळ बंद झालें, त्याची कमाण व चक्रें चालत नाहींत. तूं घेऊन किल्ली दे.

**गोविं.**—बाई, तें फुटेल असें भय वाटतें.

**गंगा.**—किल्ली कसी द्यावी हें मी तुला दाखवितें. (किल्ली कसी द्यावी हें गंगाबाईने गोविंदास दाखविलें, मग त्याने किल्ली देऊन बरोबर फिरविली.)

**गोविं.**—बाई, घड्याळ पुन्हा चालूं लागलें.

गंगा.—खरें, कां कीं त्वां त्याची किल्ली फिरवून सांखळी गुंडाळिली, ती कशानें गुंडाळिली बरें ?

गोविं.—किल्लीनें.

गंगा.—किल्ली कशानें फिरविली ?

गोविं.—माझ्या हातानें.

गंगा.—तुझा हात आपणच चालला कीं काय ?

गोविं.—नाहीं, बाई; जसी म्या इच्छा केली तसी त्यानें किल्ली फिरविली.

गंगा.—तुझा पाय चालावा असी जर त्वां इच्छा केली तर तो चालेल कीं काय ?

गोविं.—होय, बाई; पाहा तो चालतो.

गंगा.—दुसरे अवयव हालविण्याची इच्छा करवतो कीं काय ?

गोविं.—होय, बाई; उभें राहणें, खालीं बसणें, चालणें, उडी मारणें, व चेंडू टाकणें, गाडी ओढणें, आणि होय नाहीं ह्मणण्यासाठीं डोकें हालविणें, आणि डोळे मिटणें, उघडणें, व खाणेंपिणें, आणि जें कांहीं मनास वाटेल तें सर्व करणें मला होईल.

गंगा.—बरें, मुलानो, आतां परत जाण्याची वेळ झाली. रमा, ती वही मला दे. तूं चांगली मूल आहेस, कां कीं गोविंद व मी संभाषण करीत असतां तूं ती वही पाहत बसलीस. चला, आतां न्याहरीला घरीं जाऊं.

---

## साहाव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तुझा देह चालविणारें घड्याळाच्या कमाणीसारिखें शरीरांत कांहीं आहे काय ?

२. तुझा उजवा हात डोकीवर ठेव. तुझा डावा हात डोकीवर ठेव. तुझा उजवा हात डाव्या डोळ्यावर ठेव. तुझा डावा हात उजव्या डोळ्यावर ठेव.

३. तुझे हात कशानें चालविले ?

४. त्वां कधीं प्रेत पाहिलें काय ?
५. प्रेताला हात हालवितां येईल काय? कां बरें ?
६. तुझा पाय आतां कां चालत नाहीं ?
७. पाय चालावा असें इच्छिसील तर चालेल काय ?
८. हात डोक्याकडे जावा असी इच्छा कर.
९. हात किंवा दुसरे अवयव हालविण्याची इच्छा प्रेताला होईल कीं काय ?
१०. जिवंत असतां मनुष्याला आपले हात हालविण्याची इच्छा करवेल कीं काय ?
११. घड्याळ्याला आपले कांटे फिरविण्याची इच्छा करवेल काय ?
१२. घड्याळ बंद झाल्यावर पुन्हा चालण्यासाठीं काय केलें पाहिजे ?
१३. घड्याळाला स्वतां किल्ली फिरवितां येती काय ?
१४. माणूस कशानें घड्याळाची किल्ली फिरवितो ? हाताला काय फिरवितें ?
१५. ह्या घड्याळास किल्ली दे. तें चालत आहे काय ? तें कशानें चालतें ?
१६. त्वां कशानें घड्याळ चालतें केलें ? कशानें किल्ली दिल्ही ?
१७. तुझा हात आपणच चालला काय ?
१८. तुझ्या अंगाचे कांहीं अवयव हालविण्याची इच्छा कर.
१९. दुसरा कांहीं अवयव हालविण्याची इच्छा करवती काय ?

## संभाषण ७.

गंगाबाईच्या बागेंत एक चांगला मंडप जो सुंदर फुलांच्या वेलींनें वेष्टित होता, तो सावलीमुळें थंड जागा होती. त्या मंडपांत बैठकी होत्या, तेथें गंगाबाई आपल्या लाहान लेंकरांसुद्धां बसत असे. जेवल्यानंतर गोविंद व त्याची आई मंडपांत जाऊन बैठकीवर बसलीं. मग गोविंद आपल्या आईला ह्मणाला, बाई, पुन्हा घड्याळाविषयीं मजसीं संभाषण कर, आणि घड्याळांत नाहीं असें माझ्यांत व रमेंत काय विशेष आहे तें मला सांग बरें ?

**गंगा.**—होय, मुला ; किल्लीनें कमाण फिरविल्यावांचून घड्याळाला चालवत नाहीं, आणि त्या कमाणीला स्वतां फिरवत नाहीं; कोणी तरीं किल्लीनें त्यास फिरविलें पाहिजे ; याचें स्मरण तुला नाहीं कीं काय ?

**गोविं.**—होय, बाई; आणि घड्याळाहून मी फार भिन्न आहें, कां कीं मला हात पाय हालविण्याची व बहुत कामें करण्याची इच्छा करवती, आणि घड्याळाला कांटे चालविण्याची इच्छा करवत नाहीं.

**गंगा.**—गोविंदा, तूं आपले डोळे मीट आणि त्यांवर हात ठेवून बैस, हात पाय डोळे शरीर कांहीं हालवूं नको.

**गोविं.**—अगे आई, असें फार वेळ बसणें मला होत नाहीं, मी फार दमेन.

**गंगा.**—मुला, फार वेळ नको, क्षणभर बैस.

**गोविं.**—बरें, बाई; असें बसायास मी प्रयत्न करीन.

**गंगा.**—आतां कांहीं गोळाकार वस्तू मनांत आण.

**गोविं.**—आणिली, बाई.

**गंगा.**—कोणती?

**गोविं.**—गोटी.

**गंगा.**—ती कशाची आहे?

**गोविं.**—हस्तिदंती गोटी जिने रमी कधींमधीं खेळती तो.

**गंगा.**—ती कोणत्या रंगाची आहे?

**गोविं.**—तांबड्या, बाई. आणि तिला दोरी बांधली आहे; अगे बाई, रमी आपल्या बैठकीच्या खोलींत लाहानग्या पाटावर बसून तिजसीं खेळत आहे असें माझ्या मनांत येतें.

**गंगा.**—बरें गोविंदा, आपले डोळे उघड. रमी आपल्या लाहानग्या हस्तिदंती गोटीसीं खेळत आहे असें आतां तुला दिसतें काय?

**गोविं.**—नाहीं, बाई. परंतु जर पुन्हा डोळे मिटीन तर दिसेल. आहा! बाई, झोंपेंत मला बहुत दिसूं येतें. गेल्या रात्रीं स्वप्नांत लाहान जगू पाहिला, तो जसा जिवंतपणीं दिसे तसा दिसला. तो पळत होता आणि मी त्याला धरावयास झटलों, परंतु तो आटोपेना. तो पुलावरून पळत गेला, तेव्हां मी भयाभीत होऊन जागा झालों.

**गंगा.**—जागा झालास तेव्हां पलंगावरच होतास काय?

**गोविं.**—होय, बाई. मी हाललों नव्हतों, कारण कीं उजव्या कुसीवर निजलों होतों असें आठवतें, आणि त्याच कुसीवर जागा झालों.

**गंगा.**—मला वाटतें कीं, जर तूं आतां आपले डोळे मिटसील तर तुला लाहान जगू दिसेल.

**गोविं.**—होय, बाई. डोळे मिटले आणि जसा तो स्वप्नांत दिसला तसा आतां दिसतो.

**गंगा.**—तर मुला, मी धांवत आहें असें स्वप्न कधींकधीं पडतें, क्षणखो स्वस्थ बसून धांवत आहे असें डोळे मिटून मनांत आणितां येतें कीं नाहीं?

**गोविं.**—होय, बाई.

**गंगा.**—तर अमूक काम करीत नसतांहि तें करितों असें मनांत आणितां येतें कीं नाहीं?

**गोविं.**—होय, बाई. या मंडपांत बसलों असतां बाहेरील बागांत लाहानगी गाडी ओढीत फिरत आहें, असें आतांच मनांत आणितां येतें.

**गंगा.**—बरें, जीं दिसत नाहींत तीं दिसतात असें तुला मनांत आणितां येतें कीं नाहीं?

**गोविं.**—होय, बाई. जीं तुझ्या पुस्तकाच्या खोलींतील भिंतीस सुंदर चित्रें लाविलीं आहेत, तीं पाहत आहें असें आतां एथेंच बसून मनांत आणितां येतें.

**गंगा.**—गोविंदा, गुलाबाच्या फुलाचा वास कसा आहे?

**गोविं.**—मधुर आहे, बाई.

**गंगा.**—गुलाबाच्या फुलासारिखा कांद्याचा वास आहे काय?

**गोविं.**—नाहीं, बाई. फार वेगळा आहे, मला कांद्याचा वास आवडत नाहीं.

**गंगा.**—आतां कांदा व फूल यांचा वास घेत नाहींस तर हें तुला कसें कळलें?

**गोविं.**—खरें; परंतु त्यांचा वास कसा आहे हें मला मनांत आणितां

येतें, आणि त्यांखेरीज बहुत दुसऱ्या वस्तूंचा वास कसा आहे हेंहि मनांत आणितां येतें.

**गंगा.**—तर, वस्तू हुंगीत नसतां हुंगीत आहें असें तुला कल्पवतें बरें?

**गोविं.**—होय, बाई; कधींमधीं पडशामुळें वास येत नाहीं, तथापि त्या वस्तूचा वास कसा आहे हें ध्यानांत आणितां येतें.

**गंगा.**—जर तूं लंगडा असतास तर आपण धांवत आहें, असें मनांत आणितां येईल कीं काय?

**गोविं.**—असें मला वाटतें, बाई.

**गंगा.**—जर आंधळा असतास तर मला दिसतें असें कल्पितां येईल काय?

**गोविं.**—होय, बाई; असें मला वाटतें.

**गंगा.**—रामफळ व सिताफळ यांमध्यें कोणतें तुला गोड वाटतें?

**गोविं.**—सिताफळ; कारण कीं त्याची रुचि मिष्ट आहे.

**गंगा.**—बरें, पण रामफळ अथवा सिताफळ तूं आतां खात नाहींस.

**गोविं.**—खरें, परंतु त्याची रुचि कसी आहे हें मनांत आणितां येतें.

**गंगा.**—तर कोणतेंहि चाखिलें नसतां चाखीत आहें असें मनांत आणितां येतें कीं नाहीं?

**गोविं.**—होय, बाई.

**गंगा.**—ताशा मुरली यांमध्यें कोणतें वाद्य तुला चांगलें वाटतें?

**गोविं.**—मुरली, बाई. माझा मामा बाळोजी आपली मुरली आतां वाजवीत आहे तें ऐकूं येतें, असें मला कल्पवतें?

**गंगा.**—बरें; तर कांहीं ऐकत नसतां ऐकत आहें असें तुला कल्पवतें कीं नाहीं?

**गोविं.**—कल्पवतें, बाई. याप्रमाणें मी कांहीं वस्तू चांचपीत नसतां चांचपीत आहें असें कल्पवतें, आणि दगड व माझा चेंडू व तुझा हात त्यांचा स्पर्श कसा आहे हें मला कल्पवतें.

**गंगा.**—बरें, तर जेव्हां तुला थंडी लागती तेव्हांचा अनुभव आतां तुला कल्पवतो काय?

**गोविं.**—होय, बाई; अणखी जेव्हां मला उकडतें, भूक लागती, ताहान लागती, व रोग होतो, तेव्हांचा अनुभव मला ध्यानांत आणितां येतो.

**गंगा.**—गोविंदा, हें सर्व आश्चर्य नव्हे कीं काय?

**गोविं.**—होय, बाई; आणि हें पूर्वीं माझ्या मनांत आलें नाहीं ह्मणून आश्चर्य वाटतें. फूल खडा घड्याळ यांहून मी कशानें एवढा भिन्न आहें? तें काय आहे? त्याला तूं काय ह्मणतीस, बाई?

**गंगा.**—हें सांगावयास मी अझून तयार नाहीं. आतां बोलणें पुरें. तूं कांहीं वेळ खेळायास जावें, हें बरें आहे.

---

## सातव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तूं घड्याळाहून कसा भिन्न आहेस? त्याचे कांटे हालतात आणि तुझे हात हालतात; तुझें चालणें व त्याचें चालणें निराळें आहे कीं काय?

२. कांहीं दृष्टीस न पडावें ह्मणून डोळे मिटून त्यांवर हात ठेव.

३. आतां गोळाकार वस्तू मनांत आण; तें काय आहे? त्याविषयीं सर्व मला सांग.

४. डोळे उघड; आतां तें तुझ्या दृष्टीस पडतें काय?

५. झोंपेंत असतांना तुला काय दिसतें?

६. लाहान मुलांसीं खेळण्याविषयीं तुला कधीं स्वप्न पडतें काय?

७. चालणें धांवणें यांविषयीं तुला कधीं स्वप्न पडतें काय?

८. अणखी कांहीं करण्याविषयीं तुला कधीं स्वप्न पडतें काय?

९. डोळे मिटून स्वस्थ बसून मी कांहीं करीत आहें, असें तुला कल्पितां येईल काय?

१०. अणखी कोणत्या गोष्टी करीत नसतां करीत आहें असें कल्पवेल?

११. कोणत्या वस्तू पाहत नसतां पाहत आहें असें कल्पवतें?

१२. कोणत्या वस्तू हुंगीत नसतां हुंगीत आहें असें कल्पवतें?

१३. कोणत्या वस्तूंची रूचि घेत नसतां घेत आहें असें कल्पवतें?

१४. काय काय ऐकत नसतां ऐकत आहें असें कल्पवतें?

१५. कोणत्या वस्तू चांचपीत नसतां चांचपीत आहें असें कल्पवतें?
१६. तसें खडा गुलाबाचें फूल घड्याळ यांस कल्पितां येईल काय?
१७. घड्याळ फूल व खडा यांहून तुझ्यांत विशेष काय आहे?

---

## संभाषण ८.

दुसरा दिवस रविवार होता, तेव्हां गंगाबाई आपलीं दोन मुलें ह्मणजे गोविंद आणि रमी यांस बरोबर घेऊन देवळांत गेली, तेथें तीं दोघें चांगलीं बसलीं. संध्याकाळीं रमी निजायास गेल्यावर गोविंद आपल्या आईस विनंती करून ह्मणतो, हे आई, माझ्या मनांतील विचारांविषयीं तूं मसीं फिरून बोल. हें ऐकून तिला फार आनंद झाला, आणि तिनें आपल्या हातांतलें पुस्तक ठेवून बोलूं लागली.

**गंगा.**—हे गोविंदा, म्या जें पूर्वीं तुला सांगितलें त्याची तुला आठवण राहिली आहे कीं नाहीं, हें पाहावयास इच्छितें. घड्याळ आणि तूं यांमध्यें भेद काय आहे, तें सांग.

**गोविं.**—माझे हात पाय हालविण्याची आणि नाना प्रकारचीं कामें करण्याची मला इच्छा करितां येते, आणि त्याप्रमाणें ते हात पाय हालतात आणि तीं कामें माझ्या इच्छेसारिखींच होतात.

**गंगा.**—तूं आणि घड्याळ यांमध्यें दुसरा भेद काय आहे?

**गोविं.**—मी अमूक काम करीत नसतां तें काम करीत आहें असें मला मनांत आणितां येतें. आणि मी कांहीं पाहत नसतां पाहत आहें, वास घेत नसतां वास घेत आहें, व कांहीं वस्तू चाखीत नसतां चाखीत आहें, कांहीं ऐकत नसतां ऐकत आहें, कांहीं चांचपीत नसतां चांचपीत आहें, असी मला कल्पना करितां येते.

**गंगा.**—तुझा अंगठा वर कर आणि त्याकडे पाहा. त्या अंगठ्याला कांहीं काम करण्याची इच्छा होईल कीं काय?

**गोविं.**—नाहीं, बाई.

**गंगा.**—तुझ्या हाताला कांहीं काम करण्याची इच्छा होईल कीं काय?

**गोविं.**—नाहीं. हात हालविण्याची इच्छा मी करितों, त्याच्यानें करवत

नाहीं. जेव्हां मी हात हालवावा असी इच्छा करितों तेव्हां तो त्याप्रमाणेंच हालतो.

**गंगा.**—तुझे भुज पाय किंवा दुसरे अवयव यांस कांहीं करण्याची इच्छा करितां येईल कीं काय?

**गोविं.**—नाहीं, आई. परंतु जसें मी इच्छितों तसें ते करितात खरें.

**गंगा.**—गोविंदा, तुझे डोळे झांक आणि रमी आपल्या हातांत हस्तिदंतांची गोटी घेऊन खेळत आहे असी कल्पना कर.

**गोविं.**—केली, आई; आणि ती आपला नवा तांबडा झगा घालून कसी सुंदर दिसती तेंहि मला मनांत आणितां येतें.

**गंगा.**—शरीराच्या कोणत्या अवयवांत इच्छा उत्पन्न होती ह्मणून तुला वाटतें? तुझ्या पायांत कीं काय?

**गोविं.**—नाहीं, आई; डोक्यांत कोठेंतरीं होती असें वाटतें.

**गंगा.**—तूं मजकडे पाहा, मी तुला दिसतें काय?

**गोविं.**—होय, आई; तूं मला चांगली दिसतीस.

**गंगा.**—लाहान जगू वारला त्या वेळेस त्वां त्याला पाहिलें काय?

**गोविं.**—होय, आई, तो बैठकीच्या समोरल्या खोलींत आपल्या बिछान्यावर निजला होता.

**गंगा.**—लाहान जगू जो तुझ्याबरोबर चेंडू खेळत असे, तसाच मेल्यावर दिसला?

**गोविं.**—होय, आई; तो तसाच दिसला खरा, केवळ त्याचें तोंड निस्तेज झालें होतें व डोळे झांकले होते.

**गंगा.**—परंतु लाहान जगू जो तुझ्याबरोबर खेळत असे त्याला चेंडू उडविणें व झेलणें असीं अनेक कामें करायाची इच्छा करितां येत असे कीं नाहीं?

**गोविं.**—होय, आई, तें खरें; आणि तो आपले डोळे बंद करून पाहत नसतां पाहत आहें असी माझ्यासारिखी त्याला कल्पना करितां येत होती असें मला वाटतें.

**गंगा.**—तर जसें तुझ्या डोक्यामध्यें आहे तसें त्याच्या डोक्यांत जेणेंक-

रून त्याला विचार करितां येत असे असें कांहीं होतें कीं नाहीं?

**गोविं.**—होय, आई; परंतु ज्या वेळेस म्या तो निजलेला पाहिला, त्या वेळेस तें त्याच्या डोक्यांत होतें कीं काय?

**गंगा.**—नाहीं, मुला; तेव्हां तें त्याच्या डोक्यांतून गेलें होतें. जर तें त्याच्या डोक्यांत राहिलें असतें, तर तो आंथरूणावरून उठून आपले डोळे उघडून पाहायास व तुझ्याबरोबर बोलण्यास व खेळण्यास लागला असता. जेव्हां त्वां त्याला आंथरूणावर पाहिलें तेव्हां तो मेला होता, आणि तें त्याच्या डोक्यांतून गेलें होतें?

**गोविं.**—खरें, त्याचें प्रेत मात्र राहिलें, त्या वेळेस तें त्याच्या डोक्यांतील विचार करणारें कोठें गेलें होतें, बाई?

**गंगा.**—ती गोष्ट दुसऱ्या वेळेस सांगेन, परंतु तूं आतां पुन्हा मजकडे पाहा, मी तुला दिसतें कीं काय?

**गोविं.**—होय, आई; माझे डोळे उघडे आहेत, आणि तूं मला स्पष्ट दिसत आहेस.

**गंगा.**—लाहान जगूसारिखी मी मरण पावलें तर तुला दिसेन काय?

**गोविं.**—तुझें प्रेत मला दिसेल.

**गंगा.**—होय, मुला, तें खरें; परंतु माझ्या डोक्यांत जें विचार करणारें आहे तें तुला दिसेल काय?

**गोविं.**—नाहीं, आई; आणि तें आतां देखील मला दिसत नाहीं, परंतु जर तुझ्या डोक्याच्या आंत मला पाहतां येतें तर बरें; अथवा जर तुझें डोकें थोडावेळ कांचेसारिखें असतें तर तें विचार करणारें माझ्या दृष्टीस पडतें.

**गंगा.**—गोविंदा, डोक्यांत जें विचार करीत असतें तें जर तुला दिसत नाहीं, तर मजकडे पाहून तुला जें दिसतें तें काय?

**गोविं.**—आई, तुझें सजीव शरीर दिसतें, जसें लाहान जगू आंथरूणावर निजलेला पाहून त्याचें प्रेत दिसलें तसें.

**गंगा.**—जेव्हां प्रेत पाहतोस तेव्हां तूं असें समज कीं जें विचार करणारें

तें त्यांत नाहीं. कां तर त्या प्रेताच्याने ऐकवत पाहवत बोलवत हालवत इत्यादि कांहींएक करवत नाहीं.

**गोविं.**—होय, आई; तें खरें; जेव्हां मी शरीर सजीव पाहतों तेव्हां त्यांत तें विचार करणारें असतें; कां तर त्या सजीव शरीराच्याने ऐकणें पाहणें व बोलणें इत्यादि सर्व करवतें.

**गंगा.**—बरें मुला, आपण फार वेळ गोष्टी केल्या यावरून तूं थकला अससील, तर तूं आतां मेणबत्ती घेऊन निजायाला जा, परंतु रमीस उठवूं नको बरें.

---

## आठव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तूं व घड्याळ यांमध्यें भेद काय?
२. जें करीत नसतां करीत आहें असें कल्पवतें, तें काय आहे?
३. तुझ्या बोटाला कांहीं कल्पितां येईल काय?
४. अंगठ्याला येईल काय? हाताला येईल काय?
५. तुझा हात हालतो त्याविषयीं कोण इच्छा करितो?
६. तुझ्या अवयवांमध्यें कोणत्याला कांहीं करण्याची इच्छा करवती काय?
७. तुझे डोळे झांक आणि कांहीं गोष्ट मनांत आण.
८. तुझ्या शरीरामध्यें कोठें विचार उत्पन्न होतो असें तुला वाटतें?
९. मजकडे पाहा, मी तुला दिसतें कीं काय?
१०. प्रेताकडे पाहिलें असतां तें माझ्याप्रमाणें दिसतें काय?
११. आतां माझ्या डोक्यांत विचारकर्त्ता आहे कीं काय?
१२. मेलेल्या मनुष्याच्या डोक्यांत विचारकर्त्ता आहे काय? तो कोठें गेला आहे?
१३. कूड जिवंत असतां तिच्या डोक्यांत विचारकर्त्ता असतो कीं काय?
१४. जर आतां मी मरेन तर जसा आतां दिसतों तसाच दिसेन काय? तर तुला काय दिसेल?
१५. जो विचारकर्त्ता माझ्या डोक्यांत आहे तो तुला पाहतां येतो कीं काय? मजकडे निरखून पाहा. जर तो दिसत नाहीं तर काय दिसतें?

१६. जेव्हां तूं प्रेत पाहतोस तेव्हां विचारकर्त्याविषयीं काय समजतोस?
१७. सजीव कुडी पाहतोस तेव्हां विचारकर्त्याविषयीं काय समजतोस?

---

## संभाषण ९.

दुसऱ्या दिवसीं प्रातःकाळीं रमी निजली असतां गोविंदानें उठून टिपूला बोलाविलें, आणि त्याला बरोबर घेऊन फिरावयास बाहेर गेला. नंतर तेथून येऊन पुस्तकाच्या खोलींत गेला आणि त्यांतून एक पुस्तक घेऊन वाचीत आहे इतक्यांत त्याची आई तेथें आली. तिला पाहून गोविंदानें सलाम केला आणि तिचा मुका घेतला आणि सांगितलें कीं आज मी लांब फिरावयास गेलों होतों. हें ऐकून आई ह्मणती, मुला, हें चांगलें केलेंस कां तर तेणेंकरून तूं बळकट आणि निरोगी होसील. मग गोविंद आईला विनंती करून ह्मणतो, आई, जें विचार करणारें तुझ्या व माझ्या डोक्यांत आहे त्याजविषयीं तूं मजसीं कांहीं बोल. मग ती त्यासंगतीं खिडकीजवळ बसली आणि तीं परस्परें बोलूं लागलीं.

**गंगा.**—गोविंदा, आतां मी कशाविषयीं विचार करितें?

**गोविं.**—आई, तुझ्या डोक्यांत मला पाहवत नाहीं व तुझे विचार दिसत नाहींत, तर त्वां सांगितल्यावांचून हें मला कसें समजेल?

**गंगा.**—गोविंदा, तुझे डोळे झांक आणि कांहीं तरीं कल्पना कर.

**गोविं.**—केली, बाई.

**गंगा.**—तूं जें कांहीं कल्पितोस तें जर मला सांगत नाहींस तर तें मला कळणार नाहीं; जर तुला इच्छा असेल तर तुझे सर्व विचार आपल्या मनांतच ठेवितां येतील?

**गोविं.**—होय, आई; आणि तसेंच तुझ्यानें व सर्वांच्यानें करवतें? लाहान जगू एकादे वेळेस मला ह्मणत असे कीं मला पैसा देसील तर जें मी आतां कल्पित आहें तें तुला सांगेन. आणि एकवेळ रमी झोंपेंत कांहीं बोलली त्यावरून तिला काय स्वप्न पडलें तें मला समजलें असें मला वाटतें. आई, स्वप्न पडणें आणि विचार करणें हीं एकच आहेत कीं काय?

**गंगा.**—तीं दोन्हीं फारकरून सारखीं आहेत, कां तर ज्या वेळेस तुला स्वप्न पडतें त्या वेळेस मी जागाच आहें असें तुला भासतें?

**गोविं.**—होय, आई; आणि मी जागा असतां ज्या वस्तू माझ्या पाहण्यांत कधीं आल्या नाहींत त्या स्वप्नांत दृष्टीस पडतात.

**गंगा.**—आतां तुझे डोळे झांक, आणि तुला कांहीं स्वप्न पडेल कीं काय हें पाहा.

**गोविं.**—आई, तें स्वप्न नाहीं, परंतु स्वप्नासारिखें आहे; कां कीं मला पंख आहेत आणि मी उडत आहें असें मला वाटत होतें.

**गंगा.**—बरें गोविंदा, तूं जागा असतां तुझ्या डोक्यांत जें विचार करीत असतें तेंच तूं निजला असतां विचार करितें; आणि तूं निजला असतां जी कल्पना होती त्यास स्वप्न ह्मणावें.

**गोविं.**—आई, जागा असतां एकदां मला स्वप्न पडलें.

**गंगा.**—अरे गोविंदा, असें कसें होईल?

**गोविं.**—होय, आई, तसेंच झालें. एका दिवसीं मी दिवाणखान्यामध्यें बैठकीच्या खोलींत बसून शेगडीकडे नजर लावून तींतले कोळसे पेटतांना पाहत होतों, त्या वेळेस अंधार पडला होता आणि त्या खोलींत दिवा नव्हता. आणि पाहतां पाहतां मला असें भासलें कीं शेगडींतील एक निखारा लाहान जगूच्या तोंडासारिखाच आहे, ह्मणून तो माझ्या मनांत आला, आणि त्याच्याबरोबर शाळेच्या मागें चेंडू खेळत आहें असें फार वेळ मनांत घोळत होतें. इतक्यांत तूं त्या खोलींत आलीस आणि माझ्याबरोबर बोलूं लागलीस, ह्मणून मी जों फिरून पाहतों तों मी कोठें आहें आणि काय करीत आहें याविषयीं संशयांत पडलों. जेव्हां मला स्वप्न पडतें आणि मी जागा होतों तेव्हां मी जसा आहें त्याप्रमाणेंच होतों.

**गंगा.**—तूं स्वस्थ बसून निखारा पाहत असतां लाहान जगूविषयीं विचार करीत होतास, त्याला स्वप्न ह्मणूं नये परंतु ध्यास ह्मणावा.

**गोविं.**—आई, एका दिवसीं मी पुलावर उभा राहून पाणी वाहतांना पाहत होतों. असें पाहतां पाहतां इतक्यांत असा मला भास झाला कीं,

लाहान जगूबरोबर नावेंत बसून नदीच्या धारेंतून जात असतां नाव खडपाजवळ लागली, असें पाहून मला भय वाटलें आणि मी कोठें आहें असी भ्रांति पडली. परंतु सावध झालों तेव्हां त्या नावेंत मी नाहीं असें पाहून मला फार आनंद झाला.

**गंगा.**—होय, मुला, त्या वेळेसहि तूं ध्यास करीत होतास.

**गोविं.**—माझ्या मस्तकांत जें आहे तें किती चमत्कारिक आहे, बाई! त्यापासून नाना प्रकारच्या कल्पना उद्भवतात. तें जागृतपणीं कांहीं तरीं गोष्टीविषयीं सर्वदां विचार करितें.

**गंगा.**—विचार बंद करण्यास प्रयत्न कर.

**गोविं.**—मला तें करवत नाहीं, तुला करवतें काय?

**गंगा.**—नाहीं, मुला; मी लाहानपणापासून विचार करीत आलें.

**गोविं.**—सर्वकाळ नाहीं, बाई.

**गंगा.**—कां बरें, मुला?

**गोविं**—आई, तूं कांहीं वेळ झोंपेंत होतीस आणि सर्वकाळ निद्रेमध्यें स्वप्न पडतें असें नाहीं. एकाद्या रात्रीं मला कांहींच स्वप्न पडत नाहीं.

**गंगा.**—असो, परंतु जागी असतां म्या अनेक प्रकारचे विचार केले.

**गोविं.**—आई, मलाहि तसेंच होतें. ज्या नाना प्रकारच्या गोष्टींविषयीं विचार करीत आहें त्या माझ्यानें मोजवत नाहींत. आहा आई, माझ्या मस्तकांत विचार करणारें असें चमत्कारिक काय तें मला सांग, हें सांगेन असें तूं कबूल केलें होतेंस.

**गंगा.**—होय, मुला, तें मी तुला सांगत्यें. मजकडे पाहा, जें मी तुला सांगतें तें लक्ष देऊन ऐक, आणि त्याचें स्मरण ठेव, विसरूं नको. तुझ्यांत जें विचार करीत करीत आहे त्याला "आत्मा ह्मणतात."

**गोविं.**—आहाहा आई, तुला मला व माझ्या लाहान बहिणीला आत्मा आहे, हें समजून मला फार आनंद वाटतो. आपणास जर आत्मा नसता तर आपल्यामध्यें परस्पर प्रीति व भाषण न घडतें. आई, तुझा व रमीचा आत्मा माझ्यासारिखाच आहे कीं काय?

**गंगा.**—गोविंदा, आतां तर जेवायाची वेळ झाली. मी तुला आत्म्याविषयीं संध्याकाळीं अणखी सांगेन.

---

## नव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. मजकडे पाहा. मी कशाविषयीं विचार करीत आहें?
२. तुझ्याने माझ्या डोक्यांतले विचार पाहवतात कीं काय?
३. तुझे डोळे झांक आणि कांहीं विचार कर.
४. तुझे विचार मला न सांगितलेस तर समजेल काय?
५. तुला आपले सर्व विचार मनांत ठेवितां येतील कीं काय?
६. स्वप्न पडणें आणि विचार करणें एकच काय?
७. स्वप्न पडतें तेव्हां तुला कसें भासतें?
८. आतां तुला स्वप्न पडेल कीं काय? स्वप्न पडणें ह्मणजे काय?
९. ध्यास लागणें ह्मणजे काय? तुला ध्यास कधीं लागला होता काय?
१०. आतां ध्यास लागावा ह्मणून प्रयत्न कर. कशाविषयीं ध्यास लागला होता?
११. एवढें आश्चर्यवंत कर्मकारक तुझ्या डोक्यांत आहे तें चमत्कारिक नाहीं कीं काय?
१२. तुला विचार बंद करितां येईल काय हें पाहा.
१३. तूं सर्वदां विचार करीत आहेस कीं काय?
१४. आजपर्यंत जितक्या गोष्टींविषयीं त्वां विचार केला तितक्या तुझ्याने मला सांगवतील कीं काय?
१५. तुझ्या डोक्यांत सर्वदां विचार करणारें चमत्कारिक जें त्याचें नाव काय?
१६. जर आह्मास आत्मा नसता तर एकमेकांसीं बोलवतें काय? एकमेकांवर प्रीति करवती कीं काय?

## संभाषण १०.

संध्याकाळीं गोविंदानें गंगाबाईला आपल्याबरोबर पुन्हा आत्म्याविषयीं संभाषण करावें ह्मणून तिला सुचविलें; तेव्हां ती बोलली कीं, रमी नि-

जावयास गेली ह्मणजे तुसीं संभाषण करीन; मी आतां तुझ्या वहिणीस घेऊन निजावयास माडीवर जातें इतक्यांत तूं हा धडा त्या लाहान खुरशीवर बसून पाठ कर. गोविंद फार चांगला मुलगा होता, ह्मणून त्याने आईच्या सांगण्याप्रमाणें केलें. मग ती खालीं आल्यावर खुरशीवर बसून पुढें लिहिल्याप्रमाणें त्याबरोबर भाषण करूं लागली.

**गंगा.**—गोविंदा, आत्मा काय हें तुझ्याने मला सांगवतें काय?

**गोविं.**—जो मजमध्यें विचार करितो तोच आत्मा आहे.

**गंगा.**—तुला शरीर आणि आत्मा आहे, तसेंच मला व रमीला व दुसऱ्या मनुष्यांला आहे.

**गोविं.**—आई, लाहान तान्ह्या मुलांसहि आत्मा आहे काय?

**गंगा.**—होय मुला, त्यांसहि आहे, परंतु जोंवर तीं लाहान आहेत, तोंवर तीं फारसे विचार करीत नाहींत असें तुला कळलें आहे.

**गोविं.**—आई, आत्मा वाढत असतो कीं काय?

**गंगा.**—तो शरीरासारिखा वाढत नाहीं, परंतु त्यास विचार करावयाची व समजावयाची व शिकावयाची व नाना प्रकारच्या चांगल्या उपयोगी गोष्टी जाणावयाची शक्ति वाढती, त्यावरून तो वाढतो असें ह्मणावें.

**गोविं.**—परंतु जसें शरीर वाढावयाकरितां अन्न देतों, तसें आत्म्यास देत नाहीं.

**गंगा.**—खरें, मुला; तान्ह्या मुलास जेंव्हां भूक लागती तेव्हां त्यास खावयास देतों, तसें आत्म्यास देववत नाहीं; परंतु त्यास आपण चांगलें चांगलें शिकवितों हेंच आत्म्याचें अन्न आहे.

**गोविं.**—आई, तूं मला पुष्कळ शिकवावें असी माझी इच्छा आहे ह्मणजे तेणेंकरून माझा आत्मा लवकर वाढून माझ्या बाळोजी मामासारिखा मोठा व्हावा.

**गंगा.**—होय, मुला; मी आनंदाने तुला शिकवीन आणि तूं मोठा झाल्यावर तुझ्या मामासारिखा शाहाणा होसील असी माझी आशा आहे.

परंतु गोविंदा, खडा गुलाबाचें फूल अथवा घड्याळ यांसारिखा तुझा आत्मा आहे कीं काय? हें सांग.

**गोविं.**—नाहीं आई, तो त्यांसारिखा नाहीं; परंतु माझें शरीर त्यांसारिखें आहे, कां कीं माझ्या शरीरास जसें जडत्व, कठीणपणा, आकार, रंग, व अवयव आहेत तसेंच खडा फूल आणि घड्याळ यांसहि आहेत.

**गंगा.**—गोविंदा, कितीक पदार्थ तुझ्या दृष्टीस पडतात ?

**गोविं.**—आई, हें माझ्यानें तुला सांगवत नाहीं. परंतु फार करून सर्व पदार्थ माझ्या दृष्टीस पडतात.

**गंगा.**—माझा आत्मा तुझ्या दृष्टीस पडतो कीं काय?

**गोविं.**—नाहीं, आई; तो माझ्या दृष्टीस पडत नाहीं व माझा आत्मा तुझ्या दृष्टीस पडत नाहीं, व माझाहि मला दिसत नाहीं; परंतु तो कसा विचार करितो हें मला समजतें.

**गंगा.**—जेव्हां तूं कांहीं पदार्थ पाहतोस तेव्हां तुझ्या दृष्टीस काय पडतें?

**गोविं.**—ते पदार्थ कसे आहेत, वर्त्तूळ किंवा चौकोनी, लांब किंवा आखूड, मोठे किंवा लाहान, तांबडे किंवा पांढरे, काळे किंवा निळे किंवा पिवळे आहेत, हें माझ्या दृष्टीस पडतें.

**गंगा.**—गोविंदा, तर त्या पदार्थांचा आकार व रंग तुझ्या दृष्टीस पडतो कीं नाहीं?

**गोविं.**—होय आई, आणि ते किती दूर आहेत हेंहि मला दिसतें.

**गंगा.**—नाना प्रकारच्या वस्तूंपासून नाना प्रकारचे नाद उत्पन्न होतात हेंहि तुला ऐकतां येतात कीं नाहीं?

**गोविं.**—होय, आई; जेव्हां देवळांत लोकांस बोलवावयासाठीं घांट वाजवितात आणि डांकवाला आपलें शिंग वाजवितो आणि माझा मामा मुरली वाजवितो, व लाहान कोंबडीं बदकीं गायी मेंढरें ओरडतात तें सर्व मला ऐकूं येतें. आहाहा आई, पाहा मला किती प्रकारचे नाद ऐकूं येतात.

**गंगा.**—गोविंदा, माझा आत्मा तुला ऐकूं येतो कीं काय?

गोविं.—तुझें बोलणें मला ऐकूं येतें, आई.

गंगा.—होय, तें खरें, तुसीं बोलायाचें तें पूर्वीं मी मनांत आणितें, मग माझी जीभ व ओंठ हालविण्याची इच्छा करितें, आणि तें बोलतांना तुला ऐकूं येतें. तुझा कान या घड्याळास लाव. पाहा, तुला कांहीं ऐकूं येतें काय?

गोविं.—होय, आई; घड्याळ टिक टिक टिक टिक असें करितें.

गंगा.—गोविंदा, आतां तुझा कान माझ्या मस्तकाला लाव आणि जे वि- चार करितें ते तुला ऐकूं येतात काय पाहा.

गोविं.—नाहीं, आई, ते मला अगदी ऐकूं येत नाहींत.

गंगा.—तर, जेव्हां माझा आत्मा विचार करीत असतो तेव्हां तो कांहीं नाद करीत नाहीं यावरून तुला ऐकूं येत नाहीं; परंतु जेव्हां मी आ- पले विचार तुला सांगतें तेव्हां तूं ऐकतोस.

गोविं.—आई, हें फार चमत्कारिक आहे. मला वाटतें कीं ज्या वस्तू दृष्टीस पडतात व ऐकूं येतात त्यांपासून आत्मा फार भिन्न आहे.

गंगा.—होय, मुला, तें खरें; अणखी माझ्या आत्म्याचा स्वाद व वास घेतां येईल अथवा स्पर्श करितां येईल कीं काय?

गोविं.—नाहीं, आई; तें माझ्यानें करवत नाहीं आणि माझ्याहि आ- त्म्याचा स्वाद व वास घेवत नाहीं आणि त्याला स्पर्श करवत नाहीं.

गंगा.—तर, तुझा आत्मा वाटोळा किंवा चौरस, लांब किंवा आखुड, तां- बडा पांढरा काळा हिरवा किंवा पिवळा आहे, हें तुझ्यानें सांगवत नाहीं, त्याला आकार व रंग आहे कीं नाहीं हें तुला कळत नाहीं. आणि त्याचा नाद घांटेसारिखा किंवा मुरलीसारिखा किंवा दुसऱ्या वस्तूंसारिखा आहे कीं नाहीं, हें तुला सांगतां येत नाहीं. त्यापासून कांहीं नाद होतो कीं नाहीं हें तुला समजत नाहीं. दुसऱ्या पदार्थांच्या स्वादासारिखा तुझ्या आत्म्यास स्वाद आहे कीं नाहीं हें तुझ्यानें सांगवत नाहीं. त्यास कांहीं स्वाद आहे किंवा नाहीं हें तुला कळत नाहीं. दुसऱ्या पदार्थांस वास आहे तसा आत्म्यास वास आहे कीं नाहीं हें

तुला समजत नाहीं. अथवा त्याला कांहीं वास आहे किंवा नाहीं हें तुला समजत नाहीं. तुझा आत्मा कठीण किंवा मऊ आहे अथवा दुसऱ्या पदार्थासारिखा लागतो कीं नाहीं हें समजत नाहीं. तो स्पर्शनीय आहे किंवा नाहीं हेंहि तुला कळलें नाहीं.

**गोविं.**—आई, आपण ज्या वस्तु पाहतों, ऐकतों, चाखतों, हुंगतों, स्पर्शतों, त्यांस काय ह्मणावें?

**गंगा.**—तीं अनात्मा आहेत आणि त्यांस अनात्मीय असें ह्मणतात.

**गोविं.**—आई, तर माझें शरीर अनात्मीय आहे?

**गंगा.**—होय, मुला; परंतु तुझा आत्मा अनात्मा नाहीं पण आत्मरूप आहे.

**गोविं.**—आई, तुझाहि आत्मा आत्मरूप आहे असें मला वाटतें, कां कीं तो पाहावा व ऐकावा व त्याचा स्वाद व वास घ्यावा व स्पर्श करावा हें होत नाहीं.

**गंगा.**—होय, मुला; संपूर्ण मनुष्यांचा आत्मा आत्मरूप आहे. मुला, तुला शरीर आणि आत्मा आहे हें ध्यानांत ठेव. तुझें शरीर पाहण्यांत येतें, त्याचा स्वाद व वास व रुचि घेववती व त्याचा स्पर्श करवतो. तें खडा फूल घड्याळ यांसारिखें आहे. तें अनात्मक आहे. आत्म्यास आकार रंग नाद स्वाद वास कठिणत्व मृदुत्व इत्यादि नाहींत. तो अनात्मरूप नाहीं तद्भिन्न आहे ह्मणून त्यास आत्मा ह्मणावा. फूल खडा व घड्याळ यांस आत्मा नाहीं. गोविंदा, तुला झोंप आली असें दिसतें. आतां निजायास जा, याविषयीं विचार सकाळीं करूं.

---

## दाहाव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. आत्मा काय आहे?
२. सर्व पुरुषांस व स्त्रियांस व मुलांस आत्मा आहे कीं काय?
३. आत्मा वाढतो कीं काय? आत्म्याचें अन्न काय आहे? तुझा आत्मा वाढावा ह्मणून इच्छितोस कीं काय?

४. तुझा आत्मा, खडा, गुलाबाचें फूल, किंवा घड्याळ, यांसारिखा कांहीं आहे कीं काय?

५. तुझ्या आत्म्यासारिख्या नव्हत अशा दुसऱ्या कांहींएक वस्तू मला सांग.

६. खडा फूल व घड्याळ यांसारिखें तुझें शरीर आहे काय?

७. तुझें शरीर कोणत्या गुणानी खडा फूल व घड्याळ यांसारिखें आहे?

८. तुझ्या दृष्टीस पुष्कळ वस्तू पडतील कीं काय?

९. माझा आत्मा तुझ्या दृष्टीस पडेल काय?

१०. तुझा आत्मा माझ्या दृष्टीस पडेल काय?

११. ज्या वस्तू तुझ्या दृष्टीस पडतात त्यांचा आकार व रूप काय आहे? त्यांचा रंग काय?

१२. त्या वस्तू किती दूर आहेत?

१३. नाना प्रकारच्या वस्तूंचे नाद तुला ऐकूं येतील काय? ह्या घड्याळाचा येईल काय?

१४. मी विचार करीत आहें; माझें विचारकरणें तुला ऐकूं येईल काय?

१५. माझ्या आत्म्याचा नाद ऐकूं येतो काय? आणि कोणत्या प्रकारचा नाद आहे हें तुला सांगवतें काय?

१६. माझ्या आत्म्याची रुचि कसी आहे हें तुझ्याने सांगवतें कीं काय?

१७. याचा वास कसा हें सांगवतें कीं काय?

१८. तुझ्याने माझ्या आत्म्याला स्पर्श करवतो कीं काय?

१९. तुला आपल्या किंवा दुसऱ्याच्या आत्म्यास पाहतां, ऐकतां, हुंगतां, चाखितां, शिवतां येईल कीं काय?

२०. आत्म्यास आकार व रंग आहे कीं काय? नाद आहे काय? रुचि आहे काय? वास आहे काय?

२१. तुझ्या आत्म्याचा व दुसऱ्या वस्तूंचा स्पर्श सारिखा आहे कीं काय? तो स्पर्शनीय आहे कीं काय?

२२. ज्या वस्तू आह्माला पाहतां, ऐकतां, हुंगतां, चाखितां, शिवतां येतात त्यांस काय ह्मणतात?

२३. ज्या अनात्मीय आहेत त्यांतील कांहींएक मला सांग?
२४ अणखी दुसऱ्या कोणत्या वस्तूंस अनात्मीय ह्मणतात, हें मला सांग?
२५. तुझें शरीर कसें? तुझा आत्मा कसा आहे, हें सांग.
२६. अनात्मा ह्मणजे काय? कोणाचा आत्मा अनात्मरूप आहे कीं काय? सर्व मनुष्यांचा आत्मा कसा आहे?
२७. तुझ्या शरीराहून तुझा आत्मा कशानें अगदी भिन्न आहे?
२८. कोणत्या वस्तूंत आत्मा नाहीं?

---

## संभाषण ११.

दुसऱ्या दिवशीं सूर्योदयापूर्वीं गोविंद उठून माडीवरून खालीं आला तों त्यास आई भेटली. ती ह्मणाली, मुला, चल आपण बागांत फिरावयास जाऊं, आणि तुझी इच्छा असेल तर तुला आत्म्याविषयीं अणखी सांगेन. असें बोलून तीं बागांत गेलीं आणि फिरत्या वेळेस पुढें लिहिल्याप्रमाणें त्यांचें भाषण झालें.

**गोविं.**—अगे आई, टिपू कधीं विचार करीत नाहीं काय?

**गंगा.**—गोविंदा, ही कल्पना तुझ्या मनांत कशावरून आली?

**गोविं.**—तो उभा राहतो आणि काय करावें ह्मणून विचार करितो असें दिसतें, मग धांवतो तेव्हां कांहीं वस्तू मनांत आली ती पाहावयास जातो असें दिसतें.

**गंगा.**—होय तें खरें गोविंदा, आणि जेव्हां चेंडू फेंकून त्यामागें जायास सांगतोस तेव्हां तो जातो.

**गोविं.**—आई, एक कुत्रा तोंडांत लाहान टोपली घेऊन बाजारांत जात असे, आणि आपल्या धन्यासाठीं कसायाकडून तींत मास घेऊन येत असे, असें म्या ऐकिलें आहे. तो असें नित्य करीत असे, आणि त्याचा धनी त्याबरोबर पैकाहि पाठवी व ज्या प्रकारचें मास पाहिजे त्याचें नाव एका कागदावर लिहून त्या कुत्र्याबरोबर पाठवून तें मास आणवीत असे. मला वाटतें कीं आपल्या टिपूला असें शिकवावें.

**गंगा.**—यावरून कुत्रें व दुसरीं जनावरें विचार करितात असें मला

वाटतें. परंतु त्याचें मस्तकांतलें विचार करणारें आपल्यासारिखें नाहीं, तें फार निराळें आहे. टिपूला आह्मासारिखा आत्मा नाहीं.

**गोविं.**—आई, कुत्र्याचें शरीर बहुत प्रकारें माझ्यासारिखें आहे.

**गंगा.**—होय मुला, त्यास जसा जीव आहे तसा तुला आहे. तो वाढतो तसा तूंहि वाढतोस, आणि तूं खातोस पितोस निजतोस तसा तोहि करितो. त्याला तुझ्यासारिखाच शीत उष्णाचा अनुभव आहे, त्याला भूक व ताहान लागती, तो रोगी व निरोगी दुःखी व सुखी आहे, त्याला मरणहि आहे, त्याचें शरीर मातीसीं मिळेल आणि तसेंच तुझें होईल, हें सर्व खरें. परंतु तुझ्या आत्म्याचा जर विचार केला तर तूं आणि टिपू यांचा फार भेद आहे.

**गोविं.**—होय आई, आणि घोडे, गायी, मेंढरें, पक्षी, व मासे, ह्यांहिपासून मी फार भिन्न आहें.

**गंगा.**—खरें गोविंदा, आणि दुसरे सर्व प्राणी व चलनवलन करणारे त्यांपेक्षांहि तूं फार भिन्न आहेस, परंतु पुरुष स्त्रिया व मुलें ह्यांपासून तूं भिन्न नाहींस. त्यांचा आत्मा आणि तुझा आत्मा सारिखा आहे आणि ह्या आत्म्यास मानवी आत्मा ह्मणावें.

**गोविं.**—आई, पुरुषांच्या स्त्रियांच्या व लाहान मुलांच्या शरीरास मानवी शरीर ह्मणतात कीं काय?

**गंगा.**—होय, मुला.

**गोविं.**—तर, आई, मला मानवी आत्मा व मानवी शरीर आहे.

**गंगा.**—होय, गोविंदा; अणखी तुझ्या आत्म्याचा आणि कुत्र्याच्या आत्म्याचा एका गुणानें फार मोठा भेद आहे.

**गोविं.**—आई, तो कोणता?

**गंगा.**—तुला बरें व वाईट यांचें ज्ञान आहे आणि तें त्याला नाहीं. मी चांगला मूल आहें असें समजून तुला आनंद वाटतो, आणि वाईट आहें असें समजून दुःख वाटतें; परंतु तसें टिपूला वाटत नाहीं. अणखी तुला बोलतां येतें त्याला येत नाहीं. तुला वाचणें लिहिणें व हिशोब करणें शिकतां येतें, त्याला येत नाहीं. तूं मोठा झाल्यावर

जितकीं पुस्तकें माझ्या पुस्तकाच्या खोलींत आहेत तीं तुला वाचितां येतील आणि तुझा मामा वाळोजी ह्यासारिखें काम करितां येईल, परंतु टिपूला हें होणार नाहीं. तो मरणापर्वेतों अज्ञानी राहील. त्याच्या व तुझ्या मनाचा फार भेद आहे. नवीं चित्रें पाहून नवीं पुस्तकें वाचून नवे विचार करून ज्ञान वाढून आणि मोठा झाल्यावर कोणतें काम करीन याचा विचार करून तुला फार आनंद वाटतो' तसा टिपूला वाटत नाहीं.

तूं माझी आज्ञा मानण्याविषयीं आनंदित असावें आणि मी चांगला आहें असें वाटून रमीवर व दुसऱ्या मनुष्यांवर ममता ठेवून त्यांस सुख देण्याविषयीं विशेष आनंदित असावें. आणि प्रौढ होऊन लोकांचें बरें करावें आणि त्यांस सुखरूप ठेवावें असें तुझ्या मनांत वाटत असेल, असी माझी आशा आहे; परंतु टिपूला असे विचार व इच्छा नाहींत.

**गोविं.**—आई, ह्यावरून टिपूचा आणि माझा केवढा भेद आहे, तो माझ्या समजण्यांत अधिक अधिक येतो.

**गंगा.**—होय, मुला; मला फुरसत असती तर कुत्र्याचा व तुझा आणखी कोणता भेद आहे तोहि म्या तुला सांगितला असता. परंतु मला वाटतें कीं टिपूच्या मस्तकांत जो विचार कर्त्ता आहे तो तुझ्या आत्म्यापासून फार भिन्न आहे, असें माझ्या बोलण्यावरून तुला बरोबर समजलें असेल.

**गोविं.**—आई, टिपूला आत्मा आहे काय?

**गंगा.**—गोविंदा, त्याला जरीं आत्मा आहे तरीं मनुष्याच्या आत्म्यापासून भिन्न आहे. जनावरांच्या पक्ष्यांच्या व मास्यांच्या आत्म्यासारिखा त्याचा आहे. त्यास आत्मा ह्मणायास योग्य नाहीं असें मला वाटतें.

**गोविं.**—तर त्यास काय ह्मणावें?

**गंगा.**—त्याला काय ह्मणावें हें मला पक्कें ठाऊक नाहीं परंतु जनावरामध्यें जें विचार करणारें आहे तेंच तें आहे, त्यास कांहीं संज्ञा नाहीं.

**गोविं.**—आई, हत्तींविषयीं म्या आपला मामा वाळोजी त्याजवळून अनेक

गोष्टी ऐकल्या, तो ह्मणाला कीं त्यांस दुसऱ्या जनावरांपेक्षां फार ज्ञान आहे.

**गंगा.**—होय गोविंदा, त्यांस फार ज्ञान आहे असें दिसतें.

**गोविं.**—होय आई, एक लाहान हत्ती जर तूं विकत घेऊन त्याला नेहमी शिकवावयास कोणीएकाला ठेविलें, तर तो माणसाएवढें शिकेल कीं काय?

**गंगा.**—नाहीं मुला, त्याजवर किती प्रयत्न केला तथापि तुझी लाहान बहीण आतां जितकें जाणती तितकें त्यास पन्नास वर्षांनी येणार नाहीं. लाहान मुलास चांगलें शिकवीत असतां दिवसंदिवस त्याची बुद्धि अधिक अधिक वाढून मोठें झाल्यावर हत्ती व दुसरीं जनावरें ह्या सर्वांपेक्षां विशेष शाहाणें होईल.

**गोविं.**—आई, मनुष्य केवढें शिकेल?

**गंगा.**—हें सांगवत नाहीं; मरणापर्यंत तुझ्या आत्म्याच्याने शिकून ज्ञान वाढवतें. आई फार जाणती असें तुला वाटतें, परंतु मजपेक्षां जे हजारपट अधिक जाणतात, असे कोणी आहेत.

**गोविं.**—आई, तुझ्या इतकें मला जर ज्ञान असतें तर फार चांगलें असतें, परंतु पशु आणि मी किती भिन्न आहें हें पाहून व जेणेंकरून नाना प्रकारच्या चमत्कारिक गोष्टी माझ्यानें करवतील असा आत्मा मजमध्यें आहे हें समजून मला फार आनंद वाटतो. टिपूसारिखा मी असतों तर मला फार दुःख वाटतें. परंतु मला आत्मा आहे आणि मी फार शाहाणा आणि चांगला माणूस होईन असी माझी आशा आहे.

**गंगा.**—असीच आशा मला आहे, इतकें आई बोलून उभयतां बागांतून घरांत आलीं.

---

## अकराव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. कुत्र्याला किंवा घोड्याला किंवा गाईला विचार करितां येतो कीं काय?

२. कुत्र्याची किंवा दुसऱ्या जनावराची चमत्कारिक गोष्ट कधीं ऐकिलीस कीं काय? तर ती मला सांग.

३. जें विचार करणारें जनावरांमध्यें आहे व जें आह्मा मनुष्यामध्यें आहे तें एकच आहे काय?

४. तुझ्या आत्म्यासारिखा कुत्र्याला आत्मा आहे कीं काय?

५. तुझ्या शरीरासारिखें कुत्र्याला शरीर आहे कीं काय?

६. तुझ्यासारिखें कुत्र्याला काय आहे आणि तुझ्यासारिखें तो काय करितो?

७. कोणत्या जीवजंतुहून तूं फार भिन्न आहेस?

८. कोणाचा आत्मा व तुझा आत्मा सारिखा आहे.

९. पुरुष स्त्रिया लेंकरें त्यांस कोणत्या प्रकारचे प्राणी असें ह्मणतात?

१०. पुरुष स्त्रिया लेंकरें यांचा जीव कोणत्या प्रकारचा आहे असें ह्मणतात.

११. पुरुषांचें स्त्रियांचें लेंकरांचें शरीर कोणत्या प्रकारचें आहे असें ह्मणतात?

१२. कुत्रें व सर्व जनावरें यांहून तुला फार वेगळें करणारें तुझ्या आत्म्यांत काय आहे?

१३. मी चांगला आहें असें समजून तुला कसें वाटतें?

१४. मी द्वाड आहें असें समजून तुला कसें वाटतें?

१५. हें ज्ञान कुत्र्याला आहे कीं काय?

१६. तुला बोलतां येत आहे. अणखी काय तुला करितां येतें आणि कुत्र्याला येत नाहीं.

१७. आतां कुत्र्याला जितकें समजतें याहून त्याला कधीं अधिक समजेल कीं काय?

१८. कशानी तुला आनंद होतो आणि कुत्र्याला होत नाहीं?

१९. कुत्र्याला आत्मा आहे कीं काय?

२०. जीवजंतु इत्यादिकांस मानवी आत्मा आहे कीं काय?

२१. हत्तीला नेहमी शिकविलें असतां मनुष्यांप्रमाणें ज्ञानी होईल कीं काय?

२२. लाहान मुलें प्रौढपणापर्यंत नेहमी शिकत असतां हत्ती व दुसरीं जनावरें यांहून अधिक ज्ञानी होतील कीं काय?

२३. पुढें तुला अधिक अधिक शिकतां येईल कीं काय?

२४. तुझा आत्मा ज्याला याप्रमाणें शिकतां येतें आणि सर्वकाळ अधिक अधिक शिकतां येतें तो फार आश्चर्यवंत नाहीं काय?

२५. तूं आपल्या आत्म्याविषयीं अणखी समजायाला इच्छीत नाहींस कीं काय?

---

## संभाषण १३.

संध्याकाळीं रमी निजायास गेल्यानंतर गंगाबाई येऊन मेजाजवळ बसली, आणि गोविंदाला जवळ बसायाला सांगितलें. गोविंद आपल्या आत्म्याविषयीं आईबरोबर भाषण करायास फार उत्कंठित होता, आणि तो जें सांगे तें लक्ष देऊन ऐकत असे, हें पाहून आईला फार आनंद वाटला.

**गंगा.**—गोविंदा, अनात्मा काय आहे हें तुझ्यानें मला सांगवेल काय?

**गोविं.**—जें कांहीं ऐकण्यांत पाहण्यांत चाखण्यांत व स्पर्श करण्यांत येतें, त्यास अनात्मा ह्मणावें.

**गंगा.**—आत्मा ह्मणजे काय?

**गोविं**—ज्यापासून मजमध्यें विचार उद्भवतात व सुखदुःखाचा अनुभव आहे आणि बरें वाईट यांचें ज्ञान आहे तो. त्यास आकार, रंग, नाद, स्वाद, वास, कठीणपण, मऊपण, इत्यादिक नाहींत.

**गंगा.**—गोविंदा, कांहीं दिवसांमागें आपण लाहान जगूविषयीं बोलत होतों, त्याची तुला आठवण आहे काय?

**गोविं.**—होय, आई.

**गंगा.**—आणि त्याचें प्रेत पेटींत घातलें ती पेटी प्रेतस्थानांत नेऊन पुरली, त्याची तुला आठवण आहे काय?

**गोविं.**—होय, आई; मी एका दिवशीं लाहान जगूचें थडगें पाहावयास तेथें गेलों होतों. त्या जागीं जाऊन त्याविषयीं विचार करणें मला फार आवडतें, परंतु कधीं कधीं रडूं येतें. आतां त्या जाग्यावर गवत वा-

ढलें आहे. त्याच्या एका शेवटावर दगड आहे त्यावर त्याचें नाव आणि तो किती वर्षांचा होता हें लिहिलें आहे.

**गंगा.**—जगू मेला तेव्हां त्याचें प्रेत जमिनींत पुरलें परंतु आत्मा गाडला नाहीं. तसाच तूं मेल्यानंतर तुझें प्रेत नेऊन गाडितील, परंतु आत्मा गाडणार नाहींत.

**गोविं.**—आई, माझें शरीर मेल्यानंतर माझा आत्मा वांचेल काय?

**गंगा.**—होय, गोविंदा, तुझा आत्मा मरणार नाहीं. तुझें शरीर मरून भूमींत गाडलें जाईल आणि मातीसीं मिळेल परंतु, तुझा आत्मा कधीं मरणार नाहीं, तो सर्वकाळ वांचेल.

**गोविं.**—आई, तूं ह्मणतीस हें मी समजत नाहीं.

**गंगा.**—गोविंदा, इकडे पाहा. एका वर्षाचे जितके दिवस आहेत तितक्या रेघा ह्या पाटीवर पाडिते त्या मोज.

**गोविं.**—आई, मोजल्या, तीनशें पांसष्ट आहेत.

**गंगा.**—खरें मुला, तितकेच दिवस एका वर्षाचे आहेत. तितक्या अणखी पाडल्या असतां दोन वर्षांचे होतील. परंतु गोविंदा, ह्या पाटीवर पाठपोट रेघा पाडल्या तर किती वर्षांचे होतील?

**गोविं.**—हें मला ठाऊक नाहीं, बाई; कदाचित् दाहा वर्षांचे होतील.

**गंगा.**—होय, दाहा वर्षांचे होतील खरें. परंतु आतां जर दाहा पाट्या घेऊन त्यांजवर पाठपोट रेघा पाडल्या तर किती वर्षांचे होतील?

**गोविं.**—आई, शंभर वर्षांचे होतील. दाहा दाहीं ह्मणजे शंभर.

**गंगा.**—गोविंदा, जर ही खोली रेघा पाडलेल्या पाट्यानी एकावर एक रचून भरली असतां त्या प्रत्येक रेघेस एक वर्ष मानिलें, तर किती वर्षें होतील?

**गोविं.**—अगे बया, तितक्या मला मोजतां येणार नाहींत.

**गंगा.**—तर ह्या घरांतील सर्व खोल्या रेघा केलेल्या पाट्यानी भरल्या असतां आणि गांवांतील सर्व घरेंहि भरलेलीं असतां, आणि त्या सर्व पाट्या एका वावरांत एकावर एक रचून ठेविल्या असतां आणि त्यांवरील रेघांची गणना केली असतां किती वर्षें होतील.

**गोविं.**—बबब! आई, तें कोणाच्यानें सांगवणार नाहीं. त्यांची गणना करितां आयुष्य भरेल तथापि होणार नाहीं.

**गंगा.**—बरें मुला, तुझा आत्मा जितक्या ह्या पाट्यांवर रेघा आहेत तितकीं वर्षें वांचेल.

**गोविं.**—मग मरण पावेल कीं काय, आई?

**गंगा.**—नाहीं, मुला. तो मरण पावणार नाहीं, तो तसाच राहील. पुढेंहि या ढिगांतील पाट्यांवर जितक्या रेघा आहेत तितकीं वर्षें जगेल, मगहि मरणार नाहीं, तो तसाच वांचत जाईल. ह्या पाट्यांच्या ढिगासारिखें दुसरे शतावधि ढीग असतां त्यांतील पाट्यांवर जितक्या रेघा असतील तितकीं वर्षें तो वांचेल, ह्मणजे तो कधींहि मरण पावणार नाहीं.

**गोविं.**—अगे वया, माझा आत्मा किती वर्षें वांचेल! हें मला समजत नाहीं. परंतु तो कोठें राहील? जेव्हां मी मरेन तेव्हां तो कोठें जाईल? त्याचें संरक्षण कोण करील? तो तेव्हां काय करील? तो विचार करीत जाईल कीं काय? तुझा माझा आणि प्रिय रमीचा आत्मा एका ठिकाणीं जाईल कीं काय? हें तुला ठाऊक आहे, आई? जर ठाऊक असेल तर मला सांग. ही गोष्ट सगळी समजावी असी माझी फार इच्छा आहे.

**गंगा.**—गोविंदा, हें तुला सांगायास आतां तर वेळ राहिला नाहीं; परंतु पुढें सांगेन, त्यास फार दिवस लावणार नाहीं. आत्म्याविषयीं तुला पुष्कळ समजावें लागेल; तुझें शरीर मेल्यानंतर तो कोठें जाईल आणि तुझ्या आत्म्यानें सर्वकाळ सुखी राहावें ह्मणून आतां तुला काय करावें लागतें, तें तुला फार समजलें पाहिजे. कां कीं आत्मा अमर आहे, त्याला कधीं मरण नाहीं. हें ध्यानांत ठेवावें.

हें सर्व ऐकून गोविंद निजायास गेला; परंतु त्यास कांहीं वेळपर्यंत झोंप लागेना. आत्म्याविषयीं तो मनन करीत होता. आणि शरीर मेल्यानंतर तो कोठें जाईल याविषयीं त्याला मोठा विचार पडला.

## बाराव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. अनात्मा काय आहे? आत्मा काय आहे?
२. कोणीएकाचें प्रेत पुरतांना त्वां कधीं पाहिलें कीं काय?
३. भूमींत काय पुरलें जातें?
४. तुझें शरीर कधीं पुरतील काय?
५. तुझा आत्मा पुरतील काय?
६. तुझें शरीर मेल्यानंतर तुझा आत्मा वांचेल काय?
७. तुझा आत्मा कधीं मरेल काय?
८. तो कोठपर्यंत वांचेल?
९. त्वां एक पाटी पाठपोट रेघानीं भरली असतां आणि त्या प्रत्येक रेघेस एकेक वर्ष मानिलें तर तितकीं वर्षें तुझा आत्मा वांचेल कीं काय?
१०. याप्रमाणें रेघानीं भरलेल्या पाट्या एकावर एक आकाशापर्यंत रचून ढीग केला असतां त्यांजवरील जितक्या रेघा आहेत इतकीं वर्षें तुझा आत्मा वांचेल कीं काय?
११. त्यांपेक्षां अधिक वांचेल काय?
१२. तर किती वर्षें वांचेल?
१३. अनंतकाळ ह्मणजे काय?
१४. तुझा आत्मा सर्वकाळ वांचेल हें आश्चर्य नव्हे काय?
१५. शरीर मेल्यानंतर तुझा आत्मा कोठें जाईल, कोठें राहील, आणि त्यास कोण पाळील, हें तूं समजण्याला इच्छीत नाहींस काय?

---

## शेवटली संबोधक गोष्ट.

माझ्या प्रिय मुलानो, —गंगाबाई व तिचा मुलगा गोविंद यांविषयीं जितक्या गोष्टी तुह्मास सांगावयाच्या होत्या त्या समाप्त झाल्या; त्या सर्वांचा अर्थ तुह्मी समजून त्यांचें स्मरण ठेवावें, असी माझी आशा आहे.

गोविंद आपल्यास हितकारक ज्ञान आईनें शिकवावें ह्मणून किती उत्सुक होता हें तुह्मी पाहिलें. हे प्रिय मुलानो, जेव्हां तुमचे आईबाप भाऊ बहीण आणि गुरू तुह्मास हितकारक ज्ञान शिकवूं लागतील तेव्हां

तुह्मीहि फार उत्सुक असावें, आणि चित्त देऊन ऐकावें. त्यांच्या बोलण्याचें स्मरण करून त्यांचा आभार मानावा.

जीं सर्व पुस्तकें आह्मी वाचतों त्यांपासून आपणास कांहीं हित घावें ह्मणून प्रयत्न करावा. ह्या लाहान पुस्तकापासून कांहीं हित तुह्माला मिळणार नाहीं कीं काय? गोविंदाप्रमाणें तुह्मा प्रत्येकामध्यें आत्मा आहे जो शरीराचा नाश झाल्यानंतर वांचेल आणि सर्वकाळ वांचेल, कधीं मरणार नाहीं, त्याचें स्मरण मनांत न ठेवावें काय?

याविषयीं विचार करा; आपल्या आत्म्याविषयीं अणखी सांगावें ह्मणून आईबाप किंवा गुरू यांपासीं विनंती करा. आणि तुह्मी मेल्यानंतर तुमचा आत्मा पवित्र सुखी राहावा ह्मणून आह्मास काय केलें पाहिजे असें आईबाप किंवा गुरू यांपासीं पुसा. आणि कदाचित् देवाच्या कृपेनें मीहि दुसरा ग्रंथ करून तुमच्या आत्म्याविषयीं अणखी सांगेन.

मी तुमचा मित्र आहें,

थामस ह. गाल्लादेत.

समाप्त.

THE

# CHILD'S BOOK ON THE SOUL.

## PART II.

---

# आत्म्याविषयीं लेंकरांची दुसरी पोथी.

मुंबई
आमेरिकान् मिशन् छापखान्यांत छापिलें.
ख्रिस्ती शक १८४४.

1844

# आत्म्याविषयीं लेंकरांची दुसरी पोथी.

---

आत्म्याविषयीं लेंकरांची पहिली पोथी ज्या मुलांनी वाचिली त्यांस पत्र.

हे माझ्या प्रिय मुलांनो;

आत्म्याविषयीं म्या पहिली पोथी लिहिली, तिजमध्यें सांगितलें होतें कीं, कदाचित् मी दुसरी एक लाहान पोथी लिहून तुह्मास आपल्या आत्म्यांविषयीं कांहीं अणखी सांगेन. ती पोथी आतां केली आहे. जसी तुह्मी चित्त लावून ती पहिली पोथी वाचिली, त्याप्रमाणें हीहि वाचावी, असी मी इच्छा करितों. जें म्या पूर्वीं सांगितलें त्याची आठवण करा; तें असें कीं, तुह्मी वाचीत असतां कांहीं गोष्ट जर तुह्माला समजत नाहीं, तर ती समजावी ह्मणून कोणाएकाजवळ अगत्य पुसून घ्यावें.

या पुस्तकांत गंगाबाई व तिचा पुत्र गोविंदा यांचीं कांहीं अणखी संभाषणें होतील. गोविंदाने आपल्या आत्म्याविषयीं अणखी समजत जावें ह्मणून फार इच्छा धरिली. तसीच इच्छा तुह्मी धरा, ह्मणजे तुह्माला उपदेश करणें हें मला फारच आवडेल.

---

## संभाषण १.

आपला आत्मा कधींहि मरण पावणार नाहीं, असें गोविंदाच्या आईनें सांगितल्यानंतर त्याविषयीं त्यानें अति विचार केला. मेल्यावर शरीर खांचेंत पुरतील तेव्हां आत्मा कोठें जाईल, याविषयीं तो त्या रात्रीं पलंगावर फार वेळपर्यंत चिंतन करीत जागा राहिला. दुसऱ्या दिवसीं प्रातःका-

ळीं घरांतील कोणीएक उठलें नाहीं, इतक्यांत तो उठला, आणि आपल्या आईच्या खोलींत धांवत येऊन तिला उठवून बोलला कीं, “अगे आई, तूं मला आत्म्याविषयीं अणखी सांगसील, तर मला आनंद वाटेल.” हें ऐकून गंगाबाई ह्मणाली कीं, “गोविंदा, दम धर, न्याहारी झाल्यावर सांगेन.” तो चांगला मुलगा होता, ह्मणून तो आपलें पुस्तक घेऊन बसून आपला धडा घट्ट करूं लागला. त्या सकाळीं पाऊस मोठा पडला, त्यामुळें तो फिरावयास बाहेर गेला नाहीं. न्याहारी झाल्यानंतर गंगाबाई मुलांस घेऊन पुस्तकखान्यांत गेली. तेथें कांहीं चित्रें होतीं, त्यांकडे रमी पाहत बसली आणि गोविंदा व त्याची आई यांचें असें संभाषण झालें.

**गोविंदा** ह्मणाला; बये, आत्मा कधींहि मरण पावणार नाहीं हें समजून मला आश्चर्य वाटतें. माझें शरीर मरेल असें मी समजलों होतों, कारण कीं लाहान जगू मेल्यावर म्या त्याला पाहिलें, तेव्हां माझ्या मनांत आलें कीं, मी त्यासारिखा मरेन; आणि माझें शरीर खांचेंत पुरतील. असें मनांत आणून मला मरणाचें फारच भय वाटलें

**गंगा.**— मुला, आतां तुला मरणाचें भय वाटतें कीं काय ?

**गोविं.**— होय, बये, वाटतें. मला मूठमाती झाल्यानंतर मी तुला, व रमीला, किंवा कोणीएकाला कधीं भेटणार नाहीं, असा विचार करून मला अगोदर मरणाचें भय वाटलें. परंतु आतां मला मरणाचें भय यावरून वाटतें कीं शरीर मरून तें खांचेंत पुरल्यावर माझा आत्मा कोठें जाइल, आणि त्याचें रक्षण कोण करील, हें मला ठाऊक नाहीं ह्मणून.

**गंगा.**— तेंच मी तुला स्पष्ट सांगेन आणि तुला मरणाचें भय किमपि न व्हावें, ह्मणून तुला काय करावें लागेल, तें मी कळवीन.

**गोविं.**— आई, तें समजून मला किती सुख वाटेल ! आतांच मला कां सांगत नाहींस बरें?

**गंगा.**—कांहींसा धीर धर, गोविंदा. आपला आत्मा जो तुजमध्यें विचार करितो, आणि सुखदुःख पावतो, आणि बरें वाईट जाणतो, त्याची

गोष्ट एकाएकींच समजावी असी तुझी इच्छा होती याची तुला आठवण नाहीं काय ? बरें त्या वेळेस जें मी तुला शिकवीत होतें तें एकाएकीं समजला नाहींस, परंतु मी तुला सांगतां सांगतां तुझ्या ध्यानांत आलें कीं नाहीं ? आतांहि त्याप्रमाणेंच तुला सावकाशीनें उलगडा करून सांगावें लागेल. नाहींतर माझें बोलणें तूं समजणार नाहींस.

**गोविं.**— बरें आई, मला कसें शिकवावें, हें तूं मजपेक्षां चांगलें समजतीस, असें नेहमी पाहतों. यास्तव मी उतावळी करणार नाहीं. पण गोष्टीचा आरंभ तरी कर.

**गंगा.**— मरणकाळीं लागलाच तुझा आत्मा शरीरांतून निघेल. तो कोठें जाईल आणि त्याचें रक्षण कोण करील, हें समजण्याची इच्छा आहे ना ?

**गोविं.**—होय, बये, तीच माझी इच्छा आहे. कारण जसा लाहान जगू मेला, तसा जर मी लाहानपणींच मेलों, तर तुजपासून निघून कोठें जाईन हें मला ठाऊक नाहीं; मग माझी मायाळू आई माझें संरक्षण करावयाला जवळ होणार नाहीं, तर कोण माझें रक्षण करील ?

**गंगा.**— तुझा बाप करील, मुला.

**गोविं.**— आई, माझा बाप मेला. तो कोठें गेला आहे हें मला ठाऊक नाहीं. जेथें तो आहे तेथेंच मी जाईन काय, आणि मग तो माझें रक्षण करील बरें ?

**गंगा.**—तूं जासील मुला, असी माझी आशा आहे, परंतु दुसऱ्या बापाविषयीं मी ह्मणत होतें.

**गोविं.**— आई, मी तुझें बोलणें समजत नाहीं. माझ्या बापाला माझेंच नाव होतें असें तूं मला सांगेस. त्याचें नाव मसनवटींत थडग्याच्या चिऱ्यावर कोरलें आहे, तें त्वां मला दाखविलें. आपण थडग्याजवळ उभीं राहिलों तेव्हां तुझ्या डोळ्यांतून पाणी पडलें, तें पाहून मीहि रडलों. मला बापाची आठवण नाहीं, पण तो फार चांगला होता, त्यानें आह्मावर अति माया केली, आणि त्यावर तुझी प्रीति फारच हो-

तो, असें त्वां मला सांगितलें आहे. तर माझा दुसरा बाप कोण आहे? त्वां त्याला कधीं पाहिलें काय? तो कोठें आहे? त्यालाहि पाहावें असी माझी फार इच्छा आहे.

**गंगा.**— गोविंदा, तुझ्या लाहानपणींच मेला असा तुला बाप होता खरें, तोच रमीचा बाप. तोच माझा नवरा होता. त्याचें नाव गोविंदा. परंतु तुला दुसरा बाप आहे, तो त्या आभाळाच्या वरतें राहतो. हाच रमीचा, माझा, आणि पृथ्वींतील सर्व पुरुष, बायका, लेंकरें यांचाहि बाप आहे. तूं चांगला मुलगा राहून जें कांहीं त्यानें तुला सांगितलें तें जर करसील तर जेथें तो राहतो, तेथें तूं मरण पावल्यावर जासील, आणि तो तुझें संरक्षण करून सर्वकाळ तुला सुखरूप ठेवील.

**गोविं.**— बये, त्या बापाला त्वां कधीं पाहिलें कीं काय?

**गंगा.**— नाहीं, मुला. परंतु त्याविषयींचें एक पुस्तक मजजवळ आहे. आणि त्या बापानें आतां आह्मावर प्रीति करावी, आणि मरणकाळींहि प्रीति करावी, आणि ज्या उत्तम जाग्यांत तो राहतो, त्यांत त्यानें आमचे आत्मे नेऊन आपल्याजवळ राहूं द्यावें, ह्मणून आह्मास काय केलें पाहिजे तें ह्या पुस्तकाकडून कळूं येतें.

**गोविं.**— अगे आई, या चांगल्या मायाळू बापाचें नाव काय आहे, आणि तो कोठें राहतो?

**गंगा.**— मुला, त्याचें नाव ईश्वर असें आहे. तो आकाशलोकांत राहतो. त्याला आह्मी आकाशांतील बाप असें ह्मणतों.

**गोविं.**— माझ्या प्रिय आई, किती नव्या व चमत्कारिक गोष्टी त्वां मला सांगितल्या आहेत. ईश्वर जो आमचा आकाशांतील बाप त्याविषयीं, आणि जी चांगली जागा आकाशलोक ह्मटलेली त्याविषयीं, आणि या गोष्टींचें वर्णन करणारें जें पुस्तक तुजजवळ आहे त्याविषयीं अणखी समजण्याची मला फार इच्छा आहे.

**गंगा.**— मुला, तुला ईश्वराविषयीं अणखी समजण्याची इच्छा आहे हें पाहून मला मोठा आनंद आहे. जें पुस्तक देवानें मला दिल्हें आहे त्या

पुस्तकांतील गोष्टी तुला सांगेन आणि तें आपण वाचून समजावें ह्मणून तुला शिकवीन असी माझी आशा आहे, कां कीं सर्व पुस्तकांमध्यें हें उत्तम पुस्तक आहे. जे कोणी हें वाचितात ते ज्ञानी होतात, आणि जे त्यावर प्रीति करून तें मानितात, त्यांस मरणाचें भय धरण्याचें कारण नाहीं; कारण कीं शरीरांतून प्राण गेल्यावर लागलेच त्यांचे आत्मे आकाशलोकांत जाऊन निरंतर सुख उपभोगितील, आणि तेथें ईश्वर जो त्यांचा आकाशांतील बाप तो त्यांवर प्रीति करून त्यांचें रक्षण सर्वकाळ करील, असें तें पुस्तक सांगतें.

परंतु या गोष्टी सांगतांना बहुत वेळ गेला, तर आतां पुरें. पाऊस उघडला ह्मणून तूं आणि रमी बाहेर जाऊन खेळा. सांजेस जाण्याची वेळ होईल, तेव्हां मी तुह्माला हाक मारीन.

---

## पहिल्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तुला मरणाचें भय आहे कीं काय?

२. तुला मरणाचें भय कां वाटतें?

३. त्वां मरणाचें भय न धरावें ह्मणून तुला काय केलें पाहिजे तें समजण्याची इच्छा आहे काय?

४. तूं मेल्यावर तुझ्या आत्म्याचें रक्षण कोण करील?

५. आमचा बाप जो आकाशलोकांत आहे त्याविषयीं आणि त्याची कृपा प्राप्त होण्यासाठीं आह्मास काय केलें पाहिजे त्याविषयीं कोणतें पुस्तक वाचण्यानें समजेल?

६. तो कोठें राहतो?

७. जें तो सांगतो तें आह्मी केलें ह्मणजे मेल्यानंतर आह्मी कोठें जाऊं?

८. ईश्वराची गोष्ट आह्माला समजावी ह्मणून त्यानें आह्मास काय दिलें?

९. ज्यांस मरणाचें भय धरण्याचें कारण नाहीं ते कोण आहेत?

१०. त्यांच्या शरीरांतून प्राण निघेल तेव्हां त्यांचे आत्मे लागलेच कोठें जातील आणि त्यांचें संरक्षण कोण निरंतर करील?

---

## संभाषण २.

दोन प्रहर झाल्यानंतर गोविंदाची मावशी गंगाबाईला भेटावयास आली, ह्मणून संध्याकाळीं आईनें त्यासीं आपल्या आत्म्याविषयीं भाषण केलें नाहीं. परंतु तिनें असें सांगितलें कीं, "उद्यां तुझी मावशी गेल्यावर मी तुजसीं बोलेन." त्याची मावशी रमीला आपल्या घरीं नेणार होती, आणि ती तेथें दोन तीन आठवडे राहणार होती. आपली बहीण जाणार आहे असें समजून गोविंदाला कांहींसें दुःख वाटलें. पण त्याला ठाऊक होतें कीं तेणेंकरून रमीला सुख होईल, कां कीं तिच्या जीवाला बरें वाटत नव्हतें. दुसऱ्या दिवसीं सकाळीं रमी व तिची मावशी या उभयतां गाडींत बसून निघून गेल्या, आणि गोविंदा व त्याची आई घरांत आल्यावर तिनें त्याला सांगितलें कीं, "चल आपण फिरायाला जाऊं, आणि नदीच्या कांठीं जाऊन बसूं." ही नदी घराजवळ होती, त्या जाग्यामध्यें गंगाबाई वारंवार जाऊन फिरत असे. ह्या नदीच्या तिरासींच एक झाडांची राई होती, त्यांतल्या एका झाडाखालीं बैठक होती, तिजवर गोविंदा आणि त्याची आई दोघें बसलीं. त्या मनोरम व निवांत जाग्यांत त्यांचें हें संभाषण झालें.

**गोविं.**—आई, देव जो आमचा आकाशांतील बाप त्याविषयीं कांहीं अणखी सांगेन, असें तूं बोललीस. जर आतां सांगसील तर तुझें ऐकावयास मला फार संतोष होईल.

**गंगा.**—मुला, ज्या गोष्टी मी सांगेन त्यांतील कदाचित् कांहीं समजावयास तुला अवघड पडेल. ईश्वर फार मोठा आहे, आपण फार हलके. तो परमपराक्रमी आहे, आपण अतिदुर्बळ आहों, तो अत्यंत ज्ञानी, आपण फार अज्ञानी. ह्मणून आपणांस त्याविषयीं फार समजतां येत नाहीं. कधींमधीं तूं बोलतोस कीं, 'आई, जें तूं करितीस व बोलतीस तें मी समजत नाहीं, कारण कीं मी लाहान मुलगा आहें.' त्या वेळेस मी तुला सांगत असतें कीं, 'तूं प्रौढ झाल्यावर तुला समजेल,' तसें आह्माला आतां ईश्वराविषयीं केवळ थोडकेंच समजतां येतें. आह्मी त्यावर प्रीति करून त्याच्या आज्ञा मानिल्या तर मेल्यावर आमचे आ-

त्मे आकाशलोकांत जाऊन तेव्हां ईश्वराविषयीं अधिक ज्ञान पावतोल. तेथें अवघड गोष्टी आह्माला उघड केल्या जातील. ईश्वर व त्याचा चांगलेपणा यांविषयीं आह्मी निरंतर अणखी शिकत शिकत जाऊं.

**गोविं.**— बये, देवाच्या बहुत गोष्टी समजावयास कठीण आहेत हें मला नवल वाटत नाहीं. तो कसा आहे हें देखील मला कांहीं समजत नाहीं. तो आपणासारिखा आहे कीं काय, आई?

**गंगा.**— कांहीं प्रकारानी आह्मी त्यासारिखीं आहों. परंतु त्याला कांहीं शरीर नाहीं, तो केवळ आत्मा आहे. ज्या परमात्म्याने तुला, मला, आणि पृथ्वींतील सर्व लोक, पशु, पांखरें, मासे, इत्यादि जीवजंतु, आणि वृक्षादि आणि पृथ्वी, सूर्य, चंद्र, नक्षत्रें, ह्या सर्वांस उत्पन्न केलें, तो तोच आहे; त्याने जें जें उत्पन्न केलें त्याचें रक्षण तो करितो, आणि सर्व प्राणी व वस्तू यांवर तो अधिकार करितो.

**गोविं.**— अगे आई, हें अवघें ईश्वर करितो तर मग त्याची शक्ति किती असेल! पण त्याला शरीर नाहीं असें कसें होईल, हें मला समजत नाहीं. त्याला शरीर नाहीं तर त्याला डोळे नाहींत. तर सर्वांचें रक्षण करावयाला तो कशाने पाहील?

**गंगा.**— माझ्या मुला, देवाविषयींच्या कांहीं गोष्टी समजणें तुला कठीण पडेल, असें म्या तुला सांगितलें; त्यांतील ही एक गोष्ट आहे कीं त्याला आह्मासारिखे डोळे नसतां तरी सर्व प्राणी व पदार्थ यांचें रक्षण करण्यासाठीं त्याला पाहतां येतें. पण तें कसें आहे हें कदाचित् माझ्याने थोडेंबहुत स्पष्ट करवेल. तें तर मलाहि केवळ थोडेंच समजतें.

**गोविं.**— सांग बये, मी फार चित्त लावीन.

**गंगा.**— म्या तुला पूर्वीं सांगितलें होतें कीं तुझा आत्मा व शरीर यांचा फार भेद आहे. तुला आपलें शरीर पाहतां येतें, ऐकतां येतें, त्याची रुचि व वास घेतां येतो, आणि त्याला स्पर्श करितां येतो, तें अनात्मरूप आहे. परंतु तुझ्या आत्म्याला आकार, रंग, नाद, रुचि, वास, कठीणपण, मऊपण, इत्यादि गुण नाहींत तो अनात्मक नव्हे, तो

अनात्मक पदार्थांसारिखा किमपि नाहीं. तो केवळ आत्मा आहे.

**गोविं.**— त्या सर्व गोष्टींचें स्मरण आहे, आई, आणि ती मला चांगली समजती असें वाटतें.

**गंगा.**— बरें, त्या वेळेस तूं असें ह्मणालास कीं नाहीं, कीं जेव्हां माझ्या दृष्टीस पदार्थ पडत नाहींत, तेव्हां मी त्यांकडे पाहत आहें, असें मला मनांत आणितां येतें.

**गोविं.**— होय बये, मी असें बोललों.

**गंगा.**— तर पाहा, आत्मा व शरीर यांचा भेद मोठा आहे; असें असतां आत्म्याचे व्यापार शरीराच्या व्यापारांपासून फार वेगळे आहेत यांत कांहीं आश्चर्य नाहीं. शरीराला डोळे आहेत, त्यांकडून विषय त्याच्या दृष्टीस पडतात. आत्म्यालाहि डोळे आहेत, आणि त्यांकडून त्याला विषय पाहतां येतात.

**गोविं.**— पण बये, आपल्या मस्तकाच्या आंत आत्मा आहे, तेथें मला डोळे नाहींत.

**गंगा.**— मुला, ज्या डोळ्यानी तूं आतां मजकडे पाहत आहेस त्यांसारिखे डोळे आत्म्याला नाहींत खरें, पण तुझे डोळे मिटले असतां तुझ्या आत्म्याला स्वतः वस्तू पाहतां येतात. यावरून आत्म्याला डोळे आहेत असें लोक ह्मणतात. याचा अर्थ असा आहे कीं शरीराच्या डोळ्यांवांचून आत्म्याला स्वतः वस्तू पाहतां येतात, दुसरा अर्थ नाहीं.

**गोविं.**— बये, मी तुझी गोष्ट थोडी थोडी समजूं लागलों, तरी अझून फार चांगली समजत नाहीं.

(गंगाबाई घड्याळ दाखवून ह्मणती,) "हें काय आहे, गोविंदा?"

**गोविं.**— तें तुझें घड्याळ, आई.

**गंगा.**— बरें, माझें घड्याळ सोन्याचें किंवा रुप्याचें आहे, हें आतां आपले डोळे मिटून मला सांग.

**गोविं.**— तें सोन्याचें आहे.

**गंगा.**— असें तुला कशावरून ठाऊक आहे? माझें घड्याळ तुला दिसत नाहीं.

**गोविं.**— खरेंच, पण तें कसें दिसतें हें माझ्या ध्यानांत बरोबर येतें.

**गंगा.**— तूं आपल्या आत्म्यानें ह्मणजे मनानें तें पाहतोस. जसा तूं आपल्या शरीराचे डोळे घड्याळाकडे लावून तें पाहत असतोस, तसाच तूं आतां आपल्या मनाच्या डोळ्यांनी तें पाहत आहेस.

**गोविं.**— आतां मी आपले डोळे उघडूं, बये?

**गंगा.**— नको, ते अमळसे तसेच असूं दे.

**गोविं.**— असें ठेवण्यास फार अवघड आहे.

**गंगा.**— गोविंदा, मी रूमाल तुझ्या डोळ्यांवर बांधीन, ह्मणजे तुझे डोळे मिटून ठेवणें सुलभ होईल. (गंगाबाई रूमालानें गोविंदाचे डोळे बांधिती).

**गोविं.**— आतां बये, जरी पाहण्याचा यत्न केला तरी मला किमपि पाहतां येणार नाहीं.

**गंगा.**— आतां मुला, तुझी बहीण रमी कशी दिसती हें मला सांग.

**गोविं.**— जशी आज सकाळीं ती दिसली तसीच जर पाहिली तर ती थोडी पिकूट दिसती. तिच्या जीवाला बरें वाटत नव्हतें असें मला वाटतें. अणखी ती आह्माला सोडून जाणार होती, ह्मणून कदाचित तिला कांहीं दुःख वाटलें असेल.

**गंगा.**— पण तुला रमी दिसत नाहीं आणि तुझे डोळे उघडले तरी ती दृष्टीस पडणार नाहीं.

**गोविं.**— खरें, आई, परंतु तिचें स्वरूप कसें दिसतें, हें माझ्या मनांत स्पष्ट येतें.

**गंगा.**— लाहान जगू जिवंत होता तेव्हां त्याचें स्वरूप कसें दिसलें, हें तुझ्या मनांत बरोबर येतें बरें?

**गोविं.**— होय बये, तें माझ्या मनांत येतें, मी त्याबरोबर खेळावयास

जाई त्या वेळेस जसा तो कधींमधीं आपल्या वापाच्या दरवाजाजवळ उभा राही, तसाच मी आतां त्याला पाहतों.

**गंगा.**—तुझी लाहान वहीण जिवंत आहे आणि तुझा खेळगडी मेला आहे त्या दोघांला तूं आपल्या मनानें, ह्मणजे आपल्या मनाच्या डोळ्यानी सारिखेंच चांगलें पाहतोस. आतां गोविंदा, आपलें घर व वाग हीं कसीं दिसतात हें तुला मनांत आणितां येईल कीं काय?

**गोविं.**— मनांत आणितां येतें बये, आमच्या घरापलिकडे रस्ता, देऊळ, आणि दुसरीं घरें, हीं अवघीं माझ्या दृष्टीस पडल्यासारिखें वाटतें.

**गंगा.**—तुझ्या मावशीच्या घराजवळ एक उंच डोंगर आहे त्यावर आपण जाऊन वसलों, आणि तेथून सर्व जें दृष्टीस पडलें, तें किती सुंदर दिसलें हें तुझ्यानें मनांत आणवतें कीं काय?

**गोविं.**—हो होय, आई. तें सर्व माझ्या दृष्टीस पडत आहे. शेतें, रानें, नदी, घरें, कामकरी, गायी, मेंढरें, रमणीय शोभाणी, हीं अवघीं जसीं म्या त्या डोंगराच्या माथ्यावर उभा राहून पाहिलीं तसींच तीं मी आतां पाहतों.

**गंगा.**— जे लोक व पदार्थ त्वां फार दिवसांमागें पाहिले, ते मनांत आणितां येतात कीं काय?

**गोविं.**—येतात बये, आणि जर मी दिवसभर डोळे झांकून जे पदार्थ अगोदर पाहिले त्यांविषयीं विचार करितों, तर जसे ते अगोदर दिसले तसेच ते सर्व दिसतील, असें मला वाटतें.

**गंगा.**—अगोदर त्वां आपल्या देहाच्या डोळ्यानी त्यांस पाहिलें, परंतु आतां तूं आपल्या आत्म्यानें ह्मणजे मनाच्या डोळ्यानी पाहतोस.

तर असा विचार कर कीं, जर एवढीं माणसें व पदार्थ तुला आपल्या आत्म्यानें पाहतां येतात, तर जीं सर्व माणसें व पदार्थ ईश्वरानें उत्पन्न केले आणि ज्यांचें रक्षण तो करितो, तीं अवघीं त्याला आपल्या आत्म्यानें ह्मणजे आपल्या मनाच्या डोळ्यानी पाहावयाचें कठीण नाहीं. जसें तुझ्या शरीराचे डोळे मिटले असतां तुला विषय पाहतां येतात; त्याप्रमाणें ईश्व-

राला शरीराचे डोळे नसतां तरी त्याला पदार्थ पाहतां येतात. तो सर्व लोक व सर्व पदार्थ पाहतो. तो तुला सर्वदां पाहत आहे. त्यानें तुला निरंतर पाहिलें आहे, आणि तो तुला निरंतर पाहील; जें जें तूं करितोस तें तें तो पाहतो. तुझ्या मनांतले सर्व विचार व वासना तो पाहतो. त्याजपासून तुझ्यानें कांहीं लपवत नाहीं.

जे कोणी वाईट करितात त्यांवर ईश्वर प्रीति करीत नाहीं. यास्तव वाईट करणें, वाईट बोलणें, वाईट विचार आणि वाईट वासना बाळगणें, यांचें भय धर, मुला; कां कीं ईश्वर तुला निरंतर पाहतो असी आठवण कर.

**गोविं.**— आहा! बये, ईश्वर किती मोठा आहे! त्यानें मजवर प्रीति करावी आणि मला मरणकाळीं आकाशलोकांत आपल्याजवळ न्यावें, ह्मणून जें योग्य तेंच मी नेहमी करीन आणि बोलेन, आणि चांगले विचार आणि वासना मनांत बाळगीन, असी मला आशा आहे.

**गंगा.**— तसीच मला आशा आहे, माझ्या प्रिय पुत्रा. परंतु उशीर झाला. आतां रुमाल काढ, आणि आपण घरीं जाऊं. आज संध्याकाळीं ईश्वर जो तुझा आकाशांतील बाप त्याविषयीं मी तुला अणखी सांगेन.

---

## दुसऱ्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. आह्माला ईश्वराविषयीं फार समजतां येईल कीं काय? कां नाहीं?

२. तुझ्या आईबापांचें बोलणें व करणें, हें समजावयास तुला कधीं अवघड वाटतें काय? असें तुला कां वाटतें?

३. आतां आह्माला देवाविषयीं जें ज्ञान आहे त्यापेक्षां अधिक ज्ञान कधीं प्राप्त होईल कीं काय?

४. ईश्वर आह्मासारिखा आहे काय?

५. ईश्वराला शरीर आहे काय?

६. ईश्वर कोण आहे?

७. त्यानें काय काय उत्पन्न केलें आहे ?
८. तो काय काय करीत आहे ?
९. अनात्मा काय आहे? आत्मा काय ?
१०. तुझा आत्मा तुझ्या शरीरासारिखा आहे कीं काय ?
११. तुझें शरीर काय आहे? तुझा आत्मा ह्मणजे तुझें मन काय आहे?
१२. तुझ्या आत्म्याचे व्यापार शरीराच्या व्यापारांसारिखे आहेत काय?
१३. आपले डोळे मिटून तुझ्यानें पदार्थ पाहवतात बरें ?
१४. ते शरीराच्या डोळ्यानी दिसत नाहींत तर तूं कशानें पाहतोस?
१५. लोक ह्मणतात कीं आत्म्याला डोळे आहेत याचा अर्थ काय?
१६. तुझे डोळे मिटले तेव्हां पदार्थ कसे दिसतात हें तुझ्या मनांत बरोबर आणितां येतें काय ?
१७. जे पदार्थ तुला मनांत बरोबर आणितां येतात तसे कांहीं तरी मला सांग.
१८. जे लोक व पदार्थ बहुत दिवसांमागें तुझ्या दृष्टीस पडले ते आतां मनांत आणितां येतात काय ?
१९. अगोदर ते कशानें पाहिले ?
२०. आतां ते कशानें पाहतोस ?
२१. ईश्वर सर्व प्राणी व पदार्थ यांस कशानें पाहतो ?
२२. ईश्वरानें तुला सर्वदां पाहिलें आहे काय ?
२३. तो तुला निरंतर पाहतो काय ?
२४. ज्यावर देव प्रीति करीत नाहीं तो कोण ?
२५. त्वां कशाचें भय धरावें ?
२६. त्याचें भय कशाला धरावें ?

---

## संभाषण ३.

देवाविषयीं पुन्हा संध्याकाळीं सांगेन असें गंगाबाईनें गोविंदाला वचन दिल्हें होतें तें ती विसरली नाहीं. ती त्याला घेऊन बैठकीच्या खोलींत

जाऊन खिडकीजवळ बसली. त्या खोलींत दिवा नव्हता, चंद्राचा प्रकाश निवळ पडत होता व आकाशांत नक्षत्रें फार दिसत होतीं, यास्तव त्याच्या प्रकाशामुळें त्यांस दुसऱ्या उजेडाची गरज लागली नाहीं. त्या समयीं जें गोविंदाच्या दृष्टीस पडलें तें पाहून जसे अगोदर कधीं मनांत आले नव्हते तसे विचार येऊं लागले. तेव्हां तो ह्मणाला कीं, "ईश्वर किती मोठा आहे तो हा लखलखीत चंद्र आणि हीं सुंदर नक्षत्रें या सर्वांचा उत्पन्न करणारा आणि रक्षण करणारा आहे तर तो केवढा शक्तिमान् असेल!

**गंगा.**—तें खरेंच मुला, आणि ईश्वर जसा थोर तसा चांगलाहि आहे. तो तुझें आणि सर्व लाहान लेंकरांचें संरक्षण करितो, आणि एखादी लाहान चिमणी झाडावर आपलें कोटें करिती तिची देखील त्याला चिंता आहे.

**गोविं.**—पण बये, माझें व रमेचें रक्षण करण्याकरितां तुला आमच्याजवळच असलें पाहिजे. घरांतील जिन्नसांचें रक्षण करण्याकरितां तुला खोल्याखोल्यांतून जावें लागतें; परंतु देवाला शरीर नसतां तो सर्व पदार्थांचें संरक्षण करण्यासाठीं जागोजागीं कसा जाईल?

**गंगा.**—ईश्वर सर्वत्र आहे, तो सर्वदां सर्व ठिकाणीं आहे.

**गोविं.**—बये, तुझी गोष्ट समजावयास अवघड आहे.

**गंगा.**—गोविंदा, पुष्कळ गोष्टी अशा आहेत कीं, आह्मी त्या खऱ्या असें मानितों परंतु त्या समजावयाला अवघड आहेत. तुझा आत्मा व शरीर यांचा फार भेद आहे, आत्मा शरीरासारिखा क्रिमपि नाहीं हें तुला ठाऊक आहे कीं नाहीं?

**गोविं.**—होय बये, तें मला फार चांगलें समजतें असें वाटतें.

**गंगा.**—तुझा आत्मा कोठें आहे?

**गोविं.**—तो माझ्या शरीरामध्यें कोठें तरी आहे, आणि मला असें वाटतें कीं तो माझ्या मस्तकामध्यें आहे, कारण जेव्हां मी एकाग्रतेने विचार करितों तेव्हां माझ्या मस्तकांत कृति होती, असें मला वाटतें.

**गंगा.**— बरें तर तुझा आत्मा मस्तकांत केवढी जागा आटोपितो ?

**गोविं.**— तें मला ठाऊक नाहीं. त्याला कांहीं जागा लागती कीं काय?

**गंगा.**— जर तो तुझ्या मस्तकामध्यें आहे, गोविंदा, तर त्याला तेथें जागा पाहिजे, ती जागा कितीहि लाहान असो, तथापि कांहीं तरी जागा त्याला लागती असें मनाला भासतें. तर आतां पाहा, जर तुझा आत्मा हो त्यांत जागा आटोपितो तर कांहीं तरी लांबी व रूंदी त्याला आहे. अणखी जर तुझ्या आत्म्याला लांबी व रूंदी आहे तर एका प्रकारें तो खड्यासारिखा आहे, कारण खड्याला लांबी व रूंदी आहे. मग जर तुझा आत्मा खड्यासारिखा आहे तर तो अनात्मकासारिखा आहे.

**गोविं.**—बरें, बये. माझा आत्मा किती चमत्कारिक आहे हें माझ्या लक्षांत येतें तो माझ्या मस्तकांत आहे, पण तो अनात्मकासारिखा किमपि नाहीं. तर तो माझ्या मस्तकांत आहे कसा हें मला सांगतां येत नाहीं.

**गंगा.**— माझ्या मुला, तुझा आत्मा जर एवढा आश्चर्ययुक्त आहे, आणि त्याच्या कांहीं गोष्टी समजावयास एवढ्या अवघड आहेत, तर ईश्वर जो परमात्मा त्यासंबंधी पुष्कळ गोष्टी समजावयाला केवढें अधिक अवघड पडतील. जें पुस्तक त्यानें आह्मास दिल्हें आहे त्यांत त्याजविषयीं वहुत गोष्टी आहेत, त्यांचें ज्ञान आह्माला दुसऱ्या प्रकारें कधींहि प्राप्त झालें नसतें, पण त्या पुस्तकाकडून ईश्वरानें आपल्याविषयीं आह्मास शिकविलें आहे, यांत त्याची कृपा फार आहे, यास्तव जें जें तो आह्माला कळवितो त्याविषयीं जरी आमच्यानें केवळ थोडें समजवतें आणि जरी त्यांतल्या कांहीं गोष्टी समजावयास फार कठीण आहेत, तरी आह्मी त्या सर्वांवर विश्वास ठेवावा, हें योग्य आहे.

**गोविं.**— बये, जसजसा मी प्रौढ होतों, तसतसें मला पूर्वींपेक्षां अधिक समजतें असें माझ्या पाहण्यांत येतें. अगोदर तूं मला सांगेस त्यावर माझी खातरी होई, कारण कीं तूं नेहमी मजजवळ खरें बोल-

तोस, असें मला ठाऊक होतें. लोहचुंबकाचा तुकडा घेऊन जर तूं सुईजवळ ठेवसील, तर तो आपल्याकडे सुईला ओढून घेईल, असें त्वां मला एका दिवसीं सांगितलें, पण तें कसें होईल हें मी समजलों नाहीं. हें समजावयास एवढें कठीण होतें कीं तसें होणार नाहीं, असें बहुत करून मला वाटलें.

**गंगा.**— पण त्या तुला लोखंडाचा तुकडा ह्मणजे लोहचुंबक दाखविला, तेव्हां माझी गोष्ट खरी असी तुझी खातरी झाली कीं नाहीं?

**गोविं.**— होय, आई. सुई लोहचुंबकाकडे चालली, असें त्या आपल्या डोळ्यानी पाहिलें, तरी तें कसें झालें हें मला समजलें नाहीं, आणि आतांहि मला समजत नाहीं. तूं समजतीस, बये?

**गंगा.**— नाहीं मुला, मी समजत नाहीं. अणखी हजारोंहजार गोष्टी ज्या माझ्या दृष्टीस पडतात, त्या सत्य असें मला कळलें, पण त्या समजावयास फार अवघड आहेत. त्या सर्व ईश्वराचें करणें आहेत. तर त्यासंबंधी पुष्कळ गोष्टी समजावयास कठीण आहेत, यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

**गोविं.**— देव सर्व ठिकाणीं आहे, असें तो आपल्या पुस्तकामध्यें आह्मास सांगतो कीं काय?

**गंगा.**— तो असें सांगतो मुला. त्याला शरीर असलें तर तो सर्व ठिकाणीं नसता. जसें आपण इकडून तिकडे चालतों, तसेंच त्याला चालावें लागलें असतें. परंतु त्याला कांहीं शरीर नाहीं, तो शुद्ध आत्मा आहे. तो सर्व ठिकाणीं असून सर्व वस्तू पाहतो. जीं माणसें कधीं उत्पन्न झालीं आणि जीं कधीं उत्पन्न होतील, जें जें घडलें आहे आणि जें जें घडेल तें सर्व तो जाणतो. परंतु तो सर्व ठिकाणीं कसा आहे आणि सर्व गोष्टी कसा जाणतो हें आह्मास समजतां येत नाहीं.

**गोविं.**— बये, जो प्रत्येक शब्द तूं कधीं बोललीस तो देवाला ठाऊक आहे कीं काय?

**गंगा.**— होय, मुला. त्याला प्रत्येक शब्द ठाऊक आहे, आणि माझे

सर्व विचार, वासना, बोलणीं, कृत्यें, हीं सगळीं त्याला ठाऊक आहेत. तुझे सर्व विचार, वासना, शब्द, कामें, हीं त्याला कळलीं आहेत, आणि पृथ्वींतील अवघ्या मनुष्यांचे विचार, वासना, बोलणें, करणें, असीं तो जाणतो. जी देवाला ठाऊक नाहीं, असी कांहींएक गोष्ट नाहीं.

**गोविं.**— बये, तुझ्या पुस्तकखान्यांत जितकीं पुस्तकें आहेत त्यांतील सर्व गोष्टी देवाला ठाऊक आहेत कीं काय?

**गंगा.**— होय, मुला. जगामध्यें जितकीं पुस्तकें आहेत त्या सर्वांतील प्रत्येक गोष्ट त्याला ठाऊक आहे. ईश्वराला कांहींएक शिकण्याची गरज नाहीं. तुला कांहीं गोष्टीचें ज्ञान व्हावें, ह्मणून ती गोष्ट घडेतोंपर्यंत तुला खोळंबावें लागतें, तसें त्याला लागत नाहीं. उद्यां पाऊस पडेल कीं नाहीं, हें तो जाणतो. कोणत्या दिवसीं कोणत्या घटकेंत कोणत्या पळांत, तूं मरण पावसील, हेंहि त्याला ठाऊक आहे. जीं माणसें पृथ्वींत शंभर वर्षांपुढें व हजार वर्षांनंतर होतील, तीं व त्यांचीं नावें, आणि त्यांचीं सर्व कर्में आणि त्यांस जें सर्व घडेल तें संपूर्ण त्याला ठाऊक आहे.

**गोविं.**— अगे बये, माझें ज्ञान किती थोडें!

**गंगा.**— होय, माझ्या मुला. ईश्वर केवढा मोठा आहे, त्याचें ज्ञान किती प्रचंड असा विचार जेव्हां आपण करितों, तेव्हां आपण तान्ह्या लेंकरांसारिखीं, किंवा ज्या किडी भूमीवर वळवळतात, त्यांसारिखींच आहों असें वाटतें. जें पुस्तक त्यानें दिल्हें त्याकडून तो आह्मास बोध करितो, यावरून आह्मास फार मोठा हर्ष व्हावा, आणि तो बोध ऐकावयास फार सादर व्हावें. त्या पुस्तकांत ज्या गोष्टी लिहिलेल्या आहेत त्यांतलें कांहीं आह्माला समजेल, यास्तव आपण त्याचा उपकार मानावा. परंतु तुझी निजण्याची वेळ झाली. चंद्राचा प्रकाश फारच पडत आहे ह्मणून तुला दिव्याची गरज लागणार नाहीं. सलाम.

**गोविं.**—सलाम, बये.

---

## तिसऱ्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. ईश्वर कशाचें रक्षण करितो ?

२. लोक व पदार्थ यांचें रक्षण करण्याकरितां ईश्वर जागोजागीं जातो कीं काय ?

३. ईश्वर कोठें आहे ?

४. तुझा आत्मा कोठें आहे ?

५. तुझा आत्मा किती जागा आटोपितो ?

६. जर तो कांहीं जागा आटोपितो तर तो कशासारिखा आहे ?

७. तुझा आत्मा मस्तकांत आहे कसा हें तुला सांगतां येतें वरें ?

८. तुला आपल्या आत्म्याविषयींच्या सर्व गोष्टी समजावयास सोपें आहे कीं काय ?

९. ईश्वर जो परमात्मा त्याविषयीं आह्मास पुष्कळ समजतां येईल कीं काय ? कां नाहीं ?

१०. देवाविषयीं ज्ञान आह्माला फारकरून कोठून प्राप्त होतें ?

११. ईश्वरानें आह्माला पुस्तक दिल्हें आहे त्यांतल्या कांहीं गोष्टी समजावयास जर कठीण पडतात तर आह्मास काय केलें पाहिजे ?

१२. लाहानपणीं तुझ्या आईबापानी कांहीं गोष्टी तुला सांगितल्या, यावरून तूं त्या सत्य मानिल्या, आणि पुढें त्या तुझ्या अनुभवास आल्या, तसल्या गोष्टी आहेत कीं नाहींत, त्यांतल्या कांहीं मला सांग.

१३. तुझ्या दृष्टीस पुष्कळ गोष्टी पडतात, त्या कशा आहेत हें तुला समजत नाहीं, आणि सांगतां येत नाहीं, तरी त्या खऱ्या आहेत असें तूं मानतोसना, त्यांतल्या कांहीं मला सांग.

१४. ईश्वर आह्मास जें कांहीं सांगतो तें आह्मी खरें मानावें कीं काय ? कां बरें ?

१५. जर ईश्वराला शरीर असलें तर तो सर्व ठिकाणीं आहे असें होईल कीं काय ?

१६. ईश्वर सर्व ठिकाणीं कसा आहे हें आह्माला सांगतां येईल कीं काय?

१७. आत्मा व अनात्मा यांचा अगदीं भेद आहे, तर तुझा आत्मा तुझ्यांत आहे कसा, हें तुला उकलून दाखवितां येतें कीं काय?

१८. तुजविषयीं ईश्वर काय जाणतो?

१९. सर्व मनुष्यांविषयीं ईश्वर काय जाणतो?

२०. सर्व गोष्टींविषयीं तो काय जाणतो?

२१. देवाला ज्ञान कशानें प्राप्त होतें? त्याला शिकावें लागतें काय?

२२. जें जें प्राप्त झालें आहे तें तें देवाला ठाऊक आहे कीं काय?

२३. जें प्राप्त होईल तें त्याला ठाऊक आहे कीं काय?

२४. तुझें ज्ञान किती आहे?

२५. देव आह्माला शिकवावयास सिद्ध आहे, तर आह्मी त्याला कसें मानावें?

---

## संभाषण ४.

दुसरी सकाळ रमणीय होती. पूर्वेकडील डोंगरांवरून सूर्याची प्रभा शोभायमान पडत होती, सुगंध वारा वाहत होता. झाडांच्या खांद्यांवर पक्ष्यांचे समुदाय आनंदानें मंजूळ शब्द करीत होते. तेव्हां गोविंदानें आईबरोबर फिरतांना देवाच्या चांगलेपणाविषयीं विचार केला, आणि देवानें जे पदार्थ उत्पन्न केले होते ते पाहून आश्चर्य केलें.

**गोविं.**— बये, देव जसा थोर तसा चांगलाहि आहे, असें कालच्या संध्याकाळीं त्वां मला सांगितलें. आतां कृपा करून देवाच्या मोठेपणाविषयीं मला सांग, कारण मला देवाविषयीं अधिक अधिक ज्ञान प्राप्त व्हावें ह्मणून इच्छितों.

**गंगा.**— तें सांगावयास मला फार आनंद होईल, मुला. परंतु पुन्हा तुला फार लक्ष्य द्यावें लागेल; कां कीं देवाच्या सामर्थ्याविषयीं थोडें देखील समजावें ह्मणून बहुत गोष्टी पहिल्यानें तुला समजाविल्या पाहिजेत.

**गोविं.**— सामर्थ्य ह्मणजे काय?

गंगा.— हेंच मी तुला पहिल्याने सांगतें, तो मोटा दगड पाहा. तो भुईवरून उचलून कुपणाच्या पलिकडे टाकितां येईल, असें तुला वाटतें कीं काय ?

गोविं.— टाकितां येणार नाहीं असें वाटतें, पण मी प्रयत्न करीन. (गोविंदाने हातांत दगड घेऊन कुपणाजवळ जाऊन पलिकडे शेतांत टाकिला.)

गंगा.— तूं टाकिला खरें, परंतु तो जड होता ना ?

गोविं.— होय आई. परंतु म्या असा निश्चय केला कीं, जर मजकडून होईल, तर टाकीन, आणि म्या आपल्या दोन्ही हातानी तो बळकट धरून नेट लावून उचलून आपल्या सर्व शक्तीने टाकिला, तेव्हां तो पलिकडे गेला. तो फिरून टाकावा असें मला वाटत नाहीं, कारण कीं माझ्या हाताला सलक भरली.

गंगा.— तेथें लाहान खडा आहे तो घेऊन कुपणाच्या पलिकडे फेंक.

गोविं.— तिकडेच टाकिला, बये. मनास वाटलें असतें तर त्याची दाहापट लांब टाकिला असता.

गंगा.— जेव्हां तो खडा फेंकला तेव्हां तुझ्या हाताला लचक भरली कीं काय ?

गोविं.—नाहीं बये. म्या आपला हात उचलून झुगारतांना बोटें उघडिलीं तेव्हां तो खडा गेला.

गंगा.— तूं आपला हात डोक्याला लाव.

गोविं.— लाविला.

गंगा.— तुझ्या हाताला कांहीं लचक भरली काय ?

गोविं.— नाहीं बये, किमपि नाहीं. माझा हात डोक्याला लागावा असें मनांत आणितांच माझी सगळी भुज हालून माझा हात नीट जाऊन डोक्याला लागला.

गंगा.— जेव्हां त्वां मोठा दगड घेऊन कुपणाच्या पलिकडे उडविला, तेव्हां

मी बळकट आहें पुन्हा यत्न करून माझ्यानें असें करवतें असें तुला वाटलें कीं नाहीं?

**गोविं.**—होय, बये.

**गंगा.**—पुन्हा तुला तसें करितां येईल असें आतां वाटतें कीं नाहीं?

**गोविं.**—होय असें वाटतें.

**गंगा.**—बरें तर तूं त्या दगडाच्या एवढा जड दुसरा एक दगड घेऊन कुपणाच्या पलिकडे टाकावयास शक्तिमान आहेस असी तुझी खातरी आहे कीं नाहीं?

**गोविं.**—होय बये, आणि मला वाटतें कीं जर मोठा नेट लाविला तर त्यापेक्षांहि जड दगड मला कुपणापलिकडे टाकितां येईल.

**गंगा.**—असें करण्याच्या शक्तीला सामर्थ्य ह्मणतात. त्वां जो दगड टाकिला होता, त्याच्या एवढा जड दगड कुपणापलिकडे उडवायास मला सामर्थ्य आहे कीं काय?

**गोविं.**—होय होय, बये. त्या दगडाच्या पांचपटीनें जड दगड उडवायास तुला सामर्थ्य आहे.

**गंगा.**—तर जड धोंडे कुपणाच्या पलिकडे उडवायास मला तुजपेक्षां पांचपट सामर्थ्य आहे.

**गोविं.**—खरें बये, आणि मला वाटतें कीं तुजपेक्षां जानोजी मामा फार बळकट आहे; त्याला धोंडे उचलावयास, व नेऊन कुपणाच्या पलिकडे उडवावयास तुझ्यापेक्षां वीसपट सामर्थ्य असेल. ती मोठी धोंड भूमीपासून उचलावयास तो शक्तिमान असेल, परंतु ती कुपणाच्या पलिकडे उडवावयास शक्तिमान नसेल असें मला वाटतें.

**गंगा.**—गोविंदा, जेव्हां त्वां लाहान दगड कुपणावरून उडविला तेव्हां अधिक बळ लागलें किंवा मोठा दगड उडविला तेव्हां अधिक लागलें?

**गोविं.**—जेव्हां मी मोठा दगड उडविला तेव्हां अधिक बळ लागलें. जे-

व्हां म्या लाहान खडा उडविला तेव्हां तितकें बळ लाविलें असतें तर तो दिसेना इतका लांब गेला असता.

**गंगा.**— इतका नाहीं गोविंदा. परंतु तो जेथें पडला त्याहून फारच लांब जाऊन पडला असता. जेव्हां त्वां आपला हात डोक्याला लाविला त्या वेळेस कांहीं बळ लागलें कीं काय?

**गोविं.**— थोडें लागलें असें वाटतें, दगड टाकिला आणि खडा झुगारिला त्यासारिखें नाहीं पण किंचित लागलें.

**गंगा.**— मुला, अनेक कामें करण्याचें सामर्थ्य तुला आहे, तीं कांहीं कांहीं मला सांग.

**गोविं.**— चालणें, धांवणें, उड्या मारणें, व आपले डोळे उघडणें व मिटणें बोलणें, पदार्थ पाहणें, आपल्या हातीं पुष्कळ वस्तू धरून कांहीं करणें यांची शक्ति मला आहे.

**गंगा.**— म्या दोरीनें तुझे पाय बांधिले तर तुला धांवण्याचें सामर्थ्य होईल कीं काय?

**गोविं.**— नाहीं बये. परंतु आपल्या खिशांतून चाकू घेऊन दोरी कापून मला पळतां येईल.

**गंगा.**— तूं दोरी कापूं नको, असें जर तुला सांगितलें, आणि मग मी खोलींतून बाहेर जाऊन तुला एकट्याला ठेविलें, तर ती कापून तुला पळतां येईल बरें?

**गोविं.**— होय बये, तसें करितां येईल. परंतु असें करण्याची इच्छा होणार नाहीं, कारण तुझें बोलणें जर ऐकत नाहीं तर मी दांडगा आहें.

**गंगा.**— गोविंदा, जर तुला दोरी कापण्याचें व माझी आज्ञा मोडण्याचें सामर्थ्य आहे तर दांडगा होण्याचेंहि सामर्थ्य आहे कीं नाहीं?

**गोविं.**— होय बये. कधींकधीं जें तूं मला करावयास सांगतीस तें आवडत नाहीं, आणि त्वां ज्याचा निषेध केला तें आवडतें, तेव्हां तुझ्या आज्ञा मोडण्याचें सामर्थ्य आहे असें माझ्या लक्षांत येतें.

**गंगा.**— तर वाईट करण्याची शक्ति आणि चांगलें करण्याची शक्ति तुला आहे.

**गोविं.**— होय बये. त्याविषयीं माझी खातरी आहे. नाहीं तर म्या वाईट केलें असतां त्वां माझें शासन करूं नये, आणि चांगलें केलें असतां शाबासकी देऊं नये.

**गंगा.**— टिपू कुत्र्याला दगड नेण्याचें कांहीं सामर्थ्य आहे कीं काय?

**गोविं.**— होय बये, तोंडानें दगड उचलून तो नेईल.

**गंगा.**—त्याला दुसरीं कोणतीं कामें करण्याची शक्ति आहे?

**गोविं.**—त्याला चालवतां येतें, धांवतां येतें, उडी मारितां येती आणि मजसारिखीं दुसरीं बहुत कामें करितां येतात.

**गंगा.**— बरें, तर तुझ्यासारिखें एका प्रकारचें सामर्थ्य त्याला आहे. परंतु टिपूला तुझ्यासारिखें वाईट आणि चांगलें करण्याचें कांहीं सामर्थ्य आहे काय?

**गोविं.**— नाहीं, असें होणार नाहीं, कारण कीं चांगलें आणि वाईट यांचें ज्ञान त्याला नाहीं.

**गंगा.**— तर मुला, पशु, पक्षी इत्यादिकांस नाहीं, असें तुला एक प्रकारचें सामर्थ्य आहे. परंतु चांगलें आणि वाईट करण्याचें सामर्थ्य तुला आहे तर तें कसें लावावें याविषयीं सावध ऐस. परमेश्वर तुला सर्वकाळ पाहतो, आणि जेव्हां तूं वाईट काम करण्याकरितां हें सामर्थ्य लावितोस तेव्हां तो तें जाणतो, आणि सर्व वाईट करणाऱ्यांवर त्याचा राग आहे.

**गोविं.**— बये, मी सर्वकाळ चांगलें करावयाला झटेन तर देव मजवर प्रीति करील कीं नाहीं?

**गंगा.**— होय, मुला. देव अवघ्या चांगल्या माणसांवर प्रीति करितो म्हणून जर तूं देवावर प्रीति करून त्याच्या आज्ञा मानसील तर तो तुजवर मरणापर्यंत व आकाशलोकांत निरंतर प्रीति करील.

**गोविं.**— पण बये, अझून देवाच्या सामर्थ्याविषयीं त्वां मला कांहीं सांगितलें नाहीं.

**गंगा.**— पहिल्याने तूं आपल्या सामर्थ्याविषयीं समजावें, नाहीं तर देवाच्या सामर्थ्याविषयीं तुला कांहीं समजणार नाहीं. यासाठीं म्या तुझ्या सामर्थ्याविषयीं तुला सांगितलें आहे. पण आपण घराजवळ आलों. आज मला अवकाश सांपडेल तेव्हां देवाच्या सामर्थ्याविषयीं पुन्हा संभाषण करूं.

---

## चवथ्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तुला काय जड पदार्थ उचलून टाकितां येतो ?

२. तुला काय हलका पदार्थ उडवितां येतो ?

३. तूं आपला हात डोक्याला लाव.

४. तूं कांहीं जड पदार्थ उचलून नेऊन फेंकावयास शक्तिमान आहेस असें तुला वाटतें कीं काय ?

५. ज्या शक्तीने तुला असें करितां येतें तिला काय ह्मणतात ?

६. तुजपेक्षां मला अधिक सामर्थ्य आहे कीं काय ? कशावरून आहे ?

७. मजपेक्षां कोणीएकाला अधिक सामर्थ्य आहे काय ?

८. तूं एक वेळ बळ लावितोस त्यापेक्षां दुसऱ्या वेळीं अधिक लावितोस कीं काय ?

९. जेव्हां त्वां आपला हात डोक्याला लाविला तेव्हां कांहीं बळ लागलें कीं काय ?

१०. तुला काय करण्याचें सामर्थ्य आहे ?

११. तुझे डोळे झांकले तर तुला पाहण्याचें सामर्थ्य होईल काय ?

१२. तुझ्या डोळ्यांवर रूमाल बांधून जर म्या तुला सांगितलें कीं, तू रूमाल सोडूं नको, तर तुला तो सोडण्याचें सामर्थ्य होईल कीं काय ?

१३. तुला आपल्या आईबापांच्या आज्ञा मोडण्याचें सामर्थ्य आहे कीं काय?

१४. जसें तुझ्या मनास वाटेल तसें करावयास तुला सामर्थ्य आहे कीं काय ?

१५. तुला पांखरासारिखें उडतां येत नाहीं ह्मणून तुझ्या आईबापानी तुला शिक्षा द्यावी हें योग्य आहे कीं काय ? कां नाहीं ?

१६. जर तुझ्या आईबापानी तुला अमुक काम सांगितलें, परंतु त्वां त्यांचें बोलणें ऐकिलें नाहीं, तर तुला शिक्षा द्यावी हें त्यांला योग्य आहे कीं काय ? कां योग्य आहे ?

१७. घड्याळ कसें करावें हें आपल्या लाहान बहिणीला व भावाला न सांगण्याकरितां तुझ्या आईबापानी तुला शिक्षा द्यावी हें योग्य आहे कीं काय? कां नाहीं ?

१८. तूं आपल्या लाहान बहिणीसीं व भावासीं प्रीतीनें चालला नाहींस तर तुझ्या आईबापानी तुला शिक्षा द्यावी हें योग्य आहे कीं काय ? तें कां योग्य ?

१९. तुला चांगलें स्वप्न पडलें तर तुला बक्षीस देणें हें आईबापांस योग्य आहे कीं काय? कां नाहीं ?

२०. त्वां धडा चांगला पाठ केला तर तुझ्या आईबापानी तुला बक्षीस द्यावी हें योग्य आहे काय ? कां बरें ?

२१. जसा मासा पाण्यांत फिरतो तसा तुझ्यानें पाण्यांत फिरवत नाहीं, ह्मणून मी वाईट आहें असें तुला वाटतें काय ?

२२. तुला अक्षरें आलीं नाहींत तर मी वाईट आहें असें तुला वाटलें असतें कीं काय ?

२३. जेव्हां तूं वाईट करितोस तेव्हां तुला दुःख कां वाटतें ?

२४. तुझ्यासारिखें पशूंला कांहीं सामर्थ्य आहे कीं काय ?

२५. पशूंला चांगलें व वाईट करण्याचें सामर्थ्य आहे कीं काय? कां नाहीं ?

२६. चांगलें व वाईट करण्याचें जें सामर्थ्य तुला आहे तें कसें लावावें ?

२७. ईश्वर कोणावर प्रीति करितो ?

---

## संभाषण ५.

बागांत मंडप होता त्यांत तिसऱ्या प्रहरीं गंगाबाईने गोविंदाचें वाचणें व धडे घेतले. ते झाल्यावर त्याने असें ह्मटलें कीं, "बये, खेळण्याकरितां बाहेर जाण्याची इच्छा नाहीं; कारण त्यापेक्षां तुजसीं देवाच्या सामर्थ्याविषयीं संभाषण करणें हें मला चांगलें वाटतें." गंगाबाई ह्मणाली कीं, "मी थोडी वेळ संभाषण करीन." मग गोविंदा आईजवळ बसून तिजकडे एकाग्रतेने पाहून, देव जो थोर आणि चांगला, जो आमचा आकाशांतील बाप, त्याविषयीं अणखी ऐकावयाला फार संतुष्ट होता.

**गंगा.**— गोविंदा, सामर्थ्य ह्मणजे काय, हें मला सांग.

**गोविं.**— मजपेक्षां जानोजी मामाला फार सामर्थ्य आहे.

**गंगा.**— तुझ्या बोलण्याचा अर्थ काय आहे?

**गोविं.**— जें मी करावयास शक्तिमान नाहीं तसीं बहुत कामें तो करावयास शक्तिमान आहे, असा अर्थ आहे. त्याला मोठें लांकूड कुऱ्हाडीनें फोडण्याची शक्ति आहे, परंतु मला असी शक्ति नाहीं. तथापि मला पुष्कळ कामें करण्याची शक्ति आहे. बये, मी आज सकाळीं त्यांविषयीं तुला बोललों कीं नाहीं?

**गंगा.**— होय मुला, तूं उत्तरोत्तर प्रौढ होसील तसतसें तुझें सामर्थ्य वाढेल. जें आतां तुला करवत नाहीं तें त्या वेळेस करवेल.

**गोविं.**— बये, एका दिवसीं त्वां मला सांगितलें कीं शिमशोन या नावाचा एक पुरुष फार बळकट होता. त्याने मोठें घर ढकलून खालीं पाडिलें, त्यांत पुष्कळ माणसें होतीं तीं चेंगरून मेलीं, याची तुला आठवण आहे ना?

**गंगा.**— होय मुला, त्यासारिखा कोणी बलवान माणूस कधीं झाला नाहीं.

**गोविं.**— तर त्याला फार सामर्थ्य होतें.

गंगा.— मुला, देवाला एवढें सामर्थ्य आहे कीं त्याला कोणतेंहि काम करितां येतें.

गोविं.— बये, देवाला सूर्य खालीं पाडितां येईल कीं काय?

गंगा.— सूर्य खालीं पाडावा असी जर देवानें इच्छा केली, तर तूं हात डोक्याला लावावा, असें मनांत आणितांच तो लवकर डोक्याला लागला तेवढा लवकर सूर्य खालीं पडेल.

गोविं.— आई, जसें सहज माझ्या मनांत आणितां येतें कीं आपला हात डोक्याला लावावा, तसें सूर्य पाडावयास ईश्वराला सहज मनांत आणितां येईल कीं काय?

गंगा.— होय; सूर्य, चंद्र, नक्षत्रें, पृथ्वी, आणि सर्व माणसें, व जनावरें, आणि सर्व वस्तू, यांचा नाश करावा असें जर देवानें योजिलें तर सर्वांचा नाश होईल. जसा तुझ्यानें कागदाचा तुकडा अग्नींत घालून त्याचा लवकर नाश करवेल इतका लवकर देवाच्यानें सर्व पदार्थमात्रांचा नाश करवेल.

गोविं.— अहाहा! बये, देव तसें करणार नाहीं, असी माझी आशा आहे.

गंगा.— गोविंदा, जसा देव सामर्थ्यवान् आहे तसा तो चांगला आहे. जें तो करितो तें तो सर्वदा नीट करितो, आणि जीं माणसें त्यावर प्रीति करून त्याच्या आज्ञा पाळितात, त्या सर्वांचें कल्याणच पाहतो.

गोविं.— बये, त्वां सांगितलें होतें कीं देवाला कोणतेंहि काम करितां येतें तर जें कांहीं त्याला वाटतें तें करितां येतें कीं काय? त्याला नवा सूर्य उत्पन्न करितां येतो कीं काय?

गंगा.— होय, त्याच्या मनास वाटलें तर तो लाखों नवे सूर्य, चंद्र, नक्षत्रें व पृथ्वी उत्पन्न करील.

गोविं.— बये, देवानें सूर्य कसा केला?

गंगा.— परवां तूं आपली लाहान पेटी कसी केली?

गोविं.— ती कागदाची केली.

गंगा.— ती कशानें केली?

गोविं.— तुझ्या कातरीनें, बये.

गंगा.— दुसरें कांहीं लागलें नाहीं कीं काय?

गोविं.— हातांचीं बोटें लागलीं यांत संशय काय; कां कीं हात लावि-ल्यावांचून माझ्यानें कांहीं वस्तू करवत नाहीं.

गंगा.— ईश्वरानें सूर्य कशापासूनहि केला नाहीं, आणि कांहीं हातेर किंवा सामग्री घेऊन केला असें नाहीं.

गोविं.— देवाला शरीर नाहीं, असें त्वां सांगितलें होतें, याची मला आ-ठवण आहे. तर त्याला हात नाहींत; परंतु हात नसतां त्याला कां-हीं कसें करितां येईल, हें मला समजत नाहीं.

गंगा.— तूं आपल्या डोक्याला हात लावावा असें मनांत आणितोस तेव्हां तो त्याला लागतो. कांहीं पदार्थ करावा, असें देवाच्या मनांत आलें तर लागलाच उत्पन्न होतो. जेव्हां सूर्य, चंद्र, तारे, हे नव्हते तेव्हां उजेड होवो, असें ईश्वर बोलला, आणि उजेड झाला.

गोविं.— जर त्याला मुख नाहीं तर तो कशानें बोलला, बये?

गंगा.— जर तुला एक शब्द बोलल्यानें भूमीपासून उगवून मोठें झाड लागलेंच करितां येईल, तर मला फार सामर्थ्य आहे असें तुला वा-टेल कीं नाहीं?

गोविं.— होय बये, तर मला आपल्या सर्व ओळखीच्या माणसांपेक्षां अधिक सामर्थ्य होईल. तर कांहीं प्रकारें देवाच्यासारिखें मला सामर्थ्य होईल.

गंगा.— खरें, गोविंदा. आणि देवाच्या सामर्थ्याविषयीं बोलावयाचें अ-सेल तेव्हां लोक ह्मणतात कीं, देव बोलला आणि असें झालें. याचा अर्थ असा आहे कीं जसें तुला आणि मला सहजाखालीं बोलतां येतें तसें देवाला सहज मनांत आणून कांहीं वस्तू उत्पन्न करितां येती. लोहचुंबकाला सुई ओढण्याचें सामर्थ्य आहे. पण तें सामर्थ्य कसें

आहे हें सांगतां येत नाहीं. लोहचुंबक सुई ओढितो, असें ह्मणतात. तूं जसी कांहीं वस्तू धरून आपल्याकडे ओढितोस तसी तो सुईला धरून ओढितो असा अर्थ नाहीं, परंतु कांहीं प्रकारें यासारिखें त्याला सामर्थ्य आहे.

याप्रमाणें जेव्हां आह्मी ह्मणतों कीं, ईश्वर बोलला आणि तसें झालें, तेव्हां त्या बोलण्याचा अर्थ असा आहे कीं तुला एका शब्दानें भूमीपासून नवा पूर्ण वाढलेला वृक्ष करितां येत असला तर तुला जी शक्ति असती तिच्यासारिखी कांहीं प्रकारें देवाची शक्ति आहे.

**गोविं.**— अगे बये, देवाविषयीं थोडें देखील समजावें ह्मणून मला पहिल्यानें किती गोष्टी शिकल्या पाहिजेत.

**गंगा.**—खरें मुला, देवाचें सामर्थ्य किती आहे याविषयीं आपण किंचितमात्र समजतों. देवानें सर्व प्राणी व पदार्थ उत्पन्न केले. त्या सर्व प्राण्यांचें व पदार्थांचें संरक्षण तो करितो. सर्व प्राण्यांचा व पदार्थांचा नाश करावा असें त्याच्या मनांत आलें, ह्मणजे तत्क्षणीं त्यांचा नाश होईल. जें कांहीं त्याला वाटतें तें त्याला करितां येईल. जर पृथ्वींतील सर्व माणसें एका ठिकाणीं जमून एक मत होऊन ह्मणालीं कीं, देवानें असुक करूं नये ह्मणून आपण त्याला प्रतिबंध करूं, तरी त्यांचें कांहीं चालणार नाहीं. देवाच्या सामर्थ्याविषयीं जेव्हां आह्मी विचार करितों तेव्हां पृथ्वींतील सर्व माणसांचें सामर्थ्य धुळीसारिखें दिसतें. जसें तुला थोडी धूळ फुंकितां येती तसें देवाला अवघ्या माणसांच्या शक्तीचा नाश करावयास सोपें पडेल. देवाचें सामर्थ्य केवढें आहे हें कोणीएकाच्या ध्यानांत येणार नाहीं. असी देवाला अत्यंत शक्ति आहे. तो सर्वसमर्थ आहे. देवानें सर्व प्राणी आणि पदार्थ उत्पन्न केले आणि तो त्यांचें रक्षण आणि कल्याण करितो, यास्तव त्यानें त्यांचा अधिकार करावा हें योग्य आहे. तुजवर व रमीवर अधिकार करावा हें मला योग्य आहे कीं नाहीं ?

**गोविं.**— होय, बये. तूं आह्मावर फार उपकार करीत असतीस,

ह्मणून जें तूं आह्माला करावयास सांगतीस तें केलें पाहिजे, असें मला ठाऊक आहे.

**गंगा.**— बरें, मुला, ईश्वर सर्व गोष्टी जाणतो. जें तुला करावयास योग्य आणि हितकारक तें, आणि जें सर्व माणसांला करावयास योग्य आणि हितकारक तें तो जाणतो. जर मी तुला आणि रमीला आज्ञेंत ठेवीत नाहीं. आणि काय करावें व काय न करावें, असें सांगत नाहीं, तर आमच्या घरांत मोठा अनर्थ होईल. तसें देवानें पृथ्वींतील जीं सर्व माणसें व पदार्थ आणि समस्त प्राणी उत्पन्न केले आहेत, त्या सर्वांवर जर देव अधिकार करीत नसता तर सर्व ठिकाणीं अडचण होती, आणि हाल, गडबड, दुःख यांशिवाय कांहीं होतेंना. देव चांगला आहे, यास्तव त्यानें सर्व प्राणी आणि वस्तू यांवर अधिकार करावा हें योग्य, असें त्याला ठाऊक आहे. तो सर्वसमर्थ आहे, ह्मणून प्राणीमात्रांवर आणि वस्तूमात्रांवर अधिकार करीलच करील. देवानें आह्मावर अधिकार करावा असें ज्यांच्या मनांत आहे, आणि जे प्रीति करून त्याच्या आज्ञांप्रमाणें वागतात, त्यांवर तो प्रीति करून त्यांस निरंतर सुखी करील. परंतु देवानें आपणांवर अधिकार करावा असें ज्यांस आवडत नाहीं, आणि जे त्याजवर प्रीति करून त्याच्या आज्ञा पाळीत नाहींत, त्यांवर तो प्रीति करून त्यांचें कल्याण करील असें होणार नाहीं.

**गोविं.**— बये, मला देवाचें भय वाटूं लागलें.

**गंगा.**— मुला, जें जें त्यानें मना केलें तें करण्यानें, किंवा जें त्यानें तुला करावयाला सांगितलें तें न करण्यानें त्याचा राग उठवावा याविषयीं भय धरावें. परंतु तूं जर त्याजवर प्रीति करून त्याला मानितोस, तर तुला त्याच्या सामर्थ्याचें भय धरण्याचें कारण नाहीं. कां कीं तुझें केवळ संरक्षण व कल्याण करण्याकरितां तो आपलें मोठें सामर्थ्य लावील.

**गोविं.**— जीं माणसें देवावर प्रीति करीत नाहींत आणि त्याच्या आज्ञा

मानीत नाहींत, त्यांचें काय करण्याकरितां तो आपलें सामर्थ्य लावील?

**गंगा.**— जेव्हां तूं आणि रमी दांडगेपणीं माझें ऐकत नाहीं, तेव्हां मला तुह्मास शिक्षा द्यावी लागती. तसें देवानें त्यांस शिक्षा द्यावी असें तुला वाटतें कीं नाहीं, मुला?

**गोविं.**— होय, बये; पण देव त्यांची शिक्षा कसी करील?

**गंगा.**— त्यानें जें पुस्तक आह्मांला दिल्हें त्यांत लिहिलें आहे कीं जे लोक देवावर प्रीति करीत नाहींत, आणि त्याच्या आज्ञा पाळीत नाहींत, ते आकाशलोकांत जाऊन त्याजवळ सुख पावणार नाहींत. आकाशलोक असी चांगली जागा आहे, आणि तेथील सर्व माणसें एकमेकांची आणि देवाची प्रीति असी करितात कीं तेथें पापी लोकांचें जाणें होणार नाहीं. ते गेले तरी त्यांला तेथें सुख होणार नाहीं आणि त्यांजकडून आकाशलोकांतील सर्व माणसांला दुःख होईल.

**गोविं.**— पापी माणसें कोठें जातील, बये?

**गंगा.**— जर ते पाप करीत जातात आणि पापाचें दुःख मानीत नाहींत आणि हे देवा, आह्मी पाप केलें आहे, यामुळें आह्मांला फार खेद झाला, ह्मणून तूं आमची क्षमा कर आणि आह्मी चांगलें व्हावें यासाठीं आह्मांला साहाय्य हो, असी प्रार्थना जर देवाजवळ करीत नाहींत, आणि चांगलें होण्यास, आणि चांगलें काम करण्यास जर ते प्रयत्न करीत नाहींत, तर मरण झाल्यावर त्यांचे आत्मे नरक ह्मणून एक अत्यंत दुःखाची जागा आहे त्यांत जातील. तेथलीं सर्व माणसें अगदीं पापिष्ट आहेत. ते एकमेकांवर आणि देवावर प्रीति करीत नाहींत. जें देवानें आह्मांला पुस्तक दिल्हें आहे त्यांत असें लिहिलें आहे कीं, जीं माणसें देवावर प्रीति करीत नाहींत व त्याचें ऐकत नाहींत, तीं तेथें जाऊन सर्वकाळचा दंड पावतील.

**गोविं.**— अहाहा! तेथें जाणें मला नको, बये. मी मेल्यावर आकाशलोकांत जाऊन निरंतर सुखी व्हावें, ह्मणून मी देवावर प्रीति करावयास, आणि त्याच्या आज्ञा पाळावयास यत्न करीन.

गंगा.— तेथें देव तुला नेवो, माझ्या प्रिय मुला. पण देवाची कृपा पावण्याकरितां जें तुला करावें लागतें त्याविषयीं मला तुजपासीं अणखी बहुत सांगावयाचें आहे. आतां आपण घरांत जाऊं.

---

## पांचव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. सामर्थ्य काय आहे?
२. देवाचें सामर्थ्य केवढें आहे?
३. सर्व वस्तूंचा नाश करावयास देवाला अवघड पडेल काय?
४. जें देवाच्या मनास वाटतें तें त्याच्याने उत्पन्न करवतें काय?
५. देवाने सूर्य कशापासून उत्पन्न केला?
६. देवाने सूर्य कशाने केला?
७. देवाला हात नाहींत, तर त्याला वस्तू कसी करितां येती?
८. कांहींएक वस्तू उत्पन्न करण्यापूर्वीं देव काय करितो?
९. देव बोलला आणि तसें झालें, असें ह्मणतात, याचा अर्थ काय आहे?
१०. सुई आढावयास लोहचुंबकाला सामर्थ्य आहे असें ह्मणतात, याचा अर्थ काय आहे?
११. जसा तूं आपल्या हातानी कांहीं वस्तू ओढितोस तसा तो सुईला ओढितो कीं काय?
१२. देवाच्या सामर्थ्याविषयीं आह्माला पुष्कळ समजतां येतें काय?
१३. देव सर्व समर्थ आहे, असें बोलण्याचा अर्थ काय?
१४. तुझ्या आईबापानी तुला आज्ञेंत ठेवावें हें योग्य आहे काय?
१५. सर्व प्राण्यांवर आणि वस्तूंवर अधिकार करावा हें देवाला कशावरून योग्य आहे?
१६. जर तुझ्या आईबापानी तुला आणि घरांतील सर्व लेंकरांस आणि दुसऱ्या मनुष्यांस आज्ञेंत न ठेविलें, तर काय होईल?

१७. पंतोजीने आपल्या मुलांस आज्ञेंत न ठेविलें तर काय होईल?
१८. गांवांत राहणाऱ्या माणसांवर अधिकारी नसला तर काय होईल?
१९. देवाने जे प्राणी व पदार्थ उत्पन्न केले त्यांवर जर अधिकार केला नसता तर काय होईल?
२०. देव कोणास सुखी करील? आणि कोणास सुखी करणार नाहीं?
२१. त्वां देवाचें भय कसें धरावें?
२२. जर तूं देवावर प्रीति करून त्याच्या आज्ञा मानसील तर तो तुझें काय करण्याकरितां आपलें मोठें सामर्थ्य लावील?
२३. जे देवावर प्रीति करीत नाहींत आणि त्याच्या आज्ञा मानीत नाहींत त्यांचें काय करण्याकरितां देव आपलें मोठें सामर्थ्य लावील?
२४. ते मेल्यावर त्यांचे आत्मे कोठें जातील?

---

## संभाषण ६.

संध्याकाळीं गोविंदासीं देवाविषयीं भाषण करावें असें गंगाबाईच्या मनांत नव्हतें. परतु निजावयाला जाण्याच्या अगोदर अणखी थोडें ऐकावें असी गोविंदाची फार इच्छा होती, ह्मणून त्याच्या आईने मान्य केलें, आणि त्यांचा पुढील संवाद झाला.

**गोविं.**—जेवण झाल्यावर मी एकटा बसलों होतों तेव्हां माझ्या मनांत आलें कीं, देव किती काळापासून आहे, असें तुला विचारावें.

**गंगा.**—मुला, तुझी एक लाहान चुलत बहीण मनो इची आठवण तुला आहे कीं काय?

**गोविं.**— होय, होय, बये; म्या दोनदां तिला पाहिलें, एकदां फार लाहान होती तेव्हां, आणि एकदां ती सुमारें एका वर्षाची होती तेव्हां पाहिलें.

**गंगा.**— जेव्हां दुसऱ्याने तिला पाहिलेंस, तेव्हां ती फार वाढली होती कीं काय?

**गोविं.**—होय, बये, पहिल्यापेक्षां फार मोठी व जड होती.

**गंगा.**—ती वाढत वाढत जाईल, असें तुला वाटतें कीं काय?

**गोविं.**—होय, ती वांचेल तर मोठी बायको होईपर्यंत वाढेल.

**गंगा.**—गोविंदा, पृथ्वींतील सर्व पुरुष आणि बायका हीं पहिलीं तान्हीं होतीं. तीं वाढत वाढत प्रौढ झालीं.

**गोविं.**—बये, माझी इच्छा आहे कीं मी जानोजी मामा एवढा उंच होईपर्यंत वाढावें.

**गंगा.**—कोण जाणे, गोविंदा. तूं पोक्त होण्यापूर्वीं कदाचित् मरसील. परंतु देव किती काळापासून आहे असें त्वां मला विचारिलें, हें मी तुला सांगतें. देव कधीं लाहान नव्हता. तो कधीं वाढला नाहीं. जसा तो आतां चांगला आणि मोठा आहे, तसाच तो पहिल्यापासून आहे.

**गोविं.**—जेवढें तो आतां जाणतो, तेवढें पहिल्यापासून त्याला ठाऊक आहे कीं काय?

**गंगा.**—होय, मुला. त्याचा आणि आमचा फार भेद आहे. तुला बाळपणीं केवळ थोडें समजलें. मग तूं अणखी थोडें समजूं लागलास, आणि पुढें अधिक अधिक समजत आलास. आणि जरी तूं अझून केवळ लाहान आहेस, तरी तुला पुष्कळ गोष्टी ठाऊक आहेत. पण देवाला तसें कधींहि झालें नाहीं, लाहान लेंकराच्यासारिखें त्याचें मन कधीं नव्हतें. त्याला कांहीं समजण्याकरितां कधीं शिकावें लागलें असें नाहीं, तो सर्व गोष्टी जाणतो, आणि सर्वकाळापासून त्यानें जाणिल्या आहेत.

**गोविं.**—पण, बये, जेव्हां देव नव्हता तेव्हां काय घडलें, हें त्याला ठाऊक आहे कीं काय?

**गंगा.**—मुला, देवाच्या अगोदर कांहीं घडलें नाहीं, कारण कीं त्याच्या अगोदर कोणीच नव्हता, देवानें सर्व प्राणी आणि वस्तू हीं उत्पन्न केलीं, हें तुला ठाऊक आहे.

**गोविं.**— पण, देवाच्या पूर्वीं काय होतें? कांहीं वस्तू नव्हतीं कीं काय? कोणीच नव्हता कीं काय? सर्व रिकामें आणि केवळ अंधार होता कीं काय?

**गंगा.**— मुला, देव सर्वकाळापासून आहे. तर त्याच्या पूर्वीं प्राणी किंवा वस्तू होत्या कशा?

**गोविं.**— जितक्या काळापासून देव आहे तितक्या काळापासून कोणीच नाहीं कीं काय?

**गंगा.**— जे सर्व पुरूष आणि बायका कधीं झालीं त्यांतील कोणीच झाला नव्हता, तेव्हां देव होता. पृथ्वी, सूर्य, चंद्र, आणि तारे उत्पन्न झाल्याच्या पूर्वीं तो होता.

**गोविं.**— बये, जितकीं वर्षें देवाला झालीं तितकीं वर्षें मोजावयास मला किती वेळ लागेल?

**गंगा.**— आतां आठ वाजले आहेत. तुला एक मिनिटांत किती मोजतां येतील, हें पाहूं.

(गंगाबाईने आपल्या घड्याळाकडे पाहिलें आणि थांब असें तिने गोविंदाला सांगितलें, तोंपर्यंत तो मोजीत गेला.)

**गोविं.**— बये, किती झाले? म्या लवकरच मोजिले.

**गंगा.**— त्वां बरोबर शंभर मोजिले. याप्रमाणें एक तासांत साहा हजार होतील. परंतु देवाला साहा हजार वर्षांहूनहि फार अधिक वर्षें झालीं आहेत. तूं दोन तासपर्यंत मोजीत गेलास, तर बारा हजार होतील. पण त्यांपेक्षां बहुत वर्षें देवाला झालीं आहेत.

**गोविं.**— मी सर्व दिवसभर आणि रात्रभर मोजीत गेलों, तर जितकीं वर्षें देवाला झालीं, तितकीं मोजितां येतील कीं काय?

**गंगा.**— तूं एवढा वेळ मोजीत गेलास, तर चोवीस तासांत एक लक्ष चव्वेताळीस हजार होतील. त्यांपेक्षांहि देवाला पुष्कळ वर्षें झालीं आहेत, अणखी जर तूं आपलें आयुष्यपर्यंत मोजीत गेलास आणि पृथ्वींतील सर्व माणसें आपलें आयुष्यपर्यंत मोजीत गेलीं, आणि ते सर्व

एकत्र केले, तरी देवाला किती वर्षें झालीं आहेत, हें समजणार नाहीं केवळ ध्यानांत किंचितमात्र येऊं लागेल. ह्या वर्षांच्या दुपटीची दुपट करून जर तूं नित्य मिळवणी करीत गेलास, आणि मिळवितां मिळवितां कधीं राहिला नाहींस, तरी देवाला किती वर्षें झालीं आहेत हें तुझ्या ध्यानांत येणार नाहीं, हें त्याविषयीं कल्पण्याकरितां साहाय मात्र होतें. देव उत्पन्न झालाच नाहीं. तो सर्वकाळापासून आहे. तो उत्पन्न व्हावा ह्मणून कोणीएकानें त्याला साहाय कधीं केलें नाहीं. आणि त्याचें संरक्षण कोणी करितो असें नाहीं. त्यानें सर्व प्राणी आणि वस्तू यांस उत्पन्न केलें आणि त्यांचें रक्षण तो नेहमी करितो. तो नसता तर तीं झालीं नसतीं, आणि जसें देवाला आदि नव्हता तसें त्याला अंतहि नाहीं. तो सर्वकाळ राहील. तो कधीं उत्पन्न झाला नाहीं आणि कधीं नाहींसा होणार नाहीं. देव किती काळाचा आहे असें तूं मला विचारितोस तेव्हां मी उत्तर देतें कीं, देव अनादि आणि अनंत आहे तो सनातन आहे.

**गोविं.**—हें किती चमत्कारिक आहे बये, मी देवाविषयीं पुष्कळ कधीं समजणार नाहीं असें मला भय वाटतें. त्याविषयीं मी जितका विचार करितों तितकें माझें ज्ञान कमीच वाटतें.

**गंगा.**—मुला, तुझा आत्मा कधीं मरणार नाहीं असें तुला समजतें. त्वां देवावर प्रीति करून त्याला मानिलें, तर तूं मेल्यावर आकाशलोकांत जाऊन त्याविषयीं अधिक अधिक ज्ञान निरंतर पावत जासील. आजपावेतों जें तूं देवाविषयीं शिकला आहेस, त्याचा आपण विचार करून मनांत ठेवूं.

देवाला शरीर नाहीं. "देव आत्मा आहे."

त्यानें सर्व प्राणी आणि पदार्थ उत्पन्न केले; ह्मणून आह्मी ह्मणतों कीं, "देव आमचा उत्पन्न करणारा आहे."

तो सर्व प्राण्यांचें आणि वस्तूंचें संरक्षण करितो; यासाठीं आह्मी ह्मणतों कीं, "देव आमचा पाळणारा आहे."

तो सर्व प्राण्यांवर आणि वस्तूंवर अधिकार करितो; यासाठीं आह्मी ह्मणतों कीं, "देव आमचा अधिकारी आहे."

जे सर्व प्राणी आणि पदार्थ कधीं झाले आहेत, आणि जे आतां आहेत, आणि जे होणार आहेत, ते सर्व तो जाणतो; यासाठीं आह्मी ह्मणतों कीं, "देव सर्वज्ञ आहे."

तो सर्वदां सर्व ठिकाणीं आहे; यासाठीं आह्मी ह्मणतों कीं, "देव सर्व व्यापक आहे."

त्याला जें मनास येईल तें करवतें, त्याला संपूर्ण शक्ति आहे; यासाठीं आह्मी ह्मणतों कीं, "देव सर्व समर्थ आहे."

तो सर्वकाळ होता, तो आतां आहे, आणि तो सर्वकाळ होईल; यासाठीं आह्मी ह्मणतों कीं, "देव सनातन आहे."

आतां मुला, निजावयाला जा. तुजसीं इतकें बोलवें असें माझ्या मनांत नव्हतें, सलाम.

**गोविं.**— सलाम, बये.

---

## साहाव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तूं आतां लाहान आहेस, यापेक्षां कधीं लाहान होतास कीं काय?
२. तूं फार वाढला आहेस कीं काय? आतां तूं वाढत आहेस काय?
३. देव कधीं लाहान होता कीं काय? तो कधीं कांहीं वाढला काय?
४. जसा देव आतां आहे याहून मागें निराळा होता काय?
५. देवाला कधीं कांहीं शिकावें लागलें काय?
६. देवाच्या अगोदर काय घडलें?
७. देव झाल्याच्या पूर्वीं काय होतें?
८. जितक्या काळापासून देव आहे तितक्या काळापासून कोणी प्राणी किंवा कांहीं वस्तू आहे कीं काय?
९. जर तूं आपलें आयुष्यपर्यंत मोजीत गेलास तर देवाला जितकीं वर्षें झालीं आहेत तितकीं तुझ्याने मोजवतील कीं काय?

१०. जर तुझ्याने पृथ्वींतील रेतीचे कण मोजवतील तर देवाच्या वर्षां-इतके होतील कीं काय?

११. देवाला प्रारंभ कधीं होता कीं काय?

१२. देवाला कोणी उत्पन्न केलें? त्याचें रक्षण कोण करितो?

१३. देव किती काळपर्यंत राहील?

१४. देव अनादि अनंत आहे याचा अर्थ काय आहे?

१५. देव आमचा उत्पन्न करणारा आहे याचा अर्थ काय?

१६. देव आमचा पाळणारा आहे याचा अर्थ काय?

१७. देव आमचा अधिकारी आहे याचा अर्थ काय?

१८. देव सर्वज्ञ आहे याचा अर्थ काय?

१९. देव सर्व व्यापक आहे याचा अर्थ काय?

२०. देव सर्वसमर्थ आहे याचा अर्श काय?

२१. देव सनातन आहे याचा अर्थ काय?

---

## संभाषण ७.

दुसऱ्या दिवसीं सकाळीं गंगाबाई आणि गोविंदा फिरत असतां त्यानें तिला ह्मटलें कीं, "बये, त्या उंच डोंगरावर चढून चहुंकडला सर्व देश पाहावा असी माझी फार इच्छा आहे. त्या डोंगरावरून मावशीचें घर दृष्टीस पडेल असें तुला वाटतें कीं काय?" "तें दृष्टीस पडेल असें मला वाटतें, मुला. जर तूं दमला नाहींस तर पुढें चालून डोंगरावर चढावें असी माझी खुशी आहे. त्याच्या माथ्यावर झाड आहे त्याखालीं ओटा आहे, त्यावर बसून आपण विसांवा घेऊं नंतर परत येऊं." "अगे मी कांहींच दमलों नाहीं;" असें बोलून गोविंदा पुढें धांवून जेथून जावयाचें होतें तेथें कवाडी होती ती त्यानें उघडली, आणि तिंतून गेल्यावर कवाडी जवून लावून गोविंदा आईबरोबर डोंगरावर चढला. नंतर तीं झाडा-खालीं ओट्यावर बसून, गोविंदा असें बोलूं लागला.

**गोविं.**—बये, मला देवाविषयीं कांहीं अणखी सांगण्याकरितां ही जागा चांगली आहे.

**गंगा.**— तुला असें कां वाटतें ?

**गोविं.**— ही एवढी शीतळ आणि रमणीय व निवांत जागा आहे, अणखी ज्या सुंदर वस्तू देवानें उत्पन्न केल्या त्या चहुंकडे दिसतात.

**गंगा.**— मुला, हें तुझें बोलणें ऐकून मला हर्ष झाला. जेथें जेथें आपण जातों तेथें तेथें देवानें उत्पन्न केलेले पदार्थ दिसतात, आणि तो त्यांचें संरक्षण कसें चांगलें करितो हें लक्षांत येतें. जें प्रत्येक सुंदर फूल होतें त्यांत आणि प्रत्येक लाहान कोंकरूं आपल्या आईजवळ संतोषानें खेळतें त्यांतहि देवाचें चांगलेपण दिसतें.

**गोविं.**—बये, मधमाशा फार सुखी आहेत असें तुला वाटत नाहीं कीं काय? त्वां मला एकदां मधीची पोळी पाहावयास नेलें होतें. माशा जिकडे तिकडे सुगंध पुष्पांवर सर्वदां उडत आहेत, आणि खायाला त्यांस पुष्कळ गोड मध आहे.

**गंगा.**— होय मुला, त्या फार सुखी आहेत, याचें एक कारण मला वाटतें असें आहे कीं, त्या फार कामसू आहेत. जर तुला सुखाची इच्छा आहे तर तुला नित्य काम केलें पाहिजे.

**गोविं.**— मधमाशा व मेंढरें आणि इतक्या प्रकारचीं जनावरें देवानें कशासाठीं उत्पन्न केलीं ?

**गंगा.**— त्यानें आपलें मोठें सामर्थ्य व चातुर्य आणि चांगलेपणा हीं दाखवावीं म्हणून त्यांस उत्पन्न केलें, अणखी देवानें आमच्या उपयोगासाठीं त्यांतील बहुत उत्पन्न केलीं. हिंवाळ्यांत जीं वस्त्रें तूं घालीत असतोस तीं मेंढरांच्या लोंकरीपासून उत्पन्न होतात, हें तुला ठाऊक आहे कीं नाहीं ?

**गोविं.**— होय बये, म्या तसीं वस्त्रें घातलीं नाहींत तर मला फार थंडी वाजती.

**गंगा.**— जर तुला चांगलीं लोंकरीचीं वस्त्रें नसतीं तर हिंवाळ्यांत फार

दुःख होईल. आमच्या उपयोगासाठीं व सुखासाठीं देव मेंढरांच्या अंगावर लोंकर वाढवितो यांत तो किती चांगला आहे, पाहा.

**गोविं.**— अणीक बये, आपण कधींमधीं मेंढरांचें मास खातों कीं नाहीं?

**गंगा.**— होय, इच्छा असली तर खावें, असें देवानें ह्मटलें आहे. त्यानें खावयाकरितां आपणांस नाना प्रकारचे पशु व पक्षी व मासे दिल्हे आहेत. आपणांस भाकर मिळावी ह्मणून तो धान्य पिकवितो. आणि तो नाना प्रकारच्या शाखा व फळेंहि उत्पन्न करितो, यासाठीं कीं आह्मी तीं खाऊन बळकट व निरोगी आणि काम करावयास शक्तिमान व्हावें आणि देवावर प्रीति व त्याची सेवा करावी.

**गोविं.**— बये, देव आह्मास गाईहि देतो, तिचें गोड दूध आह्मास प्यावयाला मिळतें, हें तूं विसरलीस ना?

**गंगा.**— याची आठवण चांगली केलीस, गोविंदा. देव आह्माला निवळ पाणीहि देतो. जेव्हां आह्मी गरम व तान्हेले आहों तेव्हां तें पिऊन किती गोड लागतें. तें सर्वत्र मिळतें. त्वां भूमि खणली तर तुला पाणी सांपडेल. त्याचा फार उपयोग आह्मास नित्य आहे. आपले हात, तोंड, व वस्त्रें धुण्याकरितां स्वयंपाक करण्याकरितां आणि पिण्याकरितां त्याचा उपयोग आहे. यास्तव देव आपणांस फार पाणी देतो. जर आह्माला पुष्कळ पाणी नसतें तर केवढें दुःख लागलें असतें.

**गोविं.**— अगे बये, देव किती निरनिराळ्या प्रकारें आमचें कल्याण करितो.

**गंगा.**— खरें, गोविंदा, त्या नदीच्या तिरीं किती रेतीचे बारीक कण आहेत, ते मोजून पाहण्यास जसें अवघड पडेल तसें देवाचें सर्व उपकार सांगावयास अवघड पडेल.

**गोविं.**— बये, देवानें मजवर एक प्रकारचा उपकार केला आहे तसा तुजवर नाहीं, असें मला वाटतें.

**गंगा.**— तो काय आहे?

**गोविं.**— तुझें रक्षण करावयास तुला कोणी दयाळू बाप किंवा आई नाहीं. परंतु माझ्या संरक्षणासाठीं देवानें मला फार चांगली आई दिल्ही आहे. असी चांगली आई मला देऊन त्यानें मजवर मोठा उपकार केला, असें मला वाटतें. बये, मी त्याजवर आणि तुजवरहि प्रीति करितों.

**गंगा.**— पण गोविंदा, जेव्हां मी तुजसारिखी लाहान होतें तेव्हां माझें पालण करण्याकरितां आईबापें होतीं. आतां देव माझा आकाशांतील बाप आहे. मी तुझें पालण करितें त्यापेक्षां तो माझें चांगलें रक्षण करितो.

**गोविं.**— जर तूं मेलीस तर देव माझें पालण करील कीं काय? पण तूं मरणार नाहींस, असी मला आशा आहे, आई.

**गंगा.**— परंतु मला मरण येईल. आणि तुजपेक्षां माझें वय फार आहे, ह्मणून तुझ्यापूर्वीं मी फारकरून मरेन. जर असें झालें तर देव तुझें चांगलें संरक्षण करील आणि जसा आतां तो तुझा आकाशांतील बाप आहे तसा तो राहील. जें जें तुला पाहिजे तें तें त्याजवळ त्वां मागावें आणि म्या जसें तुझें बरें केलें आहे त्याहून तो अधिक करील, असा विश्वास धर.

**गोविं.**— तसें करण्यास झटेन. परंतु जेव्हां तूं मरसील तेव्हां मला फार खेद होईल. मग फिरून तूं मला भेटणार नाहींस.

**गंगा.**— होय माझ्या मुला, मी आकाशलोकांत तुला पुन्हा भेटेन, आणि तेथें आपण तुझ्या बापाला पाहून एकत्र सुख पावूं, असी माझी आशा आहे.

**गोविं.**— बये, ह्या जगांत देव आपणांस फार सुखी करितो ह्मणून तो आकाशलोकांतहि आपणांस सुखी करील, असी माझी खातरी आहे.

**गंगा.**— मुला, आपण त्यावर प्रीति करूं आणि त्याच्या आज्ञा पाळूं तर

तो असें करील. देवावर प्रीति केल्यावांचून जरी त्यानें आम्हाला आकाशलोकांत जाऊं दिल्हें असतें, तरी सुख होणार नाहीं. परंतु आतां माघारी जाण्याची वेळ झाली.

नंतर तीं डोंगरावरून खालीं उतरून घरीं गेलीं.

---

## सातव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. मधमाशा कशानें सुखी होतात?

२. जर तूं आळसी आहेस तर तूं सुखी होसील कीं काय?

३. देवानें जनावरें कशासाठीं उत्पन्न केलीं?

४. देवानें मेंढरें कशासाठीं उत्पन्न केलीं?

५. देवानें खाण्याकरितां आम्हाला काय दिल्हें? आमच्या उपयोगासाठीं व समाधानासाठीं देवानें जीं जनावरें आणि वस्तू दिल्या आहेत त्यांतील कांहीं कांहीं सांग.

६. देव आम्हास पाणी देतो यांत तो फार दयाळू हें कशादरून दिसतें?

७. किती प्रकारानी देव आमचें कल्याण करितो हें तुला सांगतां येतें कीं काय?

८. तुझें रक्षण व पोषण करण्याकरितां तुला मायाळू आईबाप कोणी दिल्हे?

९. तुला चांगले मित्र कोण देतो? तुला चांगले शिकविणारे कोण देतो? जेव्हां लाहान मुलांचे आईबाप मरतात तेव्हां त्यांचें पालण कोण करितो?

१०. देव तुझा फार कृपाळू आकाशांतील बाप आहे कीं काय?

११. तुझीं आईबापें मरण पावलीं तर देव तुझा कृपाळू आकाशांतील बाप राहील कीं काय?

१२. चांगल्या माणसांची भेट आकाशलोकांत होईल कीं काय?

१३. देव आकाशलोकांत कोणास सुखी करील?

१४. देवावर प्रीति केल्यावांचून आकाशांत गेलें असतां तेथें सुख होईल कीं काय?

---

## संभाषण ८.

संध्याकाळीं चाहा झाल्यावर गंगाबाई गोविंदाला घेऊन बागांत फिरावयास गेली. तेथें तारे दिसूं लागले तोंपर्यंत तीं फिरत होतीं. तान्यानी आकाश भरलें होतें. दिवस उन्हाळ्याचे असतां रात्रीची हवा खावयाला बरें वाटलें. मग तीं उभयतां मंडपांत बसून देवाच्या चांगलेपणाविषयीं संभाषण करूं लागलीं.

**गंगा.**— मुला, देव फार चांगला आहे हें दुसऱ्या गोष्टींवरूनहि दिसून येतें, त्यांतील कांहीं मी तुला आतां सांगतें.

**गोविं.**— जर सांगसील तर मला फार आनंद होईल, बये.

**गंगा.**— मुला, देव तुला जीवन, आरोग्य, आणि सुख होण्याकरितां जीं जीं पाहिजेत तीं तीं देतो. यावरून त्याचें चांगलेपण दिसतें परंतु त्यांखेरीज आह्मी सुखी व्हावें ह्मणून जें अगत्य आहे त्यापेक्षां पुष्कळ सुख भोगावें ह्मणून तो बहुत पदार्थ देतो.

**गोविं.**— होय, बये. पाहण्यासाठीं आणि हुंगण्यासाठीं देव बागांत किती सुंदर फुलें उत्पन्न करितो.

**गंगा.**— होय, तें खरें गोविंदा. जीं त्वां कधीं पाहिलीं नाहींत असीं हजारोंहजार सुंदर फुलें देवाने उत्पन्न केलीं, तीं पाहून दुसऱ्या माणसांला आनंद होतो. देवाने ही पृथ्वी रमणीय वस्तूनी भरली आहे, असें कीं जेथें जेथें आह्मी पाहतों तेथें तेथें कांहीं तरी कौतुक दिसतें, त्यावरून आह्मी समजतों कीं देव आमचें सुख पाहतो. मुला, गवत हिरव्या रंगाचें आहे आणि दुसऱ्या रंगाचें कां नाहीं, याचा विचार त्वां कधीं केला कीं काय?

गोविं.— नाहीं, बये. परंतु माझ्या मनांत असा विचार आतां आला कीं, तें आणि झाडांचीं पानें हीं जर तांबडीं असतीं तर त्यांकडे पाहण्यानें आमच्या डोळ्यांस दुःख होतें.

गंगा.— तेंच कारण आहे. जसें आह्माला फार वेळ हिरव्या रंगाकडे पाहतां येतें तसें दुसऱ्या रंगाकडे पाहतां येत नाहीं. कोणी माणसें हिरवें उपनेत्र लावून पाहतात असें त्वां पाहिलें नाहीं कीं काय?

गोविं.— होय, बये. परंतु ते असें कां करितात हें मला ठाऊक नाहीं.

गंगा.— त्यांचे डोळे विकारी आणि अशक्त आहेत, यांमुळें त्यांच्यानें चकचकीत वस्तूंकडे पाहवत नाहीं. जेव्हां ते हिरवें उपनेत्र लावून पाहतात तेव्हां त्यांस सर्व पदार्थ हिरवे दिसतात, उपनेत्र त्यांच्या डोळ्यांस फार सुखकारक आहे.

गोविं.— बाई, तुला किती चमत्कारिक गोष्टी ठाऊक आहेत, अशा बहुत अणखी मला सांगसील तर बरें होईल.

गंगा.— सांगावयास मला आनंद आहे, गोविंदा. जेवढें तूं चमत्कारिक गोष्टीविषयीं अणखी समजतोस तेवढें तूं देवाच्या चांगलेपणाविषयीं अणखी समजसील. इकडून तिकडे फिरतांना तुला दुःख न व्हावें यासाठीं त्यानें तुला डोळे दिल्हे, असें केवळ नाहीं, परंतु तुझ्याभोंवते कोठ्यावधि सुंदर पदार्थ आहेत ते पाहून तुला संतोष व्हावा असें त्यानें ते केले आहेत.

गोविं.— बाई, कांहींएका वस्तूकडे पाहून मला सुख होतें तेव्हां देव मजवर किती दयाळू आहे, याचा विचार म्या करावा.

गंगा.— खरें मुला, त्याचे उपकार त्वां मानावे. तो तुझें कल्याण करितो ह्मणून त्याजवर प्रीति करून त्वां त्याच्या आज्ञा नेहमी पाळाव्या, असेंहि ध्यानांत आणावें. गोविंदा, तुला ऐकण्यासाठीं देवानें किती मधुर स्वर केले आहेत याचाहि विचार कर.

गोविं.— बये, सर्वांपेक्षां तुला कोणते नाद आवडतात?

गंगा.— कांहीं प्रकारचें गायन मला फार आवडतें, परंतु सर्वांपेक्षां मला

कोणता प्रकार आवडतो हें बरोबर ठाऊक नाहीं. पण देवळांतील गायन व वाद्यें हीं मला फार आवडतात.

गोविं.— मलाहि तींच आवडतात, आई. पण त्यांपेक्षां एक प्रकार आहे तो ऐकावयास मला अधिक संतोष होतो. मला समजण्याजोगा एक लाहानसा अभंग माझी मावशी कधींमधीं गाती, तें ऐकणें मला फार आवडतें, ती कसें गोड गाती बया!

गंगा.— आमच्या ऐकण्यासाठीं किती मधुर शब्द आहेत. देवाची इच्छा असली तर त्याच्याने आमचे कान असे करवले कीं कोणताहि नाद मंजूळ वाटणार नाहीं, केवळ शब्दांचे भेद ओळखावे; जसें जेव्हां मी बोलतें किंवा टिपू भुंकतो अथवा मांजर म्याऊं करितें तेव्हां तूं हे शब्द ऐकून त्यांचे भेद समजतोस त्या प्रकारें देवाला आमचे कान करितां येत होते.

गोविं.—बरें बाई, देवाच्या चांगलेपणाचीं लक्षणें पाहूं लागलों तर त्यांचा अंत नाहीं, असें मला वाटतें.

गंगा.— गोविंदा, मला फावलें असतें तर देवाने तुझें शरीर किती चमत्कारिक उत्पन्न केलें आहे, असें कीं तें तुझ्या आत्म्याला फार सोईचें व सुखदायक वस्ती आहे, हें म्या तुला सांगितलें असतें.

गोविं.— सांग बये, शरीराविषयीं आणि त्यांतील अवयवांविषयीं विशेषेंकरून समजावें असी माझी इच्छा आहे. घड्याळांतील लाहान चक्रें कांट्यांला फिरवितात, त्यांविषयीं जेव्हां आपण भाषण करीत होतों तेव्हां शरीरांतील अवयवांविषयीं त्वां मला कांहीं सांगितलें, याची तुला आठवण आहे कीं नाहीं?

गंगा.— आहे. थोड्या दिवसांनंतर मी तुला त्यांविषयीं सांगेन असें वाटतें. परंतु जेव्हां मी तुला सांगेन तेव्हां चांगलें समजावें ह्मणून माझ्याजवळ कांहीं चित्रें आहेत तीं मी तुला दाखवीन, यासाठीं पुष्कळ वेळ लागेल. पण देव किती चांगला आहे याविषयीं मला दुसरी एक गोष्ट सांगावयाची आहे.

**गोविं.**—ती काय आहे, बाई?

**गंगा.**—तुझ्या आत्म्याच्या राहण्यासाठीं देवानें तुला फार सोईचें शरीर दिलें असें केवळ नाहीं, पण जो त्या शरीरांत राहून तें कामास लावील आणि चांगला होऊन चांगलें काम करील, असा तुझा आत्मा त्यानें किती चमत्कारिक केला आहे, यासाठीं कीं इहलोकीं तुला सुख व्हावें आणि परलोकीं तूं सर्वकाळचें कल्याण पावावें, यांचा विचार कर.

**गोविं.**— बाई, मी पुष्कळ वस्तू घेऊन कामास लावितों. मी आपला चाकू, दांडू, आणि चेंडू, हीं कामास लावितों, परंतु मी आपलें शरीर कामास कसें लावितों हें मला समजत नाहीं.

**गंगा.**—मुला, तुझा आत्मा शरीरांत नसता तर पाहणें, ऐकणें, वास व रुचि घेणें, व स्पर्श करणें, हीं तुला न घडतीं. जेव्हां आत्मा शरीरांत नाहीं तेव्हां तें निर्जीव आहे. भणखी जेव्हां शरीर निर्जीव आहे तेव्हां डोळ्यानी दिसत नाहीं, कानानी ऐकूं येत नाहीं, नाकानें वास समजत नाहीं, जिभेला रुचि आणि हातानी स्पर्श होत नाहीं.

**गोविं.**— खरें, बये, लाहान जगू मेल्यावर त्याप्रमाणेंच झालें, याची आठवण आहे. त्या वेळेस त्याच्यानें किमपि हालवेना, आणि कांहींच करवेना.

**गंगा.**— तुझा आत्मा शरीरांत नसता तर तुलाहि हालवितां न येतें आणि कांहींच करितां न येतें. जो तुझ्या डोळ्यानी पाहतो, तुझ्या कानानी ऐकतो, तुझ्या नाकानें वास घेतो, तुझ्या जिभेनें रुचि घेतो, आणि तुझ्या हातानी स्पर्श करितो, तो तुझा आत्मा आहे. मी कधींमधीं उपनेत्र लावून पाहतें, याचें कारण काय ह्मणून तुला वाटतें?

**गोविं.** —तुला स्पष्ट दिसावें ह्मणून.

**गंगा.**— खरें, त्यावांचून रात्रीं माझ्यानें किंचित वाचवत नाहीं. ह्मणून माझें उपनेत्र दुसऱ्या डोळ्यांसारिखें मला आहे. मी आपलें उपनेत्र काढून त्याच्या घरांत ठेविलें तर त्याला पाहतां येतें कीं काय?

**गोविं.**— नाहीं, बये. तुझें उपनेत्र पाहत नाहीं, तूं त्यांतून पाहतीस.

**गंगा.**— जसें माझें उपनेत्र त्याच्या घरांत असतां त्याला पाहतां येत नाहीं, तसे माझे डोळे काढिले असतां त्याला पाहतां येणार नाहीं. अणखी माझे डोळे डोक्यांत असतां किंवा माझें उपनेत्र लाविलें असतां त्यांला पाहतां येत नाहीं, परंतु पाहणारा मीच आहें, ह्मणजे जो आत्मिक पदार्थ माझ्या शरीरांत राहतो तो माझा आत्मा माझ्या डोळ्यांकडून पदार्थ पाहतो.

**गोविं.**— हा विचार माझ्या मनांत अगोदर कधीं आला नाहीं, बये.

**गंगा.**— गोविंदा, याप्रमाणें बहुत प्रकारचीं कामें करण्याकरितां आत्मा शरीराला व त्याच्या अवयवांस कामास लावितो. देव किती चांगला आहे कीं त्यानें तुला एवढें आश्चर्यकारक आणि उपयोगी शरीर देऊन त्यांत असला चमत्कारिक आत्मा ठेविला आहे याचा विचार कर.

**गोविं.**— बये, माझ्या शरीरापेक्षां माझा आत्मा फार चमत्कारिक आहे असें तुला वाटत नाहीं कीं काय?

**गंगा.**— असें मला वाटतें, मुला, देवानें तुला असा आत्मा दिल्हा आहे ह्मणून त्वां त्याजवर प्रीति करावी आणि त्याच्या आज्ञा पाळाव्या. परंतु याविषयीं आपण उद्यां अणखी संभाषण करूं, आतां उशीर झाला आणि दंव पडूं लागलें ह्मणून आपण घरांत जाऊं.

---

## आठव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. तुला जीवंत आणि निरोगी कोण ठेवितो?

२. देव तुला जीवंत निरोगी आणि सुखी कसा ठेवितो?

३. त्वां विशेष सुखी व्हावें ह्मणून देवानें कांहीं वस्तू दिल्ही आहे कीं काय?

४. देव आह्माला फुलें कशासाठीं देतो?

५. जीं तुझ्या दृष्टीस कधीं पडलीं नाहींत असीं फुलें देवानें उत्पन्न केलीं आहेत कीं काय?

६. तीं त्याने कशाला उत्पन्न केलीं?

७. तुझ्या डोळ्यांला सुख व्हावें यासाठीं देवाने दुसऱ्या वस्तू उत्पन्न केल्या आहेत त्यांतील कित्येक मला सांग.

८. पृथ्वीवर पुष्कळ सुंदर वस्तू आहेत कीं काय?

९. देव आम्हाला सुखी करावयास इच्छितो हें तुला कशावरून वाटतें?

१०. गवत हिरवें आहे हें कशासाठीं?

११. गवत आणि झाडांचीं सर्व पानें तांबडीं असतीं तर काय झालें असतें?

१२. माणसें हिरवें उपनेत्र कशाला लावून पाहतात?

१३. जेव्हां तूं कोणी माणसाने केलेले चमत्कारिक पदार्थ पाहतोस तेव्हां तुला कसें वाटतें?

१४. ज्या सुंदर वस्तू सहज उत्पन्न होऊन वाढतात त्या पाहून तुला काय वाटतें?

१५. देवाने तुझे डोळे कशाला केले?

१६. जेव्हां कांहीं वस्तूंकडे पाहून तुला सुख होतें त्या वेळेस त्वां कसा विचार करावा? तुला कसी भावना असावी?

१७. तुला ऐकण्याकरितां देवाने कोणत्या प्रकारचे नाद उत्पन्न केले आहेत?

१८. तुला सर्वांहून कोणते नाद आवडतात?

१९. तुला दुसरे कोणते नाद आवडतात?

२०. तुझ्या कानांला अवघे नाद मंजूळ लागतात कीं काय?

२१. निरनिराळ्या नादांचा भेद मात्र समजावा असे देवाच्याने तुझे कान करवले कीं काय?

२२. ज्या सर्व प्रकारानी देव चांगला आहे, ते तुला ठाऊक आहेत कीं काय?

२३. ते सर्व पाहूं लागले तर त्यांचा अंत सांपडेल कीं काय?

२४. तुझें शरीर कोणी उत्पन्न केलें? तुझ्या शरीरांत काय राहतें?

२५. तुझें शरीर कसें आहे?

२६. तुझ्या शरीराचे जे चमत्कारिक अवयव आहेत ते समजण्याची इच्छा तुला आहे कीं काय?

२७. देवाने तुला कसा आत्मा दिल्हा आहे?

२८. देवाने तुझ्या शरीरांत आत्मा कां ठेविला आहे?

२९. शरीरांतून आत्मा गेल्यानंतर शरीर जगतें कीं काय?

३०. शरीरांतून प्राण गेल्यावर डोळ्यानी दिसेल काय? त्या वेळेस कानानी ऐकूं येईल काय? नाकाला वास लागेल काय? जिभेला रुचि होईल काय? हाताला स्पर्श करितां येईल काय?

३१. जो तुझ्या डोळ्यानी पाहतो, व तुझ्या कानानी ऐकतो, व तुझ्या नाकाने वास घेतो, व तुझ्या जिभेने रुचि घेतो, व तुझ्या हातानी स्पर्श करितो तो कोण?

३२. माणसें उपनेत्र कां लावितात? उपनेत्र काढिलें असतां उपनेत्रास पाहतां येतें कीं काय?

३३. माझे डोळे काढिले तर त्यांस पाहतां येईल काय? उपनेत्राकडून कोण पाहतो? डोळ्यांकडून कोण पाहतो?

३४. बहुत प्रकारचीं कामें करण्यासाठीं शरीर व त्याचे अवयव कोण कामास लावितो?

३५. तुझा आत्मा आणि शरीर यांतून कोणता विशेष चमत्कारिक आहे?

३६. देवाने तुला असा चमत्कारिक आत्मा दिल्हा आहे यामुळें त्याजविषयीं तुझ्या मनांत कसी भावना असावी?

---

## संभाषण ९.

दुसऱ्या दिवसीं सकाळीं गंगाबाईने गोविंदाला सांगितलें कीं, "शाब्बाथ जो दिवस तो पवित्र पाळावयास तूं आठीव, कां कीं असी देवाची आज्ञा आहे." ही आज्ञा तिने त्याला पूर्वीं सांगितली होती, परंतु सांप्रत त्याने त्याचा फार विचार केला. देवाच्या चांगलेपणाविषयीं अधिक अधिक

शिकणें, जें पुस्तक त्यानें दिल्हेलें आहे तें वाचणें, त्याची प्रार्थना आणि स्तुति घरांत आणि मंडळींत करणें, आणि आपण त्याजवर अधिक प्रीति कसी करावी, आणि दुसऱ्या माणसांचें कल्याण करण्यानें त्याची अधिक सेवा कसी करावी हें समजणें, याकरितां आह्मास सप्तकांतील एक संपूर्ण दिवस असावा ह्मणून ईश्वर आमचा आकाशांतील बाप यानें शाब्बाथ दिल्हा आहे. त्या ईश्वराविषयीं गोविंदा नुक्ता फार शिकला होता ह्मणून आतां त्यानें त्या आज्ञेचा फार विचार केला. सकाळचें जेवण झाल्या-नंतर गंगाबाई आणि गोविंदा देवळांत जाण्याच्यापूर्वीं पुस्तकखान्यांत जाऊन बसून त्यानी कांहीं वेळपर्यंत संभाषण केलें.

**गोविं.**— बये, माझा आत्मा देवानें दिल्हा यांत तो किती चांगला आहे, याविषयीं तुझ्या मर्जीस आलें तर मला अणखी सांग.

**गंगा.**— मुला, तुझा आत्मा तुझ्या शरीरापेक्षां फार चमत्कारिक आहे. तुझें शरीर अनात्मिक आहे, यास्तव त्यांतून प्राण जाऊन तें मातीसीं मिळेल, परंतु तुझा आत्मा असा नव्हे. तो कधीं मरण पावणार नाहीं, तो सर्वकाळ वांचेल. दुष्ट माणसाला तुझें शरीर हाणून मारून त्याचे हजार तुकडे करितां येतील. असें तुझ्या आत्म्याला त्याच्यानें करवणार नाहीं. तुझ्या आत्म्याला मारण्याकरितां किंवा अपकार करण्याकरितां त्याच्यानें त्याला स्पर्श करवणार नाहीं.

तूं किंचित हालूं नये असें माझ्यानें तुझ्या शरीराला फार घट्ट बांधवतें. त्वां आपलें शरीर कामास न लावावें ह्मणजे त्वां न पाहावें, न ऐकावें, वास आणि रूचि न घ्यावी, आणि स्पर्श न करावा, असा मला तुझा अटकाव करितां येतो; परंतु माझ्यानें तुझ्या आत्म्याला बांधवत नाहीं. कोणी माणसाच्यानें तुझ्या आत्म्याला बांधून त्याचा व्यापार कुंठित करवणार नाहीं.

**गोविं.**— असें देवाच्यानें करवणार नाहीं, बये?

**गंगा.**— करवेल, मुला, तुझें शरीर आणि आत्मा हीं दोन्हीं त्यानें उत्पन्न केलीं. तो दोन्हींचें रक्षण करितो. त्वां आपल्या शरीरांतील अव-

यव कांहीं कामास न लावावें असें त्याच्या मर्जीस आलें तर तो त्यां-तून जीव आणि बळ काढील. तुझें शरीर कामास लावण्याचें सामर्थ्य आत्म्याला आहे आणि विचार करण्याचें आणि भावना धरण्याचें आणि व्यापार करण्याचें सामर्थ्य त्याला आहे, तें तुझ्या आत्म्यापासून त्याच्यानें काढवेल; आणि जसें तुझ्या शरीराला तसें तुझ्या आत्म्यालाहि त्याच्यानें मारवेल.

**गोविं.**— अहाहा! कोणत्याहि माणसाहून देव किती शक्तिमान् आहे?

**गंगा.**— होय, मुला, त्यानें आपल्या मोठ्या सामर्थ्यानें तुझा चमत्कारिक आत्मा उत्पन्न केला. जसा तो सामर्थ्यवान् आहे तसा तो चांगला आहे, यामुळें त्यानें तुझा आत्मा असा केला कीं त्याला अधिक अधिक ज्ञान प्राप्त व्हावें आणि चांगला होत जाऊन जोंपर्यंत देव आहे तोंपर्यंत ह्मणजे सदासर्वकाळपर्यंत उत्तरोत्तर सुखी व्हावा.

**गोविं.**— बये, तें सर्व मला कशानें होईल हें समजावें असी माझी फार इच्छा आहे.

**गंगा.**— मुला, तें तुला शिकवावयास मी फार प्रयत्न करीत आहें. तें समजण्याचा एक प्रकार असा आहे कीं देवानें तुझा आत्मा किती चमत्कारिक केला आहे, असा विचार करावा. पशूंच्या आंत जें विचार करणारें त्याहून तुझा आत्मा फार भिन्न आहे. देवाविषयीं आणि बरें व वाईट यांविषयीं पशूंस शिकवितां येत नाहीं; तुझा आणि त्यांचा किती भेद आहे गोविंदा. हा भेद तुझ्या दयाळू आकाशांतील बापानें केला आहे. ईश्वराविषयीं पशु कांहीं समजत नाहींत ह्मणून त्यांच्यानें त्याजवर प्रीति करवत नाहीं. तूं देवाविषयीं फार समजतोस आणि जसें त्याविषयीं अधिक शिकतोस, तसी त्याजवर अधिक प्रीति करीत जावी.

**गोविं.**— माझ्या शरीराचे पुष्कळ चमत्कारिक अवयव आहेत, असें तूं मला सांगितलें, बाई. तसें आत्म्याला अवयव आहेत कीं काय?

**गंगा.**— नाहीं मुला, हें ध्यानांत धर कीं, तुझा आत्मा तुझ्या शरीरासा-

रिखा नव्हे. तो त्याहून अगदीं भिन्न आहे. तुझ्याने आपल्या आत्म्याला स्पर्श करवत नाहीं. तुझ्याने त्याचे भाग करवत नाहींत, त्याला भाग नाहींत.

गोविंदा, तुझा आत्मा नाना प्रकारचीं कृत्यें करितो, त्यांविषयीं जेव्हां आह्मी बोलतों, तेव्हां आह्मी निरनिराळे शब्द लावितों. कधींमधीं तुला एका प्रकारची भावना आहे तेव्हां 'मी सुखी आहें,' असें ह्मणतोस. कधींमधीं तुला दुसऱ्या प्रकरची भावना आहे तेव्हां 'मी दुःखी आहें,' असें ह्मणतोस.

कधींमधीं तूं मजवर प्रीति करितोस आणि जें मी तुला सांगतें तें करावयास तुला हर्ष वाटतो, तेव्हां 'तूं चांगला मुलगा आहेस,' असें मी ह्मणतें. कधींकधीं म्या तुला सांगितलें तें तूं उनाडपणाने केलें नाहींस, तेव्हां 'तूं वाईट मुलगा आहेस' असें म्या तुला ह्मटलें.

कधींमधीं तूं रमीला सुखी करावयास इच्छितोस आणि त्यासाठीं प्रयत्न करितोस; तेव्हां तें चांगलें आहे, त्वां तिजवर सर्वदां दया करावी, असें मी तुला ह्मणतें.

एका दिवसीं तुझा चेंडू उचलून ती लांब पळून गेली, तेव्हां तूं तिजमागें धांवून तिला धरून मारणार होतास, त्या वेळेस तिची प्रीति तुझ्या मनांत नव्हती, ह्मणून म्या ह्मटलें कीं, तूं रागें भरूं नको, तें फार वाईट आहे. कधींमधीं जें त्वां पूर्वींच्या दिवसीं केलें तें ध्यानांत आणून माझ्याजवळ सांगतां येतें; तेव्हां तूं असें ह्मणतोस कीं, 'त्याची मला आठवण आहे.' कधींमधीं लाहान मुलग्याचें किंवा मुलगीचें नाव काय आहे हें तुला ध्यानांत आणितां येत नाहीं, तेव्हां 'मी विसरलों,' असें ह्मणतोस. त्वां आपला धडा सांगितल्यानंतर मी कधींमधीं ह्मणतें, 'तूं जाऊन खेळ;' तेव्हां थोडासा विचार करून तूं आपली गाडी ओढावी असें मनांत आणितोस, मग एकाएकीं असें करण्याचा निश्चय करून तूं ह्मणतोस कीं, 'मी जातों,' एका दिवसीं रमीने तुला असें विचारिलें कीं, 'तूं इकडे येऊन मजसाठीं लाहान

घर बांधसील कीं काय?' तें करण्याची तुझी इच्छा नव्हती, झणून 'मी येत नाहीं,' असें त्वां झटलें.

याप्रमाणें जेव्हां तूं सुखी किंवा दुःखी, चांगला किंवा वाईट, दयाळू किंवा निर्दय आहेस, जेव्हां तूं स्मरण करितोस विसरतोस आणि इच्छा करितोस, तेव्हां जो असा व्यापार करितो आणि असी इच्छा धरितो तो तुझा आत्मा आहे. तुझ्या आत्म्याचा एक भाग विचार करितो, दुसरा भाग भावना धरितो आणि तिसरा भाग इच्छा करितो, असें नाहीं; कारण तुझ्या आत्म्याला भाग नाहींत. तो एकच एक आहे, त्याचे भाग होणार नाहींत. जो विचार करितो भावना धरितो आणि इच्छा करितो तो आणि तूं एकच आहेस. तूं माझी गोष्ट समजतोस कीं काय?

गोविं.—होय बये, ती मला फार चांगली समजत आहे असें वाटतें. पण जे प्रकार त्वां सांगितले त्यांप्रमाणें विचार भावना आणि इच्छा करणें; यांहून दुसऱ्या बहुत प्रकारानी माझ्याने विचार भावना आणि इच्छा करवतात कीं नाहीं?

गंगा.—तें खरें मुला, आणि त्या दुसऱ्या प्रकारानी आत्मा विचार करितो आणि भावना धरितो यांविषयीं जेव्हां आपण बोलतों, तेव्हां दुसरे शब्द लावितों, परंतु त्याविषयीं मी तुला दुसऱ्या वेळेस सांगेन. देवाने तुझा आत्मा असा चमत्कारिक केला आहे यांत तो किती चांगला आहे असा विचार त्वां करावा, यासाठीं आतां ह्या तुला पुरत सांगितलें आहे.

गोविं—होय बये, आणि जसें मला अणखी समजतें तसें त्याविषयीं अणखी आश्चर्य वाटतें. जसे मला आतां विचार भावना आणि इच्छा होतात, तसे मेल्यावर मला होतील कीं काय?

गंगा.—आतां जसें तुला होतें याहून त्या वेळेस फार भिन्न होईल, असें मला वाटतें. पण तें कसें होईल हें मनांत आणावयास फार कठीण आहे, तें माझ्याने तुला सांगवत नाहीं. तुझा आत्मा शरीरांतून गेल्या-

वर तो कसा वांचेल, विचार, भावना आणि इच्छा कसें करील, हें देवाला ठाऊक आहे. त्यानें तुझा आत्मा आणि शरीर हीं दोन्हीं उत्पन्न केलीं आणि शरीरांत आत्मा ठेविला, आणि तो तीं करण्याची शक्ति तुझ्या आत्म्याला देईल. परंतु तो तुझ्या आत्म्याला ती शक्ति कसी देईल, हें त्यानें आह्मास सांगितलें नाहीं. पण शरीर मेल्यावर तुझा आत्मा वांचेल, विचार व भावना आणि इच्छा करीत जाईल, आणि तो सर्वकाळपर्यंत वांचेल, असें देवानें जें पुस्तक आह्मास दिल्हें आहे त्यांत लिहिलें आहे. जर तूं देवावर प्रीति करून त्याला मानसील आणि जें त्यानें आपल्या पुस्तकांत तुला करावयास सांगितलें आहे तें करसील, तर तुझें शरीर मेल्यावर तुझा आत्मा आकाशलोकांत जाईल आणि तेथें तूं किती चांगल्या गोष्टी शिकसील व समजसील, त्या सर्व माझ्यानें तुला सांगवत नाहींत. त्या तूं लवकर व अनायासानें शिकसील. आतां तुला पुष्कळ गोष्टी समजतां येत नाहींत त्या स्पष्ट होतील. देवाविषयीं आणि त्यानें केलेल्या चमत्कारिक कृत्यांविषयीं तूं अधिक अधिक शिकत जासील. देव तेथें तुला आपणच प्रगट होईल.

**गोविं.**— आई, मी ईश्वराला पाहीन कीं काय?

**गंगा.**— होय, मुला. जर तूं आकाशलोकांत जासील तर तूं आपल्या आकाशांतील बापाला पाहसील, असी माझी खातरी आहे, कारण कीं असें ईश्वरानें आह्मास कळविलें आहे. परंतु कसें पाहसील हें माझ्यानें ध्यानांत आणवत नाहीं. तूं आकाशलोकांत अधिक अधिक शिकत व समजत जासील, असें केवळ नव्हे, परंतु तुला वाईट विचार व भावना होणार नाहींत, आणि जें वाईट आहे तें करावयास तूं इच्छिणार नाहींस. सर्वकाळपर्यंत तूं उत्तरोत्तर चांगला होसील. तुला कांहीं दुःख किंवा रोग होणार नाहीं. तूं खेद कधींहि पावणार नाहींस. तुला कांहीं उपद्रव लागणार नाहीं. तूं फारच सुखी होसील. सर्वकाळपर्यंत तूं उत्तरोत्तर सुखी होत जासील. आकाशलो-

कांतील प्रत्येक मनुष्य तुझ्यासारिखा अधिक ज्ञानी, चांगला, व सुखी होत जाईल, आणि ईश्वराची सेवा व प्रीति अधिक अधिक करीत जाईल. सर्व एकमेकांवर प्रीति करून परस्परांस सुखी करावयास पाहतील.

एथील पदार्थ जे तुला आवडतात ते फार काळपर्यंत राहणार नाहींत, असा विचार करून तुला कधींमधीं दुःख वाटतें. परंतु आकाशलोकांत असें होणार नाहीं. सर्व तुझे चांगले पदार्थ राहतील आणि तुजपासून ते कधीं काढिले जाणार नाहींत, याचें वचन ईश्वरानें दिल्हें आहे, असें तूं खचीत जाणसील.

तर आकाशलोक फार सुंदर, चमत्कारिक, सुखी, व पवित्र ठिकाण आहे कीं नाहीं? ईश्वरानें तुजसाठीं असें ठिकाण सिद्ध केलें आहे ह्मणून तो फार चांगला आहे कीं नाहीं? त्याविषयीं आणि ह्या सुंदर जाग्याविषयींहि ज्याला समजतां येईल, आणि जो आकाशलोकांत जाऊन देवाजवळ सुखी निरंतर होण्याजोगा आहे, असा देवानें तुझा आत्मा केला आहे, यांत तो फार कृपाळू आहे कीं नाहीं? माझ्या पुत्रा, तुझ्या आकाशांतील बापानें तुझा आत्मा असा चमत्कारिक केला आहे याविषयीं विचार कर. तुझा आत्मा असा केला याकरितां आणि त्यानें दुसरे उपकार तुजवर केले आहेत याकरितांहि तूं त्याचा उपकार मान. त्याविषयीं आणि जें त्वां करावें ह्मणून तो इच्छितो त्याविषयींहि अधिक समजावयास प्रयत्न कर. त्याला चिढवूं नको. तूं मनोभावानें त्याजवर प्रीति कर. त्यानें जें पुस्तक तुला दिल्हें आहे तें वाचून समजावयास प्रयत्न कर.

तूं हें ध्यानांत ठेव कीं कांहीं वेळानंतर तुला खचीत मरण लागेल. कदाचित तूं लवकर मरसील. तूं मरणासाठीं सिद्ध हो. मरणकाळीं त्वां आकाशलोकांत जावें यासाठीं तयार व्हावें ह्मणून प्रयत्न कर. तेथें सर्वकाळपर्यंत तूं ईश्वराचें चांगलेपण पाहून त्याविषयीं आश्चर्य मानून त्याजवर प्रीति निरंतर करीत जासील.

एवढी गोष्ट झाल्यावर गंगाबाई आणि गोविंदा हीं दोघें पुस्तकखान्यांतून निघून ख्रिस्ती देवळांत जावयास सिद्ध झालीं. गोविंदा कांहींच बोलला नाहीं. त्याच्या मनांत बहुत विचार भरले. देवाचें चांगलेपण याविषयीं त्यानें विचार केला. मी चांगला मुलगा होऊन मेल्यावर आकाशलोकांत जावें असी त्यानें फार इच्छा केली.

---

## नवव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. ईश्वरानें आह्मास शाब्बाथ दिवस कशासाठीं दिल्हा आहे ?
२. तुझें शरीर कशाचें आहे ? त्याला मरण लागेल कीं काय ?
३. तुझा आत्मा कसा आहे ? त्याला मरण लागेल कीं काय ?
४. कोणीएकाला तुझें शरीर मारितां येईल कीं काय ?
५. तुझ्या शरीराचे तुकडे होतील कीं काय ?
६. कोणीएकाला तुझ्या आत्म्याला मारितां येईल किंवा कांहीं अपकार करितां येईल कीं काय ?
७. माझ्यानें तुझें शरीर न हालवें असा अटकाव करवतो कीं काय ?
८. तुझें पाहणें, ऐकणें, ह्यांस मला अटकाव करितां येतो कीं काय ?
९. तुझे विचार आणि भावना यांचा मला प्रतिबंध करितां येतो कीं काय ?
१०. तुझ्या आत्म्याचा नाश ईश्वराच्यानें करवेल कीं काय ?
११. देवानें आपल्या मोठ्या सामर्थ्यानें तुझा आत्मा उत्पन्न केला असें तुला कशावरून वाटतें ?
१२. तुझा आत्मा ईश्वरानें उत्पन्न केला यांत तो चांगला आहे असें तुला कशावरून वाटतें ?
१३. तुझा आत्मा किती काळपर्यंत राहील ?
१४. तुझा आणि पशूंचा फार भेद कशावरून दिसतो ?
१५. तुझा आणि पशूंचा भेद कोणी केला ?
१६. पशूंला देवावर प्रीति कां करितां येत नाहीं ?

१७. जसें तुला ईश्वराविषयीं अणखी समजतें तसी तुझी भावना त्याविषयीं कसी असावी?

१८. तुझ्या आत्म्याला भाग आहेत कीं काय?

१९. जेव्हां आह्मी आत्म्याविषयीं बोलतों तेव्हां नाना प्रकारचे शब्द कां लावितों?

२० तुला केव्हां सुख वाटतें? दुःख केव्हां वाटतें?

२१. तूं चांगला मूल केव्हां आहेस? वाईट केव्हां आहेस?

२२. तूं दुसऱ्यांवर दयाळू केव्हां आहेस? त्यांवर केव्हां रागें भरतोस?

२३. तूं केव्हां आठवण करितोस? केव्हां विसरतोस?

२४. जेव्हां थोडासा विचार करून तुला कांहीं काम करण्याची इच्छा होती आणि तूं एकाएकीं तें करण्याचा निश्चय करितोस तेव्हां तूं काय ह्मणतोस?

२५. जेव्हां तूं कांहींएक काम करावयास इच्छीत नाहींस तेव्हां तूं काय ह्मणतोस?

२६. जो तुझ्या देहांत विचार भावना आणि इच्छा करितो, तो काय आहे?

२७. तुझ्या आत्म्याचा एक भाग विचार करितो, दुसरा भाग भावना धरितो, आणि तिसरा भाग इच्छा करितो, असें आहे कीं काय?

२८. बहुत प्रकारानी आत्म्याला विचार व भावना आणि इच्छा करवतात कीं काय?

२९. ह्या नाना प्रकारानी आत्मा विचार व भावना आणि इच्छा करितो यास निरनिराळे शब्द लागतात कीं काय?

३०. जेव्हां तुझा आत्मा शरीरांतून गेला आहे तेव्हां जसे तुला आतां विचार भावना आणि इच्छा होतात तसे तुला होतील कीं काय?

३१. तुझा आत्मा शरीरांतून गेल्यावर तो कसा विचार भावना आणि इच्छा करील, हें तुला ठाऊक आहे काय? मला ठाऊक आहे कीं काय? कोणाला ठाऊक आहे?

३२. तुझा आत्मा सर्वकाळपर्यंत राहील हें तुला कशावरून ठाऊक आहे?

३३. तुझें शरीर मेल्यावर तुझा आत्मा आकाशलोकांत जावा ह्मणून त्वां काय करावें लागतें?

३४. आकाशलोकांत जाऊन तूं काय करसील?

३५. तूं आकाशलोकांत जासील तर तुझ्या दृष्टीस ईश्वर पडेल कीं काय?

३६. असें कशावरून वाटतें?

३७. जर तूं आकाशलोकांत जासील तर तेथें तुला कसे विचार व भावना व इच्छा होतील?

३८. ज्याकडून आकाशांतील लोकांस दुःख लागेल असें कांहीं आकाशांत आहे कीं काय?

३९. जे आकाशलोकांत आहेत त्यांचें ज्ञान फार वाढतें कीं काय?

४०. ते अधिक चांगले आणि सुखी होतील कीं काय?

४१. त्यांच्या भावना ईश्वराकडे आणि एकमेकांकडे कशा आहेत?

४२. जे चांगले पदार्थ आकाशलोकांत आहेत त्यांतील कांहीं कधीं काढिले जातील कीं काय?

४३. आकाशलोक तुला कसा वाटतो? तुझा आत्मा कसा आहे ह्मणून तुला वाटतें?

४४ ईश्वर कसा आहे ह्मणून तुला वाटतें? जें पुस्तक त्याने तुला दिलें आहे तें तुला कसें वाटतें? तुला केव्हां मरण येईल?

४५. मरणासाठीं सिद्ध व्हावें ह्मणून तुला काय केलें पाहिजे?

---

## संभाषण १०.

गंगाबाईने गोविंदाला उपदेश केला होता त्याविषयीं तो सर्व दिवसभर फारच विचार करीत गेला. संध्याकाळीं तीं ख्रिस्ती देवळांतून निघून घरास आल्यानंतर गोविंदाने आपल्या आईला विचारिलें कीं, "बये, पुस्तकखान्यांत जाऊन तूं मला देवाच्या चांगलेपणाविषयीं अणखी सांगसील बरें?' तिने ह्मटलें, "होय, तूं देवळांत फार चांगला राहिलास ह्मणून

मी कांहीं बोलेन." असें सांगून तिने त्याचा हात धरिला आणि तीं उभयतां पुस्तकखान्यांत जाऊन खिडकीजवळ बसलीं. ती खिडकी उघडी होती यामुळें त्यांस चांगली हवा लागली आणि रमणीय बाग त्यांच्या दृष्टीस पडला.

**गंगा.**— गोविंदा, ज्या प्रकारानी ईश्वर तुझें कल्याण करीत आहे त्यांतील बहुत म्या सांगून दाखविले आहेत. तो केवळ तुझें कल्याण करितो असें नाहीं, परंतु तो हजारोंहजार व लाखोंलाख प्राण्यांचें कल्याण करितो. कल्याण करून त्याला संतोष आहे.

**गोविं.**—बये, त्याला एवढी शक्ति आहे कीं त्याच्याने बहुतांचें कल्याण करितां येतें.

**गंगा.**— खरें, मुला, तो नेहमी कल्याण करितो आहे. पाहा किती पांखरें, पशु, मासे, व जंतु त्याने उत्पन्न केले आहेत. तो अष्टौप्रहर त्या अवघ्यांचें रक्षण करितो आहे, तो त्यांस अन्न, आणि बहुत पदार्थ देऊन त्यांचें कल्याण करितो.

**गोविं.**—पण, बये, जेवढें सुख आह्माला होतें तेवढें त्यांला होत नाहीं.

**गंगा.**— तें खरें, मुला. ज्या प्रकारचें सुख आह्मास होतें तसें त्यांस होत नाहीं. त्यांचा आमचा फार भेद आहे. त्यांला शरीरसंबंधी सुख होतें. आह्मीहि आपल्या शरीरांच्या योगाने सुख भोगितों; परंतु यापेक्षां आह्मास आपल्या आत्म्याच्या योगाने बहुत सुख होतें. तरी जनावरांस पुष्कळ सुख होतें. विचार करून पाहा, तीं किती कोट्यावधि आहेत. तीं बहुतकरून निरोगी व बळकट आहेत. त्यांस प्यावयास व खावयास जेवढें पाहिजे तेवढें मिळतें. तीं रानामध्यें उड्या मारितात, फुलांमध्यें फिरतात; शेतांत खेळतात, आकाशांत उडतात, पाण्यामध्यें खेळतात; त्यांस फारकरून काळजी व श्रम नाहीं. मरणाचें भय नाहीं, कारण कीं त्यांस मरण लागेल असें त्यांला ठाऊक नाहीं, यावरून त्यांस फार सुख आहे असें वाटतें; अणखी कल्याण करण्याने ईश्वराला किती संतोष आहे हें ह्या जनावरांच्या गोष्टीवरून

आह्मास दिसतें. पण जेव्हां आह्मी असा विचार करितों कीं सर्व पुरुष, स्त्रिया, लेंकरें, हीं आह्मासारिखीं असून, जसे आह्मास आत्मे तसे त्यांसहि आहेत, जसें आह्मास ज्ञान उत्तरोत्तर होईल तसें त्यांस होईल, आणि जसीं आह्मी चांगलीं व सुखी होण्याजोगे आहों तसीं तींहि होण्याजोगीं आहेत; आणि जेव्हां आह्मी असा विचार करितों कीं सांप्रत पृथ्वींत किती लोक आहेत, आणि आह्मी जन्मल्यापूर्वी किती होते, अणखी असा कीं ईश्वराने त्या सर्वांचीं शरीरें व आत्मे उत्पन्न केले, तो त्या सर्वांचें रक्षण करितो, ते सर्व चांगले व सुखी होऊन त्यापासीं आकाशलोकांत सर्वकाळपर्यंत राहावे असें तो इच्छितो; असा विचार जेव्हां आह्मी करितों तेव्हां ईश्वराचें चांगलेपण केवढें मोठें आणि आश्चर्यवत दिसतें. ईश्वर किती मोठा आणि चमत्कारिक आहे, हें जसें आह्माला समजत नाहीं तसें त्याचें चांगलेपण किती मोठें आणि आश्चर्यवंत आहे हें आमच्या ध्यानांत येत नाहीं.

**गोविं.**—बये, ईश्वर तुझें आणि रमीचें कल्याण करितो, याकरितां मी त्याचा उपकार मानितों.

**गंगा.**—मुला, ईश्वर माझें आणि रमीचें कल्याण करितो, ह्मणूनच तूं त्याचा उपकार मानितोस कीं काय? तुझ्या जानोजी मामाचें व गोदावरी मावशीचें, आणि ज्या लहान मुलग्यांची व मुलींची ओळख तुला आहे त्या अवघ्यांचें, आणि ज्यांची ओळख तुला नाहीं त्यांचेंहि, आणि पृथ्वींतील सर्व लोकांचें कल्याण तोच करितो, हें समजून तुला हर्ष होत नाहीं कीं काय?

केवळ तुला उजेड व्हावा यासाठीं ईश्वराने सूर्य, चंद्र, तारे, यांस उत्पन्न केलें काय? केवळ त्वां श्वासोश्वास घ्यावा ह्मणून त्याने वारा निर्माण केला काय? केवळ त्वां सुखी व्हावें ह्मणून त्याने दुसरे चांगले पदार्थ निर्माण केले बरें? जसी तूं आणि मी सुखी व्हावयास इच्छितों तसेंच दुसरे मुलगे, आणि मुलग्या, आणि लोक, सुखी व्हावयास इच्छितात. जसा ईश्वर मजवर आणि तुजवर प्रीति करितो तसा तो त्यांवर प्रीति करितो. तीं मजपेक्षां किंवा तुजपेक्षां चांगलीं असलीं तर

ईश्वर आह्मापेक्षां त्यांवर अधिक प्रीति करील. जसा तुजसाठीं किंवा मजसाठीं तसाच त्यांसाठींहि त्यानें आकाशलोक केला. तुला सुख वाटतें तेव्हां जसा तूं संतुष्ट आहेस तसाच जेव्हां दुसरीं माणसें सुखी आहेत तेव्हांहि तुला हर्ष असावा. दुसऱ्यांचें कल्याण करावें आणि असें करून ईश्वरासारिखा व्हावें याविषयीं तूं प्रयत्न करावा. आकाशांतील अवघ्या लोकांस तसा हर्ष होतो, आणि त्याप्रमाणें ते दुसऱ्यांचें कल्याण करितात. दुसरीं मनुष्यें सुखी व्हावीं, असी इच्छा जर तूं धरीत नाहींस आणि त्यांचें कल्याण करण्याचा प्रयत्न करीत नाहींस तर तूं आकाशलोकांत जाणार नाहींस.

**गोविं.**— बये, मला कशानें सुख प्राप्त व्हावें याविषयीं फार विचार म्या केला आहे, परंतु दुसऱ्यांचें कल्याण कशानें करावें याविषयींच म्या फार विचार केला नाहीं, असें मला वाटतें.

**गंगा.**— बरें, मुला. हें तूं समजूं लागलास असें जाणून मला हर्ष वाटतो. ईश्वरासारिखा व्हावें आणि जितकें तुझ्यानें होईल तितकें दुसऱ्यांचें कल्याण करावें याविषयीं तुला प्रयत्न केले पाहिजेत. दुसऱ्या एका प्रकारानें देवानें आह्मावर मोठीच कृपा केली आहे, तो प्रकार मी आतां तुला सांगतें ह्मणून तूं फार लक्ष देऊन माझें ऐक.

**गोविं.**— ऐकतों बये, तो प्रकार काय आहे?

**गंगा.**— हें पुस्तक तूं पाहा. (गंगाबाईनें मेजावरून एक पुस्तक घेऊन आपल्या मांडीवर ठेवून उघडिलें).

**गोविं.**— पाहतों बये?

**गंगा.**— हें धर्मपुस्तक असें ह्मणतात. हें ईश्वराचें पुस्तक आहे. हें त्यानें आह्मास दिल्हें आहे. या पुस्तकाकडून तो आपणाविषयीं आणि इहलोकांत व परलोकांत आह्मास सुख प्राप्त व्हावें यासाठीं जें आह्मांला करावें लागतें तें कळवितो.

**गोविं.**—तें देवानें लिहिलें, बये?

**गंगा.**— त्यानें फार धार्मिक मनुष्यांस हें लिहिण्याची आज्ञा दिल्ही.

बहुत वर्षांमागे त्यानी हें लिहून ठेविलें एकानें एक भाग लिहिला आणि दुसऱ्यानें दुसरा भाग लिहिला. त्यानी निरनिराळ्या वेळेस लिहिलें जें जें त्यानी लिहिलें तें तें जर ईश्वरानें त्यांस सांगितलें नसतें, तर काय लिहावयाचें तें त्यांस समजलें नसतें. ज्या गोष्टी पूर्वीं कोणीएकाच्या मनांत आल्या नाहींत अशा बहुत त्यानें त्यांस कळविल्या. त्यानें चूक करण्यापासून त्यांस राखिलें. जर ईश्वरानें धर्मपुस्तक लिहावयास त्या सज्जनांस सांगितलें नसतें, तर त्याविषयीं आणि आमच्या आत्म्याविषयीं आणि आकाशलोक व नरक यांविषयीं ज्या गोष्टी त्यानें त्यांस सांगितल्या त्या कधींहि कोणीएकाला समजल्या नसत्या. आह्मी मेल्यानंतर नरकांत न जावें आणि आतां आकाशलोकांत जावयास सिद्ध व्हावें, यासाठीं जें आह्मास केलें पाहिजे तें समजावें ह्मणून ईश्वरानें आह्मास धर्मपुस्तकांत पुरतें सांगितलें आहे.

**गोविं.**—अहाहा! बये, ईश्वरानें तें धर्मपुस्तक आह्मास दिल्हें ह्मणून तो किती चांगला आहे!

**गंगा.**—खरें, मुला. या पुस्तकांत जें लिहिलेलें आहे त्याविषयीं तुल जसें अणखी समजतें, तसें तूं आपल्याविषयीं आणि ईश्वराविषयीं अणखी समजसील. अणखी जर तूं धर्मपुस्तकावर प्रीति करसील आणि त्याच्या उपदेशाप्रमाणें आचरसील, तर हें सर्व पुस्तकांहून श्रेष्ठ असें तुला वाटेल. हें फार फार प्रिय असें तूं मानसील. तुझ्या आकाशांतील बापानें तुला मायेचें पत्र दिल्हें, ते हें पुस्तक आहे असें तुझ्या अनुभवास येईल. तो प्रत्येक पानावरच्या गोष्टीनी मला बोलतो, असें तुला वाटेल. ईश्वर माझ्याजवळ आहे मला बोध देतो मला वाट दाखवितो, मला मार्गांत चालवितो, आणि माझें साहाय्य करितो, असें तुला वाटेल. जर मी मरण पावलें, आणि तुझे अवघे भाऊबंद मेले, आणि तूं एकटा राहून अनाथ व दरिद्री झालास, तर हें पुस्तक घेऊन असें समजावें कीं, यांत मी आपल्या आकाशांतील बापाचें बोलणें ऐकतों. तुला वाट दाखवायाकरितां आणि तुझें साह्य करावयाकरितां तो तुझ्याजवळ होईल. त्यानें तुला वाट दाखवून तुझें साहाय्य करावें

ह्मणून त्वां त्यापासीं मागावें. सर्व तुझीं दुःखें त्याला सांग. तुझ्या सर्व गरजा त्याला सांग. त्वां वाईट केलें आहे हें समजून तुला खेद व्हावा आणि मला खेद आहे, असें त्यापासीं सांग. तूं माझी क्षमा कर, आणि माझें साहाय्य असें कर कीं मी कांहीं वाईट कर्म करूं नये आणि कांहीं वाईट बुद्धि धरूं नये असें तूं ईश्वरापासीं माग. असें मागणें याला ईश्वराची प्रार्थना ह्मणतात. मुला, तूं नित्य देवाची प्रार्थना कर. जर तूं मनापासून त्याची प्रार्थना करसील तर तुझ्या प्रार्थना ऐकून तो तुझें बरें करील, असें वचन त्यानें दिलें आहे.

असें बोलत होते इतक्यांत चाहा पिण्याकरितां घांट वाजली ह्मणून गंगाबाई आणि गोविंदा यांचें संभाषण समाप्त झालें.

---

## दाहाव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. ईश्वर केवळ तुझें कल्याण करितो कीं काय? तो पुष्कळ लोकांचें कल्याण करितो काय?

२. ज्या प्रकारें आह्मास सुख होतें त्या प्रकारें पशु, पांखरें, मासे, जंतु, यांस सुख होतें काय?

३. तीं फार सुख भोगितात कीं काय?

४. कल्याण करून ईश्वराला संतोष आहे हें त्यांकडून कसें दिसतें?

५. कल्याण करून ईश्वराला संतोष आहे हें पुरुष, स्त्रिया, लेंकरें, यांकडून कसें दिसून येतें?

६. ईश्वराचें चांगलेपण केवढें मोठें आहे हें तुला समजतें कीं काय?

७. तूं सुखी व्हावयास इच्छितोस बरें? दुसऱ्या माणसांस सुखी होण्याची इच्छा आहे काय?

८. देव दुसऱ्यांचें कल्याण करितो असें समजून तुला हर्ष होतो कीं काय?

९. तुला ईश्वरासारिखा होण्याचा यत्न कसा केला पाहिजे?

१०. सर्व आकाशांतील लोकांची इच्छा कसी आहे?

११. त्वां आकाशलोकांत जावें ह्मणून तुला कसी भावना धरिली पाहिजे?
१२. त्वां दुसऱ्यांचें कल्याण कसें करावें याविषयीं त्वां फार विचार केला आहे कीं काय?
१३. जर तुझ्या आईबापानी असाच विचार केला होता कीं आह्मास सुख कशाने प्राप्त होईल, तर तुला कसें झालें असतें?
१४. धर्मपुस्तक काय आहे? ईश्वर धर्मपुस्तकाकडून आह्मास काय कळवितो?
१५. देवाने धर्मपुस्तक लिहिलें कीं काय?
१६. ज्या माणसानीं धर्मपुस्तक लिहिलें त्यांस जें लिहावयाचें होतें तें कसें ठाऊक झालें?
१७. जर ईश्वराने आह्मास धर्मपुस्तक दिल्हें नसतें तर देवाविषयीं आणि आमच्या आत्म्याविषयीं आणि आकाशलोक व नरक यांविषयीं आह्माला काय समजलें असतें?
१८. जर तूं धर्मपुस्तकावर प्रीति करून त्याला मानसील तर तें तुला कसें वाटेल?
१९. देव तुजजवळ आहे असें तुला कशाने वाटेल?
२०. तुला जर कोणी भाऊबंद नाहींत आणि तुला जें करावयाचें तें ठाऊक नाहीं, तर ईश्वराने तुला वाट दाखवून तुझें सांभ्र करावें ह्मणून तुला काय केलें पाहिजे?
२१. त्वां देवाजवळ काय मागावें? त्याला काय सांगावें?
२२. देवाची प्रार्थना करणें हें काय?
२३. त्वां देवाची प्रार्थना केली तर तो काय करील ह्मणून त्याने वचन दिल्हें?

---

## संभाषण ११.

सोमवाराच्या प्रातःकाळीं गंगाबाई आणि गोविंदा हीं दोघें उठून सूर्य उगवल्यापूर्वीं फिरावयास गेलीं. त्यांच्या घराजवळ एक लाहान नदी होती

तिच्या कांठावर तीं चाललीं. शनिवारीं सकाळीं डोंगराच्या माथ्यावर जाऊन बसून गंगाबाईने गोविंदाला असें सांगितलें होतें कीं, तिकडल्या नदीच्या तिरीं किती रेतीचे बारीक कण आहेत ते मोजावयास जसें अवघड पडेल, तसेंच ज्या प्रकारानी ईश्वर आमचें कल्याण करितो ते सर्व सांगावयास अवघड पडेल; तेव्हां जी नदी त्यांच्या दृष्टीस पडत होती ती हीच. ती निवळ पाण्याची रमणीय नदी होती, तिच्या एका बाजूस झाडांची ओळ होतो. त्यांच्या फांद्यामध्यें पक्षी मधुर मधुर शब्द करीत होते. कधींमधीं एकाद्या लाहान माशाने पाण्यांतून उडी मारून आपलें बहुरंगाचें सुंदर अंग दाखविलें. तो प्रातःकाळ मनोहर होता, आणि गंगाबाई व गोविंदा हीं बरोबर चालत असतां आपणांस सुख व्हावें ह्मणून किती रमणीय पदार्थ ईश्वराने दिल्हे, असा त्याच्या चांगलेपणाचा विचार करून त्यानी देवाविषयीं संभाषण केलें.

**गंगा.**— गोविंदा, म्या तुला ईश्वराविषयीं कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत. त्या तुझ्या ध्यानांत राहून तुला उपयोगी पडतील असी आशा मी धरितें. तो तुजवर आणि दुसऱ्यावर प्रीति करितो याविषयीं, आणि तुला व त्यांस सुख व्हावें यासाठीं त्याने किती केलें आहे याविषयींहि, म्या फार सांगितलें आहे.

**गोविं.**— माझे प्रिय आई, हें केलेंस, याकरितां मी तुझा उपकार फारच मानितों, आणि मी तें कधींहि विसरणार नाहीं असी माझी आशा आहे.

**गंगा.**— बरें, देवाविषयीं तुला अणखी एक मोठी गोष्ट सांगावयाची आहे ती मी आतां सांगतें. तो प्रीतीने व दयेने पूर्ण आहे आणि बरें करण्याने संतोष पावतो असें केवळ नाहीं, परंतु हेंहि ध्यानांत ठेव कीं ईश्वर पवित्र आहे.

**गोविं.**— बये, तोच शब्द धर्मपुस्तकाच्या पाठीवर लिहिलेला आहे, असें म्या पाहिलें; त्याला पवित्र पुस्तक, असें नाम ठेविलें आहे. पवित्र ह्मणजे काय?

**गंगा.**—याचा अर्थ मी तुला नीट समजवावा असा प्रयत्न करीन. असा समजा कीं, आपण एक घटकाभर पुस्तकखान्यांत आहों तेथें एक मेज आहे, त्यावर धर्मपुस्तक आणि बहुत दुसरीं पुस्तकें आहेत. तूं आणि मी त्या मेजाजवळ उभीं राहत आहों, आणि तुला धर्मपुस्तकाविषयीं कांहींच ठाऊक नाहीं. तूं आपल्या हातांत तें घेऊन त्याचीं पानें उलटून चित्रें पाहतोस आणि त्यासीं खेळूं लागतोस. नंतर मी सांगतें, गोविंदा, तें पुस्तक घेऊन खेळूं नये, तुझ्या इच्छेस आलें तर त्या दुसऱ्या पुस्तकानी खेळ. त्यांस अपकार न करावा एवढा संभाळ कर. परंतु कोणत्याहि वेळेस हें पुस्तक घेऊन खेळूं नये. हें ईश्वराचें पुस्तक आहे. त्यानें आपल्याविषयीं आह्मास कळवावें ह्मणून हें दिल्हें. पृथ्वींत पुष्कळ पुस्तकें आहेत त्या सर्वांहून हें अति निराळें आहे. हें सर्व पुस्तकांपेक्षां श्रेष्ठ आहे. जसा तूं दुसरीं पुस्तकें मानितोस तसें हें पुस्तक मानूं नको. हें घेऊन खेळूं नये आणि याविषयीं उपहास करूं नये. हें घेऊन तूं असें मनांत आण कीं, ह्या पुस्तकांत ईश्वर मला बोलतो आहे ह्मणून हें फार चांगलें पुस्तक आहे. एकचित्तपणानें व भक्तिभावानें हें वाचावें आणि अर्थ समजण्यासाठीं तुला ईश्वराजवळ बुद्धि मागितली पाहिजे. त्याचा आणि दुसऱ्या पुस्तकांचा फार भेद आहे. धर्मपुस्तक हें ईश्वराचें पुस्तक आहे. धर्मपुस्तक हें पवित्र पुस्तक आहे.

**गोविं.**—बये, तुझें बोलणें मी सर्वकाळ मनांत धरीन आणि धर्मपुस्तक हें सर्वदा पवित्र मानीन असी आशा आहे. अणखी मी रमीलाहि तसेंच करावयास सांगेन.

**गंगा.**—त्याप्रमाणेंच, मुला, ख्रिस्ती देवळाला पवित्र स्थान ह्मणतात. तें ईश्वराचें घर आहे. त्यांत जाऊन आपण ईश्वराविषयीं ऐकतों, त्याची प्रार्थना करितों, आणि त्याची स्तुति गातों. ख्रिस्ती देऊळ सर्व दुसऱ्या घरांहून फार निराळें आहे. दुसऱ्या घरांत लोक खातात, पितात, निजतात, काम धंदा चालवितात, विकत घेतात, आणि देतात,

परंतु देवाच्या घरांत असें करणें योग्य नाहीं. तेथें आपण हसूं व खेळूं नये. तेथें आपण एकचित्त आणि भक्तिमान् असावें, आणि आपण तेथें कशाला जातों याची आठवण करावी. आह्मी ईश्वराच्या घरांत आहों; तो आह्मास पाहत आहे, असा विचार आपण तेथें करावा. त्याचा आणि दुसऱ्या घरांचा मोठा भेद आहे. ख्रिस्ती देऊळ पवित्र स्थान आहे.

अणखी ईश्वराने ही आज्ञा केली आहे कीं शाब्बाथ जो दिवस तो पवित्र पाळावयास तूं अठीव. तो ईश्वराचा दिवस आहे, त्यांत आह्मी संसाराचें काम करूं नये. जसें दुसऱ्या दिवसांत चालतों तसें यांत चालूं नये, असें ईश्वराने सांगितलें आहे. सोमवार, मंगळवार, बुधवार, बृहस्पतवार, शुक्रवार, शनिवार, यांहून शाब्बाथ ह्मणजे आदितवार हा फार निराळा आहे. त्यांस संसारी दिवस असें ह्मणतात. त्यांत त्वां खेळावें परंतु शाब्बाथांत खेळूं नकों. शाब्बाथ आला तेव्हां काम व खेळ सोडून त्वां ईश्वराविषयीं फार विचार करून त्याची प्रार्थना करावी, धर्मपुस्तक वाचावें, ख्रिस्ती देवळांत जाऊन देवाविषयीं आणि त्याची अधिक प्रीति व सेवा कशी करावी याविषयीं समजण्यास प्रयत्न करावा. शाब्बाथ जो दिवस तो ईश्वराचा दिवस आहे. त्याचा आणि दुसऱ्या दिवसांचा फार भेद आहे. तो पवित्र आहे.

आकाशलोकाला पवित्र स्थान असें ह्मणतात. ज्या सुंदर व सुखी स्थानांत ईश्वर आणि सर्व पवित्र लोक राहतात तें हेंच आहे; तें सर्व दुसऱ्या स्थानांहून फार निराळें आहे. दुसऱ्या स्थानांत दुःख, संकट, शोक, मरण, पाप, असीं आहेत, परंतु आकाशलोकांत तसीं होत नाहींत. तेथील सर्व रमणीय, तेजस्वी, संतोषी व सुखी, असें आहे. तेथील प्रत्येक प्रत्येकावर प्रीति करितो. एकमेकांस सुख व्हावें ह्मणून सर्व प्रयत्न करितात. तेथील कोणीच पापी नाहीं. प्रत्येक जन चांगला आहे. आकाशलोकासारिखें दुसरें स्थान नाहीं. त्या स्थानांत ईश्वर आहे. आकाशलोक पवित्र आहे.

**गोविं.**—अहाहा बये. आकाशलोक आणि आकाशलोकांत जें आहे तें

सर्व माझ्या दृष्टीस पडावें असी माझी इच्छा आहे.

गंगा.— तुला तेथें जाण्याची इच्छा असावी, मुला, कारण आकाशलोक पवित्र आहे, आणि तेथें कांहींच अयोग्य किंवा वाईट नाहीं. मी असो आशा धरितें कीं तूं चांगला होऊन देवावर प्रीति करून त्याच्या आज्ञा मानसील, मग आकाशलोक आणि आकाशलोकांत जें आहे तें सर्व तुझ्या दृष्टीस पडेल. आणि तेथें तूं चांगला व सुखी सर्वकाळपर्यंत होसीलच होसील.

इतक्यांत गंगाबाई आणि गोविंदा मागें परतून घराजवळ आलीं होतीं ह्मणून तीं त्या वेळेस घरांत गेलीं.

---

## अकराव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. धर्मपुस्तक दुसऱ्या पुस्तकांसारिखें आहे कीं काय?
२. धर्मपुस्तक हें कोणाचें पुस्तक आहे?
३. धर्मपुस्तक कसें आहे?
४. त्वां धर्मपुस्तक घेऊन खेळावें काय?
५. त्वां धर्मपुस्तक कसें वाचावें?
६. धर्मपुस्तक पवित्र असें लोक कशासाठीं ह्मणतात?
७. ख्रिस्ती देऊळ दुसऱ्या घरांसारिखें आहे कीं काय?
८. देऊळ कोणाचें घर आहे?
९. ख्रिस्ती देऊळ कसें घर आहे?
१०. लोक कशासाठीं देवळांत जातात?
११. दुसऱ्या घरांत लोक काय करितात?
१२. देवळांत तुझें आचरण व भावना कशा असाव्या?
१३. ख्रिस्ती देऊळ पवित्र असें कां ह्मणतात?
१४. शाब्बाथ जो दिवस तो दुसऱ्या दिवसांसारिखा आहे कीं काय?
१५. शाब्बाथ दिवस कोणाचा आहे?
१६. शाब्बाथ कसा दिवस आहे?

१७. शाब्बाथांत त्वां काय करावें ?

१८. शाब्बाथ दिवस पवित्र असें कां ह्मणतात ?

१९. आकाशलोक दुसऱ्या स्थानांसारिखा आहे कीं काय ?

२०. आकाशलोकांत कोण राहतो ?

२१. आकाशलोक कसें ठिकाण आहे ?

२२. आकाशलोक पवित्र असा कां ह्मणतात ?

२३. त्वां आकाशलोकांत जाण्याची इच्छा कशाला धरावी ?

---

## संभाषण १२.

तिसऱ्या प्रहरीं गोविंदा आपले धडे देऊन अंगणांत जाऊन थोडी वेळ खेळला. नंतर त्यानें आईपाशीं येऊन विचारिलें कीं, "तूं मजबरोबर बागांत येसील कीं काय?" गंगाबाई ह्मणाली, "मी येईन." नंतर बागांत फिरून तिनें कांहीं फुलें तोडून घेतलीं. गोविंदाचा लाहान ससा पेटींतून निघाला होता, यास्तव इकडून तिकडे धांवून गोविंदा त्याला धरावयास लागला. शेवटीं त्यानें त्याला धरिलें. नंतर तो आणि त्याची आई मंडपांत जाऊन बसून भाषण करूं लागलीं.

**गंगा.**—म्या ईश्वराविषयीं तुला कांहीं अणखी सांगावें असें तुझ्या मनांत आहे कीं काय, मुला ?

**गोविं.**—असें मनांत आहे, बये. पण जें ईश्वराविषयीं तूं मला सांगितलेंस तें सर्व कोठून समजलीस ?

**गंगा.**—धर्मपुस्तकावरून, मुला. जर ईश्वरानें आह्मास धर्मपुस्तक दिल्हें नसतें तर त्याविषयीं आह्माला थोडेंच समजलें असतें, असें म्या तुला सांगितलें, याची तुला आठवण आहेना? जें आह्मी ईश्वराविषयीं समजतों तें फारकरून आह्मी धर्मपुस्तकावरून शिकलों.

आज सकाळीं म्या तुला सांगितलें कीं धर्मपुस्तक हें पवित्र पुस्तक आहे. खिस्ती देऊळ हें पवित्र स्थान आहे. शाब्बाथ पवित्र दिवस आहे. आकाशलोक पवित्र ठिकाण आहे. मुला, ईश्वरहि पवित्र

आहे. तो सर्व प्राण्यांपेक्षां फार फार वेगळा आहे. तो परम उत्तम आहे, यांत तो त्यांहुन अति निराळा आहे.

पुरुष, स्त्रिया, लेंकरें, यांस वाईट विचार सुचतात. म्या दुष्ट कर्म करावें असा विचार तूं कधींमधीं करितोस कीं नाहीं? गोविंदा. एका दिवसीं त्वां कांहीं वाईट केलें यासाठीं म्या तुला खोलींत कोंडून ठेवून सांगितलें कीं, मी येऊन तुला जाऊं देईन तोंपर्यंत खुरशीवर उगाच बैस. त्या वेळेस त्वां कुलूप उघडण्याचा प्रयत्न केला तेव्हां तुला वाईट विचार होते. दुसऱ्या वेळेसहि तुला वाईट विचार होते. फडताळाच्या वरचे फळीवर नारिंग ठेवून म्या तुला सांगितलें कीं, तूं त्याला शिवूंच नको. तेव्हां तूं ऐकिलें नाहींस परंतु त्या फळीवरून तें काढावयाला लागलास.

ह्या दोन्हीं वेळीं तुझ्या मनांत मजविषयीं वाईट व अमर्यादशीळ विचार आले. कोणी जनांस पुष्कळ वाईट विचार येतात. आणि त्यानी कुकर्में केलीं आहेत त्याचा विचार ते करितात, तसे विचार करण्याने त्यांस संतोष होतो. ते दुष्ट कर्में करण्याचाहि विचार करितात, आणि तीं दुष्ट कर्में कशानें होतील याविषयीं ते विचार करितात. हे विचार त्यांच्या मनांतून जावे ह्मणून ते प्रयत्न करीत नाहींत. ते मनांत असावे असें ते इच्छितात.

परंतु ईश्वराला एक अयोग्य किंवा पापिष्ट विचार, किंवा एक अयोग्य किंवा पापिष्ट भावना असी कधीं नव्हती. त्याने कांहीं अयोग्य किंवा वाईट गोष्ट कधीं सांगितली नाहीं. धर्मपुस्तकांत जें जें त्याने आह्मास सांगितलें आहे तें सर्व आणि जे विचार व भावना धरावयास आणि जें काम करावयास तो आह्मास सांगतो तें सर्वहि त्यासारिखें चांगलें व यथायोग्य आहे.

ईश्वराने कधींहि एक अयोग्य किंवा पापिष्ट कर्म केलें नाहीं. जीं वाईट आहेत ह्मणून लोकांस ठाऊक आहेत, असीं वहुत कर्में ते करितात. तीं करण्याने आपणांस लाज आणि शासनाचें भय लागेल असें त्यांस ठाऊक असतांहि ते तीं कर्में करितात. असें देवाने कधीं-

हि केलें नाहीं. त्यानें त्याप्रमाणें किंचितहि कधीं केलें नाहीं. त्याप्रमाणें करावें असा विचार देखील त्यानें कधी केला नाहीं. त्यानें त्याप्रमाणें करण्याची इच्छा किंचितहि कधीं केली नाहीं जें अयोग्य किंवा पापिष्ट आहे तें सर्व ईश्वराला अप्रिय आहे. तो त्यावर प्रीति करीत नाहीं, तो त्याचा द्वेष करितो. जेव्हां तुला अयोग्य किंवा पापिष्ट विचार व इच्छा आहेत, जेव्हां तूं वाईट शब्द बोलतोस किंवा कुकर्म करितोस, तेव्हां देवाच्यानें तुजवर प्रीति करवत नाहीं.

जें कांहीं अयोग्य आणि पापिष्ट तें सर्व ईश्वर आकाशलोकांत कधींहि येऊं देणार नाहीं. तो पूर्ण पवित्र आहे, आणि आकाशलोक पूर्ण पवित्र ठिकाण आहे, आणि आकाशलोकांतील सर्व लोकांचे सर्व विचार आणि इच्छा आणि बोलणें आणि करणें हीं केवळ योग्य आणि पवित्र असतात आणि या गोष्टाविषयीं ते ईश्वरासारिखे आहेत; असें असतां जें कांहीं अयोग्य किंवा पापिष्ट तें आकाशलोकांत न जावें असा सर्वकाळ ईश्वर बंदोबस्त करील. कारण कीं जर असें कांहीं आकाशलोकांत शिरलें तर सर्व तेथील लोकांचें सुख नाहींसें होईल,' यावरून ईश्वर किती किती चांगला आहे हें तुला दिसतें, मुला. त्याच्यामध्यें, त्याचे विचार, इच्छा, बोलणें, आणि करणें यांमध्यें किंचित अयोग्य किंवा पापिष्ट कधींहि होवत नाहीं. ईश्वर पवित्र आहे. ईश्वर सर्व प्राण्यांपेक्षां पवित्र आहे. ईश्वर पूर्ण पवित्र आहे.

**गोविं.**— बये, मी आकाशलोकांत कधीं जाणार नाहीं असें भय वाटतें.

**गंगा.**— कां मुला ?

**गोविं.**— आकाशलोक एवढें पवित्र ठिकाण आहे, आणि देव एवढा पवित्र आहे, आणि मी पवित्र नाहीं ह्मणून. म्या पुष्कळ अयोग्य व पापिष्ट विचार व इच्छा केल्या आहेत, आणि मी पुष्कळ अयोग्य व वाईट गोष्टी बोललों आहें आणि वाईट कामें केलीं आहेत. अझून मी पवित्र नाहीं, आणि मला असें भय आहे कीं मी पवित्र कधीं होणार नाहीं.

**गंगा.**— मुला, त्वां पाप केलें आहे, आणि तूं अझून पापिष्ट आहेस ह्म·

णून तूं आपल्या अंतःकरणांत खेद मानावा. पापामुळें मला खेद आहे असें मनापासून ईश्वराला सांग. त्यानें तुझी क्षमा करावी आणि तुला अणखी कांहीं अयोग्य किंवा पापिष्ठ विचार आणि इच्छा न सुचाव्या, किंवा तुजकडून अणखी कांहीं अयोग्य किंवा पापिष्ठ बोलणें व करणें न व्हावें असें त्यानें तुझें साह्य करावें ह्मणून तूं नित्य त्याजवळ माग. तूं चांगला होऊन देवावर प्रीति करून त्याच्या आज्ञा पाळावयास आणि मजवर प्रीति करून माझ्या आज्ञा पाळावयास प्रयत्न कर. जर तूं असें करसील तर ईश्वर तुझ्या प्रार्थना ऐकेल. त्वां चांगलें आणि पवित्र होऊन आकाशलोकांत जावयास सिद्ध व्हावें यासाठीं तो उत्तरोत्तर तुझें साह्य करील. धर्मपुस्तकांत दुसऱ्या गोष्टी आहेत त्या जेव्हां मी तुला सांगेन तेव्हां जें ऐकून तुला फार हर्ष होईल असें चांगलें वर्त्तमान त्यांत आहे असें तुला समजेल. ह्या उपायानें त्वां आकाशलोकांत जावें तो त्यांत कळविला आहे. आणि त्यावरून ईश्वराचा आश्चर्यवंत चांगलेपणा विशेषेंकरून दिसून येईल.

**गोविं.**—तें चांगलें वर्त्तमान काय आहे? अहाहा! बाई, आतां तें मला सांग.

**गंगा.**—मी कांहीं वेळानंतर सांगेन, मुला. जें म्या तुला सांगितलें आहे तें विसरूं नको. ईश्वराविषयीं आणि त्याच्या चांगलेपणाविषयीं फार विचार कर. त्याजवर प्रीति कर, कारण तो एवढा चांगला व पवित्र आहे. सर्व मनानें त्याच्या आज्ञा मान. त्याचा राग उठविण्याचें भय धर. तो सर्वदा तुला पाहत आहे हें मनांत ठेव.

पाप केल्यामुळें जे खेद मानीत नाहींत, जे पाप सोडीत नाहींत, जे ईश्वरावर प्रीति न करून त्याच्या आज्ञा पाळीत नाहींत, त्यांस ईश्वर निश्चयें आकाशलोकांत जाऊं देणार नाहीं. असें त्यानें आपल्या पुस्तकांत आह्मास सांगितलें आहे याचें स्मरण कर, माझ्या प्रिय मुला, तसल्या लोकांस कोठें गेलें पाहिजे हें म्या तुला सांगितलें होतें. माझ्या मुला, इहलोकीं पाप करण्यांत त्या पाप्यांबरोबर चालूं नको, तर

परलोकांत दंड व यातना सोसण्यासाठीं भयंकर ठिकाण आहे त्यांत तूं त्यांबरोबर जाणार नाहींस.

असें बोलतां बोलतां गंगाबाई आणि गोविंदा बागांतून निघून घरांत आलीं. त्या सांजभर गोविंदा चिंतातुर व गंभीर दिसला. मरावयास सिद्ध होण्याविषयीं आणि आकाशलोकांत जाण्याविषयीं त्यानें फार विचार केला. तो निजावयाला गेल्यापूर्वीं त्यानें आपल्या आईनें सांगितल्याप्रमाणें आपल्या खोलींत ईश्वराजवळ प्रार्थना केली. ईश्वरानें चांगलें होण्याची शक्ति द्यावी असें त्यानें इच्छिलें. आपण कसे वाईट विचार आणि इच्छा केल्या होत्या, आणि वाईट शब्द बोललों होतों, आणि वाईट कामें केलीं होतीं, हें त्याच्या मनांत आलें. त्याप्रमाणें आपण अणखी न करावें याविषयीं जपून चालावें असा त्यानें निश्चय केला.

धर्मपुस्तकांत चांगलें वर्त्तमान आहे त्याविषयीं सांगावयास त्याच्या आईनें त्याला वचन दिल्हें होतें, तें लवकर मला ऐकूं येईल, असें मनांत आणून त्याला फार हर्ष वाटला.

धर्मपुस्तक हें चमत्कारिक आणि अमूल्य पुस्तक आहे असें तो समजूं लागला. मी आपल्या आईपासीं धर्मपुस्तक मागेन असा त्यानें निश्चय केला, कारण कीं तें पुस्तक असलें ह्मणजे मी तें वाचून समजावयास शिकेन आणि नित्य जवळ ठेवीन, असें कीं घरीं असतां किंवा दुसऱ्या ठिकाणीं गेलों असतां हें आपल्या आकाशांतील बापाचें कृपायुक्त पत्र सर्वकाळ आपणाजवळ असावें असें त्यानें मनांत आणिलें.

---

## बाराव्या संभाषणाविषयीं प्रश्न.

१. जें ज्ञान ईश्वराविषयीं आह्मास आहे तें फारकरून आह्माला कोठून मिळालें?

२. ईश्वर कसा आहे? तो सर्व मनुष्यांहून कशाविषयीं फार भिन्न आहे?

३. तुझ्या मनांत वाईट विचार कधीं आले आहेत कीं काय ?

४. दुसऱ्या लोकांस वाईट विचार येतात कीं काय ?

५. ईश्वराला कांहीं वाईट विचार किंवा इच्छा कधीं झाल्या आहेत कीं काय ?

६. जें अयोग्य किंवा पापिष्ठ आहे असें देवानें कधीं कांहीं सांगितलें आहे किंवा केलें आहे कीं काय ?

७. जें अयोग्य किंवा पापिष्ठ आहे तें देवाला आवडतें कीं काय ?

८. तुला अयोग्य किंवा वाईट विचार आणि इच्छा असल्या तर ईश्वराच्यानें तुजवर प्रीति करवती काय ?

९. जें कांहीं अयोग्य किंवा पापिष्ठ आहे तें आकाशलोकांत जाईल काय?

१०. तें आकाशलोकांत शिरलें तर तेथील लोकांस दुःख किंवा सुख कोणतें होईल ?

११. ईश्वर पवित्र आहे असें कां ह्मणतात ?

१२. आपण पवित्र आणि आकाशलोकांत जाण्यास सिद्ध आहें असें तुला वाटतें काय ?

१३. आपण पाप केलें आहे असा विचार जेव्हां तूं करितोस तेव्हां तुला सुख किंवा दुःख वाटावें ?

१४. त्याविषयीं त्वां ईश्वरापासीं काय सांगावें ?

१५. त्वां देवापासीं काय मागावें ?

१६. त्वां काय करावयास प्रयत्न करावा ?

१७. जर तूं असें करसील तर देव काय करील ?

१८. धर्मपुस्तकांत कोणतें चांगलें वर्त्तमान आहे, आणि त्याविषयीं धर्मपुस्तक तुला काय कळवितें ?

१९. देवाकडे तुझ्या भावना आणि आचरण हीं कसीं असावीं ?

२०. ज्यांस देव कधीं आकाशलोकांत जाऊं देणार नाहीं ते कोण आहेत?

२१. त्वां इहलोकीं पाप्यांबरोबर चालून वाईट कां न करावें ? मरावयास तयार व्हावें याचा विचार तूं करितोस कीं काय ?

२२. तूं देवाजवळ प्रार्थना करीत असतोस कीं काय? तूं कशासाठीं प्रार्थना करितोस?

२३. पाप केल्यामुळें तुला खेद आहे कीं काय?

२४. मी चांगला होण्यास प्रयत्न करीन असा त्वां निश्चय केला आहे कीं काय?

२५. तूं धर्मपुस्तकाविषयीं अणखी ऐकावयास इच्छितोस कीं काय?

२६. तुजपासीं धर्मपुस्तक असलें तर तूं त्याचें काय करसील?

समाप्त.